ISSN-0971-8397

विकास समर्पित मासिक

# योजना

वर्ष ४२ | अंक १५ | पाने ७६ | ऑक्टोबर २०१५ | मूल्य २० रु.

विशेषांक

## "कौशल्य विकासात भारताची झेप"

भारताच्या कौशल्य विकासाची नवी परिभाषा

दिलीप चेनॉय

नोकरी, रोजगार, तंत्रज्ञान आणि कौशल्य

अरूण मायरा

वंचितांना रोजगारक्षम बनवण्यासाठी कौशल्य विकास

सुनीता सांघी


(विशेष लेख)

आपला वारसा जपताना हातमागाचे संरक्षण आणि पुरस्कार

मोनिका एस. गर्ग

(फोकस)


गांधीजी आणि प्रशिक्षणार्थी शिक्षक यांच्यात फेब्रुवारी १९३९ रोजी झालेल्या चर्चेतील उतारा



मराठी मासिक

# योजना

## योजना घरी आणा.
## आजच वर्गणी भरा.




विकासाचे सर्व पैलू, सर्व सामाजिक प्रश्न आणि चालू घडामोडी प्रसिध्द करणारे योजना हे एकमेव मासिक आहे. या मासिकात सर्व क्षेत्रातील तज्ज्ञांनी लिहिलेले अभ्यासपूर्ण व अचूक माहिती देणारे लेख असतात. त्यामुळे आपल्याला प्रत्येक क्षेत्रातील बिनचुक माहिती मिळते.

हे मासिक विद्यार्थीवर्ग व विद्वत्जनांचे आवडते आहे .स्पर्धात्मक परीक्षांना बसणाऱ्यांनी योजना वाचणे आवश्यक आहे. यातील माहिती साधारणत: इतरत्र प्रकाशित होण्याआधीच आपल्यापर्यंत येते.

### वर्गणीचे दर

| | |
|---|---|
| नियमित अंक मूल्य | १०.०० रुपये |
| विशेषांक | २०.०० रुपये |
| वार्षिक वर्गणी | १००.०० रुपये |
| द्विवार्षिक वर्गणी | १८०.०० रुपये |
| त्रिवार्षिक वर्गणी | २५०.०० रुपये |

वर्गणी, मनीऑर्डर
किंवा डिमांड ड्राफ्टद्वारे संपादक,योजना (मराठी)यांचे नावाने
७०१, ''बी'' विंग (७ वा मजला) केन्द्रीय सदन,
बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४
या पत्त्यावर पाठवावी.

**वर्गणी मनीऑर्डरने पाठविताना आपले नाव व पत्ता कूपनमध्ये सुवाच्य अक्षरात लिहा.**

विक्रीचे ठिकाण : ७०१ सी, ७०१बी, केंद्रीय सदन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४

योजना मासिक भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे प्रसिध्द केले जाते.

# योजना

## विकास समर्पित मासिक

❖ वर्ष ४२ ❖ ❖ अंक १५ ❖ ❖ ऑक्टोबर २०१५ ❖ ❖ मूल्य २० रु. ❖

मुख्य संपादक
**दिपीका कच्छल**

संपादक
**उमेश उजगरे**

उप संपादक
**अभिषेक कुमार**

मुखपृष्ठ
**जी.पी. धोपे**

**'योजना' हे निती आयोगाच्या वतीने, केंद्र सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे हिंदी, इंग्रजी, मराठी, गुजराती, कन्नड, तेलुगू, पंजाबी, उर्दू, बंगाली, तमिळ, मल्याळम, उडिया व आसामी भाषांतून प्रकाशित होते. देशाच्या सर्वांगीण विकासाची खुली चर्चा करणारे ते व्यासपीठ आहे. 'योजना'त प्रसिद्ध होणाऱ्या लेखांतील मते त्या त्या लेखकांची असतात.**

### जाहिरात दर पत्रक

| | |
|---|---|
| ब्लॅक ॲड व्हाईट पूर्ण पान: | रु. १०,००० |
| ब्लॅक ॲड व्हाईट अर्धे पान: | रु. ६,००० |
| बॅक कव्हर पूर्ण पान: | रु. २०,००० |
| सेकंड कव्हर पूर्ण पान: | रु. १७,००० |
| थर्ड कव्हर पूर्ण पान: | रु. १५,००० |

## अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| भारताच्या कौशल्य विकासाची नवी परिभाषा | -दिलीप चेनॉय | ५ |
| नोकरी, रोजगार, तंत्रज्ञान आणि कौशल्य | -अरूण मायरा | ९ |
| समावेशक विकासासाठी कौशल्ये: नवनिर्मिती आणि वैविध्यपूर्ण शिक्षणाचे पुढील दशक | -पुजा ग्यानचंदानी | १४ |
| स्किल डेव्हलपमेंट : गरज नव्या युगाची | -विश्वेश कुलकर्णी | १९ |
| मिश्रित शिक्षणाद्वारे कौशल्य संपन्न भारत-एक पुरोगामी प्रयत्न | -शरण्या रमेश<br>-एम साई राम | २२ |
| कौशल्य विकास आणि व्यावसायिक शिक्षण | -स्वाती मुजुमदार | २५ |
| कौशल्य विकास कार्यक्रम युवा वर्गासाठी आधारभूत उपक्रम | -राजू पाटोदकर | २७ |
| गांधीजी आणि प्रशिक्षणार्थी शिक्षक यांच्यात फेब्रुवारी १९३९ रोजी झालेल्या चर्चेतील उतारा | | ३१ |
| आपला वारसा जपताना हातमागाचे संरक्षण आणि पुरस्कार (विषेश लेख) | -मोनिका एस. गर्ग | ३५ |
| कौशल्यविकासात वृद्धी करून साधनसंपत्ती आणि क्षमतांचा लाभ मिळवताना | प्रा. मनोज जोशी<br>डॉ. अरुण बहादुरिया<br>डॉ. शैलजा दीक्षीत, | ४१ |
| वंचितांना रोजगारक्षम बनवण्यासाठी कौशल्य विकास | सुनीता सांघी | ४६ |
| महिलांच्या कौशल्यविकासात अडथळा ठरणारे घटक | देव नाथन | ५८ |
| कौशल्यातून मानवी भांडवलाची उभारणी | सचिन अधिकारी | ६० |
| जागतिक अन्न दिवस : एक दृष्टीक्षेप | बी जी कांबळे | ६५ |
| डिजिटल भारत : १.८ दशलक्ष रोजगार निर्मितीची अपेक्षा | | ६७ |
| भारतातील शिक्षण क्षेत्र: उपयुक्तता आणि आव्हाने | प्रा.डॉ.बी.आर.सोनवणे | ६९ |

योजना मासिकासाठी लेख, वर्गणी, जाहिरात इ. सर्व पत्रव्यवहारासाठी पत्ता :
**योजना मासिक कार्यालय**
७०१, 'बी' विंग (७वा मजला), केंद्रीय सदन, सेक्टर १०, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४. दुरध्वनी - योजना -२७५६६५८२
email - myojanadpd@gmail.com

# संपादकीय

एखादी जादू झाली आणि यश मिळाले असे कधी होत नाही. यशस्वी होण्यासाठी आवश्यक ते कौशल्य अंगी असणे गरजेचे असते. हे वैश्विक सत्य आजच्या तरुण पिढिलाही लागू पड़ते. योग्य विनियोग झाल्यास युवा शक्ती कोणत्याही देशाच्या सामाजिक आणि आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी महत्वाची ठरू शकते. या शक्तीला योग्य दिशा देण्यासाठी कौशल्य विकास आणि रोजगार ही सर्वोत्तम साधने आहेत. जगातील इतर देशांच्या तुलनेत तरुणांची सर्वाधिक संख्या भारतात असून देखील देशातील रोजगारदात्यांना कुशल मनुष्यबळाची मोठ्या प्रमाणावर कमतरता भेडसावत आहे. त्याचे एकमेव कारण म्हणजे विशिष्ठ कामासाठी आवश्यक कौशल्याचा अभाव. कामगार विभागाच्या २०१४ च्या अहवालानुसार भारतातील अधिकृत कुशल मनुष्यबळाची टक्केवारी केवळ दोन टक्के इतकीच आहे. याशिवाय, पांरपारिक शिक्षण घेतलेल्या युवकांच्या एका मोठया वर्गाला रोजगार मिळवून देण्याचे मोठे आव्हान आहे. भारतीय शैक्षणिक व्यवस्थेतून प्रतिभावंत तर तयार होत आहेत परंतु एखाद्या विशिष्ठ कामासाठी आवश्यक गुणवैशिष्ट्यांचा मात्र त्यांच्यामध्ये अभाव जाणवतो. महाविद्यालये आणि विद्यापीठातून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांमधील रोजगारक्षम कौशल्याचा दर्जा तसेच रोजगार संधी अनुरूपता यामध्ये मोठी तफावत आहे. अर्थात, भारतातील नव्याने उद्यास आलेल्या इंग्रजीवर प्रभुत्व असलेल्या पिढीत केवळ देशाच्याच नव्हे तर संपूर्ण जगाच्या कौशल्यविषयक गरज पूर्ण करण्याची क्षमता निश्चितच आहे. पण, त्यासाठी गरज आहे ती योग्य आणि पुरेशा कौशल्य विकास तसेच प्रशिक्षणाची. जेणेकरून या युवाशक्तीचे रूपांतर विपुल प्रमाणातील तंत्रकुशल मनुष्यबळामध्ये होऊ शकेल. या पार्श्वभूमीवर सरकारने सुरु केलेल्या कौशल्य भारत मिशनचे उद्दिष्ट या समस्येवर उपाय शोधून रोजगारक्षम कौशल्यानी परिपूर्ण आणि नोकरीसाठी सुसज्ज मनुष्यबळ तयार करणे हे आहे. या मिशन अंतर्गत सन २०२२ पर्यंत ४० कोटीहुन अधिक लोकांना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रातील प्रशिक्षण देऊन त्यांच्या रोजगार मिळवण्याच्या संधि वाढवण्याचे लक्ष्य सरकारने निर्धारित केले आहे. सर्वसमावेशक विकासासाठी सर्व टप्प्यावर कुशल मनुष्यबळ उपलब्ध असणे आवश्यक असते.

कौशल्य विकासाचा वेगळा किंवा स्वतंत्र विचार करणे संयुक्तिक ठरणार नाही. कौशल्य प्रशिक्षणाला शिक्षण आणि रोजगाराशी जोडण्याची ती एकात्मिक प्रक्रिया असायला हवी. ही जबाबदारी सरकारी यंत्रणा, संस्था एकट्याच्या बळावर पेलू शकत नाहीत. कौशल्य प्रशिक्षणाचा अनुभव असलेल्या स्वयंसेवी संस्था, शैक्षणिक संस्था तसेच खाजगी क्षेत्राला यामध्ये सहभागी करून घेण्याची आवश्यकता आहे. सर्वच वर्गांना समान महत्व दिले जाण्याची गरज आहे.

युवकांच्या कौशल्य विकासासाठी शिक्षणाचे व्यवसायाभिमुखीकरण करणे अत्यंत महत्वाचे आहे. त्याचवेळी समाजातील महिला, वंचित आणि आदिवासी यासारख्या इतर घटकांना त्यांच्या वैविध्यपूर्ण आणि विशिष्ट गरजांना पूरक परिपूर्ण प्रशिक्षण कार्यक्रम उपलब्ध करून द्यावे लागतील. वंचित वर्गातील बहुताशांना कौशल्य प्रशिक्षण देण्याच्या कामात निरक्षरता हा अडसर ठरु शकतो. महिलांच्या बाबतीत कौटुंबिक बाबी आणि सामाजिक बंधने यासारख्या अडचणींचाही सामना करावा लागु शकतो. कोणत्याही कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी या सर्व बाबींचा विचार करणे अगत्याचे असते. भारत या आधीच उच्च आर्थिक विकासाच्या मार्गावर अग्रेसर झालेला आहे. त्या विकास चक्रास गति देण्यासाठी गरज आहे ती वैश्विक आर्थिक परिस्थितिला उपुयक्त कौशल्यांचा आणखी विकास करण्याकड़े लक्ष देण्याची. अशावेळी कौशल्य प्रशिक्षण सुविधांच्या विस्ताराबरोबरच आंतरराष्ट्रीय पातळीवर स्पर्धा करण्यासाठी कौशल्यांचा दर्जा उंचावण्याचेही आव्हान आपल्यासमोर आहे. सरकारच्या कौशल्य विकास आणि उद्यमशीलता विषयक राष्ट्रीय धोरण २०१५ मध्ये जलदगतीने दर्जेदार आणि शाश्वत स्वरुपातील कौशल्य विकास मोठ्या प्रमाणावर घडवून आणण्याचे आव्हान पूर्ण करणे प्रस्तावित आहे. देशातील कौशल्य विकासविषयक सर्व उपक्रमांना एका छताखाली आणणारी एकात्मिक संरचना उपलब्ध करून देण्याचे लक्ष्यही या राष्ट्रिय धोरणात ठेवण्यात आले आहे. कौशल्य विकासाच्या प्रक्रियेचे प्रमाणीकरण करून त्याची सांगड देशांतर्गत तसेच देशाबाहेरील मागणी केंद्रांशी घालण्याचेही धोरणात नमूद करण्यात आले आहे.

असे म्हणतात की, कौशल्याला प्रयत्नांची जोड़ मिळाली की यश हमखास मिळते. या उक्तीचा प्रत्यय आता येऊ लागला आहे. सरकारने अलीकडेच घेतलेल्या काही निर्णयांमुळे कौशल्य विकासाच्या कार्यक्रमास एका "चळवळीचे" स्वरुप प्राप्त झाले आहे. सरकारच्या या प्रयत्नाचे प्रत्यक्ष लाभ मिळण्यास कदाचित काही कालावधी लागेल. परंतु दीर्घकालीन विचार करता "कुशल भारतीय" निश्चितच देशाला एक आनंदी, सशक्त आणि संपन्न राष्ट्र बनवतील आणि "कुशल भारत, कौशल्यासंपन्न भारत" हे घोषवाक्य सार्थ ठरवतील यात शंका नाही.

■■■

# भारताच्या कौशल्य विकासाची नवी परिभाषा

**-दिलीप चेनॉय**

**मेक- इन इंडिया उपक्रमामुळे येत्या काळात देशात विविध क्षेत्रातील उत्पादनांत वाढ अपेक्षित असून त्यामुळे वार्षिक सकल उत्पन्नातही भर पडण्यास मदत होऊ शकते. याशिवाय उत्पादन प्रक्रियेसंबंधीत कामांसाठी प्रशिक्षित मनुष्यबळाची आवश्यकता निर्माण होईल. या गरजेची वेळेवर पूर्तता करण्यासाठी सरकारने कौशल्य विकास हा उपक्रम सुरू केला. केंद्र सरकारच्या मेक- इन इंडिया, डिजीटल इंडिया, स्मार्ट सिटीज्, व इतर उपक्रमांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी व त्यायोगे दरडोई उत्पन्न वाढ आणि आर्थिक विकासाचे उद्दीष्ट साध्य करण्यासाठी प्रशिक्षित व कुशल मनुष्य बळाची गरज आहे. कौशल्य विकास उपक्रम त्यासाठी महत्वाचा ठरणार आहे. २०२२ पर्यंत देशातील ४० कोटी तरूणांना प्रशिक्षित करण्याचे उद्दिष्ट आखण्यात आले आहे.**

**केंद्र सरकारने जाहीर केलेले प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना, कौशल्य शिष्यवृत्ती व कर्जयोजना, दिनदयाल उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना, नई मंजिल, व क्रेडीट गॅरेंटी फंड यासारखे प्रमुख उपक्रम कौशल्य विकास धोरणाचा विस्तार करण्यास उपयुक्त ठरतील.**



भारतीय रिजर्व बँकेने नुकत्याच सादर केलेल्या २०१४-१५ या आर्थिक वर्षाच्या अहवालानुसार भारत विकासाच्या दृष्टीने टप्प्याटप्याने पुढे जात आहे. देशातील व्यापार उद्योग व उत्पादनाशी संबंधित सर्व आधारभूत निकष देशाचे वार्षिक सकल उत्पन्न (Gross Domestic Product) ७.६ टक्क्यांपर्यंत राहण्याचे संकेत देत आहेत. याशिवाय या अहवालात असेही म्हटले आहे की, चालू आर्थिक वर्षात देशात उद्योगांना पूरक असे वातावरण तयार होईल अशी परिस्थिती आहे. वार्षिक अर्थसंकल्पात सोईसुविधांच्या विकासासाठी खाजगी क्षेत्राच्या मदतीने जाहीर केलेली मोठी गुंतवणूक, खाजगी व उद्योग क्षेत्राला मजबूती तर देईलच पण त्याबरोबरच सेवाक्षेत्राचा विकास व चलनदरातील घट यामुळे ग्राहक वर्गही संतुष्ट राहील.

या अहवालाप्रमाणे, येत्या काळात काही कारणांमुळे जगभरातील अनेक देशांना आर्थिक मंदीची झळ सोसावी लागणार आहे. परंतु, भारतात मात्र सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने पोषक वातावरण राहील. भारतासह जगभरातील अनेक देशांच्याया काळातील आर्थिक स्थितीबाबत असेही सांगण्यात आले आहे की, जलद विकसित होणाऱ्या राष्ट्रांमध्ये केवळ भारतातच वार्षिक सकल उत्पन्न दरात सुधारणा होण्याची शक्यता आहे.

विकासाचे उद्दीष्ट समोर ठेऊन केंद्र सरकारने आधीपासूनच योग्य ती पाऊले टाकण्यास सुरूवात केली आहे. केंद्र सरकारने थेट परकिय गुंतवणुकीचे (Foreign Direct investment) नियम शिथिल केले आहेत. देशांतर्गत व परकीय कंपन्यांना देशात उत्पादनिर्मिती करून ते उत्पादन जगभरातील बाजारपेठांत विकले जावे यासाठीदेखील सरकार प्रयत्नशील आहे.

मेक- इन इंडिया उपक्रमामुळे येत्या काळात देशात विविध क्षेत्रातील उत्पादनांत वाढ अपेक्षित असून त्यामुळे वार्षिक सकल उत्पन्नातही भर पडण्यास मदत होऊ शकते. याशिवाय उत्पादन प्रक्रियेसंबंधीत कामांसाठी प्रशिक्षित मनुष्यबळाची आवश्यकता निर्माण होईल. या गरजेची वेळेवर पूर्तता करण्यासाठी सरकारने कौशल्य विकास हा उपक्रम सुरू केला. केंद्र सरकारच्या मेक- इन इंडिया, डिजिटल इंडिया, स्मार्ट सिटीज्, व इतर उपक्रमांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी व त्यायोगे दरडोई उत्पन्न वाढ आणि आर्थिक विकासाचे उद्दीष्ट साध्य करण्यासाठी प्रशिक्षित व कुशल मनुष्य बळाची गरज आहे. कौशल्य विकास उपक्रम त्यासाठी महत्वाचा ठरणार आहे. देशातील जनसख्यांकीविषयक लाभ घेण्यासाठी तसेच स्वत:चा व्यावसायिक

विकास करून घेण्यासाठी देशातील युवकांना योग्य दिशा मिळणे गरजेचे आहे.

आज जगातील अनेक विकसीत राष्ट्रे शिक्षण देण्याच्या आणखी आधुनिक आणि तांत्रिक प्रक्रियांमुळे उदभवलेल्या सामना करण्याची तयारी करीत असतांना, भारतात मात्र अजूनही शैक्षणिक अभ्यासक्रमाच्या आशय सुधारणेवरच काम सुरु आहे. सध्या सत्तेवर असणाऱ्या सरकारद्वारा जाहीर केलेल्या अनेक उपक्रमांमुळे देशातील तरूण वर्गाच्या योग्य गरजांकड़े आपले लक्ष केंद्रित होईल. भारतात शिक्षणाला महत्व दिले गेले आहे, परंतु दुर्दैवाने व्यक्तिगत कौशल्य विकासावर म्हणावा तितका भर दिला गेलेला नाही. जागतिक महासत्ता होण्यासाठी व आपल्या प्रचंड लोकसंख्येलाच आपली प्रमुख ताकद बनवण्यासाठी कौशल्य विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी होणे, ही काळाची गरज आहे. जगाचे “कुशल मनुष्यबळ” अशी ओळख निर्माण करण्याबरोबर देशासमोरील काही प्रमुख आर्थिक आव्हानांवर मात करण्याच्या दृष्टीने येणारी ५-१० वर्षे भारतासाठी निर्णायक ठरणार आहेत. यासाठी आतापासूनच प्रयत्न होणे गरजेचे आहे.

मोठ्या लोकसंख्येचा लाभ घेण्याची भारतासाठी हीच योग्य वेळ आहे. सप्टेंबर २०१३ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या जनगणना आकडेवारीनुसार, भारत हा तरूणांचा देश आहे कारण देशात १५-२४ वयोगटातील तरुण वर्गाची लोकसंख्या जास्त आहे व ती वाढत जाणार आहे. देशाच्या उद्योग क्षेत्रासमोर सध्या अस्थिर आर्थिक परिस्थितीवर मात करून देशातील तरूण वर्गाला स्थायी स्वरूपातील रोजगार उपलब्ध होईल, असे वातावरण निर्माण करण्याचे आव्हान आहे.

यात एक जमेची बाजू म्हणजे, येणाऱ्या काळात भारतात १५-६० या उत्पादक म्हणून गणल्या जाणाऱ्या वयोगटातील लोकसंख्येत भर पडत जाणार आहे. तर जगातील सर्व विकसित आणि काही राष्ट्रांमध्ये अनुत्पादक म्हणजे ६० व त्यापुढील वयोगटातील लोकसंख्येतच वाढ होत राहिल, असे अनुमान आहे. त्यांमुळे सर्व क्षेत्रांत रोजगाराच्या योग्य संधी उपलब्ध करून सर्वांगिण आर्थिक विकास साधण्याची उत्तम दिशा भारताला लाभू शकते.

जागतिक जनगणना अहवालानुसार २०२२ मध्ये जागतिक उत्पादक मनुष्यबळांत जवळजवळ १५-१७ टक्के लोक भारतीय असतील. आजची आकडेवारी असेही सांगते की, २०४० पर्यंत भारताची उत्पादक जनसंख्या चीनपेक्षाही अधिक असेल. यावरून असे स्पष्ट होते की, भारताला उत्पादक मनुष्यबळाचा सर्वाधिक लाभ मिळू शकतो. पण केवळ सक्रिय जनसंख्येच्या आकडेवारीवर विसंबून राहून देशाचा आर्थिक विकास होणे शक्य नाही. कारण उत्तम उत्पादनासाठी कुशल कामगारांची गरज आहे.

जागतिक जनगणना अहवालानुसार २०२२ मध्ये जागतिक उत्पादक मनुष्यबळांत जवळजवळ १५-१७ टक्के लोक भारतीय असतील. आजची आकडेवारी असेही सांगते की, २०४० पर्यंत भारताची उत्पादक जनसंख्या चीनपेक्षाही अधिक असेल.

यावरून असे स्पष्ट होते की, भारताला उत्पादक मनुष्यबळाचा सर्वाधिक लाभ मिळू शकतो. पण केवळ सक्रिय जनसंख्येच्या आकडेवारीवर विसंबून राहून देशाचा आर्थिक विकास होणे शक्य नाही. कारण उत्तम उत्पादनासाठी कुशल कामगारांची गरज आहे. सद्यस्थितीत भारतात ५०० दशलक्ष उत्पादक लोकसंख्येपैकी १४ टक्के प्राथमिक व दुय्यम क्षेत्रात कार्यरत आहे. तर उरलेले ८६ टक्के लोक हे असंघटित क्षेत्रात काम करतात. ही ८६ टक्के लोकसंख्या अर्धप्रशिक्षित वा अकुशल असल्यामुळे रोजगाराच्या चांगल्या संधींपासून वंचित राहिली आहे. असंघटित क्षेत्रात विखुरलेल्या या मोठ्या लोकसंख्येला योग्य प्रशिक्षण देऊन रोजगाराच्या उत्तम संधी उपलब्ध करून देणे हे भारतासमोरील प्रमुख आव्हान आहे, असे म्हणता येईल.

आजची स्थिती पाहता, शिक्षण व नोकरी यात व्यावसायिक कौशल्य विकासाला कोठेच वाव मिळत नाही. मॅक किंगस्ले यांनी सादर केलेल्या अहवालानुसार केवळ ५४ टक्के भारतीय तरूणांनाच असे वाटते की, माध्यमिक शिक्षणानंतर त्यांना चांगली नोकरी मिळू शकते. तर ५६ टक्के विद्यार्थी उच्च शिक्षण घेण्यापूर्वीच शिक्षण सोडून काम शोधतात. या आकडेवारींवरून असे स्पष्ट होते की, देशात कार्यरत लोकसंख्येपैकी खूपच थोड्या लोकांनी योग्य प्रशिक्षण घेतले आहे आणि ते नौकरी करीत आहेत. किंगस्ले त्यांच्या अहवालात असेही नमूद करतात की, ५३ टक्के नियोक्ते (employers) हे मान्य करतात की निमुस्तरावरील पदांसाठी योग्य प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध हॉट नाही.

यावरून असे स्पष्ट दिसते की, भारतीय तरूणांच्या महत्वाकांक्षा व

नियोक्त्यांच्या अपेक्षांमध्ये मोठी तफावत आहे. याचाच अर्थ असा होतो की, रोजगार उपलब्धता व रोजगार क्षमता या दोन बाबींत ताळमेळ घालून देशाची ५० टक्के लोकसंख्या व्यापणाऱ्या २५ वर्षांखालील लाखो तरूणांना योग्य रोजगार देण्याचे आव्हान भारतीय अर्थव्यवस्थेपुढे आहे.

योग्य प्रशिक्षणाचे महत्त्व लक्षात घेता, देशातील सर्व शासकिय विभाग, उद्योग क्षेत्र, खाजगी कंपन्या व सर्वसामान्य नागरिक या सर्वांच्या समन्वयातून भारताला जगाचे" बनवण्याच्या कामी पुढाकार घ्यायला हवा.

आजच्या घडीला कौशल्य विकास धोरणाचे महत्व सर्वांनाच पटत असल्यामुळे या धोरणाची योग्य व जलद अंमलबजावणी झाली तर भारताला तात्काळ स्वरूपातही अनेक लाभ मिळू शकतात. आज भारताचे महत्व विकसित तसेच इतर देशही नाकारू शकत नाहीत. त्यामुळेच कुशल मनुष्यबळाच्या मदतीने जगातील उदयोन्मुख बाजारपेठ म्हणून पुढे येण्याबरोबरच भारतात गुंतवणूक करण्याचे महत्वही आपण इतर देशांना पटवून देऊ शकतो.

यादृष्टीने सरकारने नुकतीच कौशल्य विकास आणि उद्यमशीलता (Ministry for Skill Development & Entrepreneurship (MSDE) या स्वायत्त मंत्रालयाची स्थापना केली. यापूर्वी राष्ट्रीय कौशल्य विकास संस्थेद्वारा (National Skill Development Corporation) देशातील कौशल्यविकास क्षेत्राला पूरक अशी व्यवस्था कार्यरत आहे. ज्यामध्ये ३७ क्षेत्रांशीसंबंधी कौशल्य सामित्या, २३५ प्रशिक्षण सहकारी संस्था ४५० जिल्ह्यांत कार्यरत असलेल्या ३६११ प्रशिक्षण केंद्रांचा समावेश होतो. राष्ट्रीय कौशल्य विकास संस्थेने आजवर विविध क्षेत्रातील पदांसाठी आवश्यक असे राष्ट्रीय व्यवसाय मानक (NationalOccupation Standards) तयार करणे, व्यवसाय प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम निश्चित करणे



व व्यवसाय प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षण केंद्र स्थापन करणे इ. प्रमुख कार्यांची यशस्वी पूर्तता केली असून, संस्थेद्वारा ५.५ दशलक्ष लोकांना प्रशिक्षण देण्यात आले; त्यापैकी ६१ टक्के लोकांना रोजगार मिळाला आहे. सरकारी सहाय्यातून ही व्यवस्था अधिक कार्यक्षम करणे व कौशल्य विकाससंबंधीत महत्वाच्या धोरणांवर लक्ष केंद्रीत करणे या गोष्टींवर येणाऱ्या काळात विशेष भर देणे आवश्यक आहे.

आताच्या सरकारच्या कौशल्य भारत उपक्रम २०१५ व कौशल्य धोरणांद्वारा २०२२ पर्यंत देशातील ४० कोटी तरूणांना प्रशिक्षित करण्याचे उद्दिष्ट आखण्यात आले आहे. कौशल्य विकास धोरणाचा हेतु असा आहे की," अशी व्यवस्था निर्माण करणे - जी अर्थव्यवस्थेला मजबूती देईल व सर्व क्षेत्रातील रोजगार संधींना पूरक असे मोठया प्रमाणातील प्रशिक्षित कार्यक्षम मनुष्यबळ उपलब्ध करेल. ज्याच्या आधारे मोठ्या प्रमाणावर दर्जेदार, उद्योग क्षेत्रातील मानांकनांनुसार व आवश्यकतेनुसार जलद उत्पादन करता येईल. त्याचबरोबर नाविन्यपूर्ण योजनांतून व्यापार व उद्योगांची भरभराट होईल, संपत्ती आणि रोजगाराची निर्मिती होईल, ज्यामुळे देशातील प्रत्येक नागरिकाला शाश्वत उपजिवकेची खात्री मिळेल".

देशात सध्या ७० हून अधिक विविध कौशल्य विकास कार्यक्रम राबवले जात आहेत.

सध्याच्या सरकारद्वारा कौशल्य विकास धोरणासंबंधी आखण्यातत आलेली संकल्पना आजच्या काळातील आव्हानांचा अभ्यास करून निश्चित करण्यात आली आहे. सेवा क्षेत्र, उत्पादन क्षेत्र तसेच पायाभूत क्षेत्रांतील सर्व घटकांना हे नवे धोरण नवा आयाम देऊ शकेल असा विश्वास व्यक्त होत आहे.

उद्योगक्षेत्रातील नामांकित सार्वजनिक व खाजगी कंपन्याही आपली सामाजिक जबाबदारी ओळखून सरकारला देशातील तरूणाच्या कौशल्य विकास कार्यक्रमात सर्वतोपरी सहाय्य करण्यास पुढे येत आहे. सार्वजनिक क्षेत्रातील पॉवरग्रीड, कोल इंडिया लिमिटेड आणि एनटीपीसी

या कंपन्यांनी २०० पेक्षा अधिक कोटी योगदान दिले आहे. तर खाजगी क्षेत्रातील अंबुजा सिमेंट, सीआयएफएल-CIFCL, एस्सार आणि कोकाकोला सारख्या कंपन्यांनीही आर्थिक तसेच पायाभूत सोईंसाठी मदत दिली आहे.

केंद्र सरकारने जाहीर केलेले प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना, कौशल्य शिष्यवृत्ती व कर्जयोजना, दिनदयाल उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना, नई मंजिल, व क्रेडीट गॅरेंटी फंड यासारखे प्रमुख उपक्रम कौशल्य विकास धोरणाचा विस्तार करण्यास उपयुक्त ठरतील.

कामी हातभार लावला पाहीजे ज्यामुळे भारत प्रगतीच्या दिशेने पुढे जाईल, ही सामाजिक जाणही सर्व स्तरातील नागरिकांत अधिक चांगल्याप्रकारे व्यक्त होऊ लागली आहे. एकंदरीत देशात सध्या उत्साहाचे वातावरण असून आता गरज आहे ती सर्वांनी "भारत, कौशल्ययुक्त" या एकाच उद्देशाने काम करण्याची.

कौशल्य विकासासाठी तरूणांना संघटित करण्याचे ध्येय साध्य होताच आपल्यासमोर उद्योगक्षेत्राच्या आव्हानात्मक गरजांची पूर्तता करू शकेल अशा तऱ्हेने प्रशिक्षण क्षमतेत वाढ करण्याचे आव्हान आहे. त्याचबरोबरच

> प्रधानमंत्री कौशल्य विकास सारखी योजना आर्थिकदृष्ट्या मागास तरूणांना संघटित करून त्यांना कौशल्य विकास कार्यक्रमात सहभागी करण्यासाठी व रोजगाराची हमी देण्याबरोबरच त्यांना सहभागी होण्यासाठी आर्थिक भत्ते उपलब्ध करून देते. येत्या वर्षभरात देशभरातील २४ लाख तरूणांना या योजनेचा लाभ मिळावा यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना आर्थिकदृष्ट्या मागास तरूणांना या उपक्रमात संघटित करून त्यांना कौशल्य विकास कार्यक्रमात सहभागी करण्यासाठी व रोजगाराची हमी देण्याबरोबरच सहभागी होण्यासाठी आर्थिक भत्ते उपलब्ध करून देते. येत्या वर्षभरात देशभरातील २४ लाख तरूणांना या योजनेचा लाभ मिळावा यासाठी सरकार प्रयत्नशील आहे.

प्रधानमंत्री कौशल्य विकास सारखी योजना आर्थिकदृष्ट्या मागास तरूणांना संघटित करून त्यांना कौशल्य विकास कार्यक्रमात सहभागी करण्यासाठी व रोजगाराची हमी देण्याबरोबरच त्यांना सहभागी होण्यासाठी आर्थिक भत्ते उपलब्ध करून देते. येत्या वर्षभरात देशभरातील २४ लाख तरूणांना या योजनेचा लाभ मिळावा यासाठी सरकार प्रयत्नशील आहे.

कुशल भारत मोहिमेच्या शुभारंभानंतर आता यादृष्टीने झालेले सर्व प्रयत्न अधिक परिणामकारक ठरत जातील, असे चित्र आहे. तसेच आपण सर्वांनीच कुशल भारत निर्माण करण्याच्या प्रशिक्षित व कार्यकुशल मनुष्यबळासाठी पुरेशा रोजगार संधी निर्माण करणे व आपण करत असलेल्या कामाबाबत तरूणांना अभिमान वाटेल अशा सकारात्मक वातावरणाची निर्मिती करणे, ही काही आव्हाने येणाऱ्या काळातील भारताच्या कौशल्य विकासाची नवी परिभाषा ठरवतील.

■■■

*लेखक राष्ट्रीय कौशल विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत.*
*email: dilip.chenoy@nsdcindia.org*




विकास समर्पित मासिक

**योजना**

नियमित वाचा, वर्गणीदार व्हा.

**प्रकाशन विभागाची नवी पुस्तके**

१. छत्रपती शिवाजी महाराज (हिंदी) ₹ ९५/-

**अन्य काही पुस्तके**

१. भारतेंदू हरिश्चंद्र (हिंदी) ₹ ११०/-

२. आपला राष्ट्रीय ध्वज (मराठी) ₹ ११०/-

# नोकरी, रोजगार, तंत्रज्ञान आणि कौशल्य

**अरूण मायरा**



**युवकांच्याबेरोजगारीतूननिर्माणहोणारे अनेक सामाजिक प्रश्न टाळण्यासाठी सरकारने युवकांसाठी रोजगाराच्या असंख्य संधी निर्माण करण्याचे धोरण तयार केले आहे. कौशल्य विकास मोहिमेअंतर्गत ५०० दशलक्ष युवकांना विविध प्रकारचे प्रशिक्षण देण्याचा महत्वाकांक्षी कार्यक्रम सरकारने तयार केला आहे. विशेष म्हणजे यातूनच 'मेक इन इंडिया' ही संकल्पना प्रत्यक्षात येण्यास मदत मिळणार आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत चीनच्या चलनाची म्हणजेच युआनची होणारी घसरगुंडी, तसेच चीनमधील बाजारपेठेची सध्याची अवस्था पाहता भारताला आंतरराष्ट्रीय बाजारपेठ काबीज करण्याची मोठीच संधी आता मिळणार आहे. चीनच्या कारखान्यांमध्ये काम करण्यासाठी चिनी युवकच सध्या उपलब्ध नाहीत.**

जगातल्या इतर कोणत्याही देशांशी तुलना केल्यास भारतामध्ये तरुणांची लोकसंख्या जास्त आहे. त्यामुळे या होतकरू युवकांच्या हाताला काम मिळण्याची आवश्यकता आहे. संपूर्ण जगभरातल्या लोकसंख्येच्या वृध्दीचा भौगोलिक कल लक्षात घेतला तर चीनसह इतर अनेक श्रीमंत देशांमध्ये कामकरी लोकसंख्येत झपाट्याने घट होत आहे, असे अर्थशास्त्रज्ञांनी स्पष्ट केले आहे. चीनसारख्या देशालाही कमावणाऱ्या हातांची आता कमतरता भासू लागली आहे. मात्र भारतात याच्या अगदी उलट परिस्थिती आहे. भारतात युवा आणि काम करू शकणारी लोकसंख्या जास्त आहे. विशेष म्हणजे आगामी काही वर्षात 'कामकरी युवक' भारतात वाढणार आहेत. कारण आजमितीला ४७० दशलक्ष मुलांचे वय १८वर्षांपेक्षा कमी आहे. इतकेच नाही, तर दरवर्षी या लोकसंख्येत ६३ दशलक्ष कामकरी युवावर्गाची भर पडेल, असे सरकारने २०१४मध्ये केलेल्या आर्थिक सर्व्हेक्षणामध्ये लक्षात आले आहे.

भारताने आता या परिस्थितीचा तातडीने लाभ उठवण्याची आवश्यकता आहे. भारतामध्ये असणारी युवाशक्ती ही देशाच्या दृष्टीने एकप्रकारे लाभांश आहे. युवावर्ग कोणत्याही मार्गाने कमाऊवर्ग बनला तर देशाच्या आर्थिकवृध्दीला मोठ्या प्रमाणावर हातभार लागण्यास मदत होणार आहे. युवकांच्या हाताला काम आणि कामाचा दाम त्यांना मिळाला नाही तर समाजात एकप्रकारची अस्वस्थता निर्माण होईल. तरुणांच्या आकांक्षांची पूर्तता झाली नाही तर ते बिथरतील. त्यामुळे अनेक सामाजिक प्रश्न निर्माण होतील. गावांमध्ये बेरोजगारीला कंटाळून युवक मोठ्या संख्येने शहरात येऊ लागले आहेत. आता शहरात त्यांना काम मिळाले नाही तर ते वाईट मार्गाने पैसा कमावण्याच्यामागे लागतील. त्याचबरोबर शहरांमध्ये हिंसाचाराच्या घटना वाढू लागतील.

युवकांच्या बेरोजगारीतून निर्माण होणारे अनेक सामाजिक प्रश्न टाळण्यासाठी सरकारने युवकांसाठी रोजगाराच्या असंख्य संधी निर्माण करण्याचे धोरण तयार केले आहे. कौशल्य विकास मोहिमेअंतर्गत ५०० दशलक्ष युवकांना विविध प्रकारचे प्रशिक्षण देण्याचा महत्वाकांक्षी कार्यक्रम सरकारने तयार केला आहे. विशेष म्हणजे यातूनच 'मेक इन इंडिया' ही संकल्पना प्रत्यक्षात येण्यास मदत मिळणार आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत चीनच्या चलनाची म्हणजेच युआनची होणारी घसरगुंडी, तसेच चीनमधील बाजारपेठेची सध्याची अवस्था पाहता भारताला आंतरराष्ट्रीय बाजारपेठ काबीज करण्याची मोठीच संधी आता मिळणार आहे. चीनच्या कारखान्यांमध्ये काम करण्यासाठी चिनी युवकच सध्या उपलब्ध नाहीत. तरूण कामगारांचा तुटवडा ही मोठी समस्या सध्या चीनला भेडसावत आहे. त्यामुळे चिनी कारखाने आता देशाबाहेरच्या कंपन्यांसाठी मुक्त करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र भारताने आता आपल्या आर्थिक विकासाची कार्यप्रणाली बदलून नवीन धोरणाची अतिशय प्रभावी अंमलबजावणी करण्याची आवश्यकता आहे. भारतामध्ये १९९० पासून आर्थिक विकास कार्यक्रम राबविण्यास प्रारंभ केला

आहे. त्यावेळेपासून देशांतर्गत उत्पन्न वाढीशी तुलना केली तर रोजगारनिर्मिती फारच कमी प्रमाणात झाली असल्याचे दिसून येत आहे. शाश्वत आर्थिक विकास पाहणी करणाऱ्या 'बोस्टन कन्सलटिंग ग्रूप" या आंतरराष्ट्रीय समुहाने प्रसिद्ध केलेल्या निष्कर्ष अहवालात म्हटले आहे.

प्रस्तुत लेखामध्ये आपण भारतामध्ये अधिकाधिक वेगाने रोजगारनिर्मिती होण्यासाठी संस्थात्मक पातळीवर कोणत्या पद्धतीने बदल करण्याची आवश्यकता आहे, याचा प्रामुख्याने विचार करणार आहोत. वैश्विक पातळीचा विचार केला तर रोजगाराच्या संधींच्या वृद्धीसाठी अनेक गोष्टींचा दबाव मोठ्या प्रमाणावर निर्माण होत आहे. कौशल्य विकसनाचा मुद्दा तर कळीचा बनला आहे. तंत्रज्ञान वेगाने विकसित होत आहे, त्यामुळे बदलत्या परिस्थितीमध्ये जुन्या पद्धतीने रोजगार निर्मिती चांगली होऊ शकेल, असे म्हणणे शहाणपणाचे ठरणार नाही, हे सर्वांनीच ओळखले आहे. त्यामुळे आजमितीला गरज आहे ती, रोजगारनिर्मिती करणाऱ्या संस्थांच्या साचेबद्ध कामकाजामध्ये मुलभूत बदल करण्याची! या संस्थांच्या मानसिकतेमध्येच बदल करण्याची आवश्यकता आहे. त्याचबरोबर कौशल्य विकसनाची प्रक्रिया कशी असली पाहिजे, हे आपण सोदाहरण लक्षात घेण्याची गरज आहे.

### भारतामध्ये रोजगारभिमुख तंत्रज्ञान कौशल्य विकसन पर्यावरणपूरक आर्थिकप्रणालीला (जेटस्) आकार देणे

देशामध्ये कौशल्यावर आधारित नोकऱ्या मोठ्या प्रमाणावर निर्माण झाल्या तर आर्थिक प्रणालीही सुधारण्यास मदत होणार आहे. मात्र या सर्व प्रक्रियेतील धोका ओळखला पाहिजे. मागणी भरपूर आहे म्हणून कोणत्याही प्रकारे घाईगडबडीने स्त्रोत निर्माण केले गेले तर अनर्थ ओढवणार आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. या सगळ्या व्यवस्थेकडे पाहण्याचा द'ष्टिकोन बदलण्याची गरज आहे. "एखाद्या समस्येकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलल्याशिवाय तो प्रश्न संपुष्टात येत नाही, उलट केवळ भल्यामोठ्या अपेक्षाच समस्यचे कारण बनू शकतात" असे विधान अल्बर्ट आईन्सटाईन या महान शास्त्रज्ञाने केले होते, त्याचे स्मरण इथे आवर्जून करावेसे वाटते.

रोजगारभिमुख तंत्रज्ञान कौशल्य विकसन आर्थिक प्रणालीला आकार देण्यामधील दुसरा मोठा अडथळा म्हणजे संपूर्ण जगामध्ये सध्या निर्माण झालेले अस्थिरतेचे वातावरण. नवीन विकसित तंत्रज्ञानामुळे नोकऱ्या, रोजगाराचे स्वरूप संपूर्णत: बदलून गेले आहे. उद्योग व्यवसायांमध्ये कमालीचे बदल घडून आलेले आहेत. या बदलांचा प्रभाव किरकोळ बाजारपेठ, प्रकाशन व्यवसाय, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, दूरसंचार, दळणवळण या आणि अशा अनेक व्यवसायांवर मोठ्या प्रमाणावर पडला आहे. इतकेच नाही तर उत्पादन प्रक्रियेतही आता डिजिटल तंत्रज्ञानाने प्रवेश केला आहे. अगदी छोटे छोटे कारखानदारही त्रिमिती छपाई तंत्रज्ञानाचा, स्वयंचलित यंत्रांचा वापर सर्रास करू लागले आहेत. पूर्वीचे दिवस आता राहिले नाहीत. तंत्रज्ञान फार झपाट्याने विकसित होत आहे. त्याचा वापरही अनेक प्रकारे होत आहे. तंत्रज्ञानाचा झपाटा पाहता, आगामी दहा वर्षात आणखी काय आणि कशी प्रगती होईल, याचा अंदाज कोणालाच बांधता येत नाही. त्यामुळे कोणत्या प्रकारच्या नोकऱ्या येत्या दहा वर्षात निर्माण होतील आणि त्यासाठी कोणते कौशल्य शिकून घेणे आवश्यक आहे, याचाही अंदाज सध्या लावता येऊ शकत नाही. अर्थात, अशी अस्थिरतेची परिस्थिती भारतामध्ये आहे, म्हणून बेरोजगारी खूप निर्माण झाली असे अजिबात नाही; तर अगदी विकसित देशांनाही हा प्रश्न भेडसावत आहे. कारण वाढत्या तंत्रज्ञानाचे परिणाम विकसित देशांनाही भोगावे लागत आहेत. भारतामध्ये कोणत्या क्षेत्रात किती प्रमाणावर रोजगाराची उपलब्धता निर्माण होणार आहे? आणि त्यासाठी कोणते कौशल्य युवकांनी शिकले पाहिजे, हे नेमके समजण्याची आज खरी गरज आहे.

याबाबतचा तिसरा मुद्दा म्हणजे, देशाच्या ग्रामीण भागात कामकरी वर्गाची असलेली प्रचंड उपलब्धता. गावांमध्ये मनुष्यबळ मोठ्या प्रमाणावर आहे. कृषि क्षेत्रासाठी लागते त्यापेक्षा कितीतरी जास्त कामकरी गावात आहेत. शेतीमध्ये आत्ता

तंत्रज्ञान फार झपाट्याने विकसित होत आहे. त्याचा वापरही अनेक प्रकारे होत आहे. तंत्रज्ञानाचा झपाटा पाहता, आगामी दहा वर्षात आणखी काय आणि कशी प्रगती होईल, याचा अंदाज कोणालाच बांधता येत नाही. त्यामुळे कोणत्या प्रकारच्या नोकऱ्या येत्या दहा वर्षात निर्माण होतील आणि त्यासाठी कोणते कौशल्य शिकून घेणे आवश्यक आहे, याचाही अंदाज सध्या लावता येऊ शकत नाही. अर्थात, अशी अस्थिरतेची परिस्थिती भारतामध्ये आहे, म्हणून बेरोजगारी खूप निर्माण झाली असे अजिबात नाही; तर अगदी विकसित देशांनाही हा प्रश्न भेडसावत आहे. कारण वाढत्या तंत्रज्ञानाचे परिणाम विकसित देशांनाही भोगावे लागत आहेत.

गुंतले आहेत त्यापेक्षा कमी लोकांनी यंत्राच्या मदतीने काम केले तर शेतीचा गुणात्मक दर्जा वाढण्यास मदत होईल, त्याचबरोबर उत्पादनही वाढेल. कृषी क्षेत्राचे उत्पन्न आणि दर्जा सुधारू शकतो, मात्र या क्षेत्रामध्ये नवीन रोजगार निर्माण करण्याची क्षमता खूपच कमी आहे, हे येथे आपण लक्षात घेतले पाहिजे. आज गावाकडचा युवावर्ग काम मिळेल या अपेक्षेने शहरामध्ये येतो, परंतु शहरात त्याला उपजिविकेसाठी काही कौशल्य विकसित करण्याची गरज असते. मात्र अशावेळी नेमके काय करायचे, कशात आपण कुशल व्हायचे हेच या युवकांना लक्षात येत नाही. शहरांमध्ये मोठ्या संख्येने खेडेगावातून लोक येतात, आणि शहरामध्ये नवीन नागरी प्रश्नांना जन्म देतात. वाढत्या स्थलांतरीत लोकसंख्येचा ताण शहर, नगरांच्या वसाहतींवर पडतो. शहरांना सोयी, सुविधा अपुऱ्या पडायला लागतात. राहण्यासाठी घर, पेयजल, सांडपाणी, वाहतूक आणि सुरक्षा या व्यवस्था हाताळणे शहरामधील स्थानिक प्रशासनाला अवघड बनते. शहरांपुढे आधीचे प्रश्न आहेतच, वाढत्या स्थलांतरितांच्या लोंढयामुळे त्यामध्ये भरच पडते. आता या प्रश्नांवर तोडगा म्हणून आणि शहरांच्या वाढत्या गरजा पूर्ण करण्यासाठी भारत सरकारने 'स्मार्ट सिटीज्" आणि 'अमृत' असे दोन महत्वाकांक्षी कार्यक्रम आणले आहेत. अर्थात हे दोन्ही कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी आणखी दशकभर तरी नक्की लागणार आहे. त्यामुळेच शहरांपेक्षा खेडेगावांना सुधारणे लवकर शक्य होणार आहे. भारतातील गावांमध्येच अधिक रोजगार निर्माण झाला तर बरेच प्रश्न मार्गी लागणार आहेत. एकतर शहरात येणारे लोंढे कमी होतील. मात्र त्यासाठी ग्रामीण युवकांना आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित नोकऱ्या गावातच मिळाल्या पाहिजेत. गावात जे व्यवसाय चालतात, त्यांना तंत्रज्ञानाची जोड दिली तर बरेच प्रश्न सुटण्यास मदत होणार आहेत.

> प्रत्यक्षात मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होईल, मात्र त्यामानाने कुशल कामगार उपलब्ध असणार नाहीत, अशीही भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे कोणत्या क्षेत्रामध्ये नेमके कोणते कौशल्य असणारे कामगार हवे आहेत, याविषयी नेमका अंदाज येण्यासाठी आणखी काही वर्षे जावी लागणार आहेत. अकुशल कामगारांना कुशल बनविण्यासाठी तांत्रिक शिक्षण देणाऱ्या संस्थांचीही आवश्यकता आहेच. आपल्याकडच्या तंत्रशिक्षण संस्था हे काम करणार आहेतच त्याचबरोबर महाविद्यालयीन पातळीवरही व्यावसायिक अभ्यासक्रमाचा समावेश केला जाणार आहे. म्हणजे महाविद्यालयातून बाहेर पडणारा विद्यार्थीही काहीतरी कौशल्य शिकलेला असेल.

थोडक्यात, ग्रामीण बेरोजगार युवावर्गाला सक्षम करण्याची आज गरज आहे.

गाव विरूद्ध शहर हा वादाचा विषय काही नवीन नाही. परंतु आता त्याला एका विशिष्ट पर्यावरणपूरक आणि आर्थिक कार्यप्रणालीची जोड मिळाली आहे. अर्थात, आर्थिक प्रगती ही शहराबरोबरच गावातही साधली गेली पाहिजे; तरच खऱ्या अर्थाने संपूर्ण देशाचा विकास होणार आहे. आधुनिक आणि प्रगतीशील, चैतन्यशील ग्रामीण भारतासाठी विकासाचे नाविन्यपूर्ण पर्याय विकसित करण्याची आवश्यकता आहे.

**नोकऱ्या, तंत्रज्ञानाधिष्ठित कौशल्याचा नवीन आराखडा**

आत्तापर्यंत कोणत्याही धोरणाची एक पद्धती ठरलेली होती. वरिष्ठ पातळीवर असणारी मंडळी मोठ्या प्रमाणावरील नवीन धोरण निश्चित करतात, आणि त्याबरहुकूम खाली ते झिरपत जाते, अर्थात राबवले जाते. एखाद्या चारचाकी गाडी किंवा इतर कोणत्याही उत्पादनाच्याबाबतीत विशिष्ट कार्यपद्धती ठरलेली असते, त्यामुळे उत्पादनासाठी कोणते कौशल्य आवश्यक आहे, हे सुद्धा निर्मिती करतानाच माहीत असते. मात्र, ही गोष्ट नवीन धोरणाला लागू ठरत नाही, ही एक मोठी समस्या आहे. त्यामुळे पुरवठा साखळी निर्माण करणे अवघड बनते.

आणखी एक महत्वाची गोष्ट म्हणजे प्रत्यक्षात मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होईल, मात्र त्यामानाने कुशल कामगार उपलब्ध असणार नाहीत, अशीही भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे कोणत्या क्षेत्रामध्ये नेमके कोणते कौशल्य असणारे कामगार हवे आहेत, याविषयी नेमका अंदाज येण्यासाठी आणखी काही वर्षे जावी लागणार आहेत. अकुशल कामगारांना कुशल बनविण्यासाठी तांत्रिक शिक्षण देणाऱ्या संस्थांचीही आवश्यकता आहेच. आपल्याकडच्या तंत्रशिक्षण संस्था हे काम करणार आहेतच त्याचबरोबर महाविद्यालयीन पातळीवरही व्यावसायिक अभ्यासक्रमाचा समावेश केला जाणार आहे. म्हणजे महाविद्यालयातून बाहेर पडणारा विद्यार्थीही काहीतरी कौशल्य शिकलेला असेल.

कौशल्य विकसनासाठी सात पायाभूत तत्वांचे पालन करण्याची आवश्यकता आहे. ही तत्वे येथे देण्यात आली आहेत.

१. कौशल्य विकासनाचा कार्यक्रम पुरवठा साखळीप्रमाणे अथवा उत्पादन प्रक्रियेप्रमाणे राबवता कामा नये. हा कार्यक्रम म्हणजे काही कार्यप्रणाली नाही. तर यातून कुशल कामगार तयार होण्याची गरज आहे. तसेच रोजगाराच्या संधी कायमस्वरुपात निर्माण झाल्या पाहिजेत. त्याचबरोबर व्यवसायासाठी लागणारे कौशल्य युवकांनी तातडीने शिकले पाहिजे.

२. विद्यार्थी चांगले कामगार बनले पाहिजेत हे उद्दिष्ट या योजनेचे अजिबात नाही, तर याउलट कामगारांनी उत्तम विद्यार्थी बनले पाहिजे आणि तांत्रिक तसेच नियमित शिक्षणसंस्थेमध्येच कौशल्य विकसनाचे उत्कृष्ट शिक्षण दिले गेले पाहिजे. विद्यार्थ्यांच्या मनात उद्योजक बनण्याची बीजे जडणघडणीच्या वयातच पेरली पाहिजेत. उद्योजक बनून रोजगाराच्या संधी तयार करण्याची क्षमता मुलांच्या मनात कुमारवयात असताना निर्माण केली गेली पाहिजे. मुलांनी कामगार नाही तर दुसऱ्याच्या हातांना काम देणारे बनावे, अशी शिकवण दिली पाहिजे.

३. कोणत्याही कौशल्य विकसनाचा मुख्य आणि महत्वाचा भाग कामगार हेच असले पाहिजेत, फक्त ग्राहकांना समोर ठेवून कौशल्य विकसित करून चालणार नाही. त्याचबरोबर कारखानदारांनीही आवश्यकतेप्रमाणे नवनवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार काळाची गरज ओळखून केला पाहिजे. व्यवसायामध्ये काळानुरूप बदल घडविणे ही एक निरंतर चालणारी प्रक्रिया आहे, हे व्यावसायिकांनी जाणले पाहिजे.

४. पूर्वीसारखी परिस्थिती आता राहिली नाही जागतिक पातळीवरील स्पर्धेला आता चांगलेच तोंड फुटले आहे. त्यामुळे काळानुरूप बदलणारे उद्योजक, व्यावसायिक संस्था, नवीन तंत्रज्ञान आपलेसे करणारे कारखानेच टिकणार आहेत.

५. कारखान्यामध्ये वापरली जाणारी यंत्रसामुग्री, इतर साहित्य, माल, इमारत यांची किंमत वेळोवेळी घसारा वजा करून दाखवली जाते. परंतु कामगारांचा किंवा त्यांच्या कौशल्याचा कोणत्याच पद्धतीने विचार केला जात नाही. त्यामुळे यापुढे कामगारांच्या बाबतीत कारखानदारांना अधिक चांगला मानवतावादी विचार करावा लागणार आहे. फक्त डिजिटल तंत्रज्ञान आणून उपयोग नाही.

६. कामाच्या व्यवस्थापनाचे जाळे तयार करताना कामगारांना सातत्याने नवीन कौशल्य शिकवले पाहिजे. केवळ पुरवठा साखळी मजबूत असून उपयोग नाही. कामगारांचे 'मेंटॉर" म्हणून भूमिका मालकाला पार पाडावी लागणार आहे.

७. आता सरकारची भूमिका नेहमीच ग्राहकांच्या हिताचे संरक्षण करण्याची असणार आहे. आणि ही भूमिका अर्थातच उत्पादकांनाही मान्य करावी लागणार आहे. केवळ स्पर्धा निर्माण झाली की सगळे काही आपोआपच चांगले होणार, असे अजिबात नाही. सरकारलाही सर्वसमावेशकाची भूमिका पार पाडावी लागणार आहे. त्यासाठी सर्वांना समान सुविधा उपलब्ध करून द्याव्या लागतील. तसेच कौशल्य विकसनाची विशिष्ट प्रक्रिया करावी लागेल. कारण लहान व्यावसायिकांना ही प्रक्रिया परवडेलच असे नाही, त्यामुळे त्यांच्या विकासाची काळजी सरकारला घ्यावी लागणार आहे. यासाठी सहकारी तत्वावरही कौशल्य विकसन संस्था सुरू करणे सहज शक्य आहे.

**'जेटस्" मधील सुधारणा**

रोजगाराभिमुख संस्था आणि तंत्रज्ञान कौशल्य विकसनाचे बदलती चौकट कशी आहे, याचा आपण आत्तापर्यंत बराच उहापोह केला. आधुनिक संचार क्रांतीमुळे कोणतेही उत्पादन जागतिक बाजारपेठेत टिकू शकणारे असले पाहिजे. स्थानिक वेगळे आणि आंतरराष्ट्रीय बाजारामध्ये वेगळे असे आता चालणार नाही, हेही लक्षात घेतले पाहिजे.

अगदी अलिकडेच मेकिन्से यांनी प्रसिद्ध केलेल्या अहवालातील माहितीकडे लक्ष दिले पाहिजे. या अहवालानुसार भारतामध्ये येत्या दहा वर्षात ११५ दशलक्ष युवकांना काम, रोजगार मिळतील इतक्या प्रचंड प्रमाणावर उद्योग व्यवसाय वाढणार आहेत. मात्र सगळ्या उद्योगांना कुशल कामगारांची आवश्यकता मोठ्या प्रमाणावर असणार आहे आणि तेवढे कुशल कामगार नाहीत, असेही अहवालात स्पष्ट केले आहे.

आता काम तर सगळ्यांनाच मिळाले पाहिजे. रोजगाराच्या संधीही उपलब्ध झाल्या पाहिजेत. यासाठी तोडगा म्हणजे 'तीन एच" आहे. हे तीन 'एच" म्हणजे 'हेड हेल्ड हाय" आहे. ग्रामीण भागातल्या युवकांना हा एक संदेशच आहे. मस्तक उन्नत ठेवा. स्वाभिमान जपण्यासाठी पूरक व्यवसाय करा. शहरामध्ये जाऊन मोलमजुरी करण्यापेक्षा गावात राहूनच कुटीर उद्योग करा. त्यासाठी लागणारे कौशल्य शिकून घ्या.

भारतातल्या ग्रामीण भागाविषयी फार चुकीचे चित्र निर्माण केले गेले आहे. गावातल्या नवीन पिढीला आता संगणक हाताळता येतो. इंटरनेटमुळे माहितीचे

सरकारची भूमिका नेहमीच ग्राहकांच्या हिताचे संरक्षण करण्याची असणार आहे. आणि ही भूमिका अर्थातच उत्पादकांनाही मान्य करावी लागणार आहे. केवळ स्पर्धा निर्माण झाली की सगळे काही आपोआपच चांगले होणार, असे अजिबात नाही. सरकारलाही सर्वसमावेशकाची भूमिका पार पाडावी लागणार आहे. त्यासाठी सर्वांना समान सुविधा उपलब्ध करून द्याव्या लागतील.

महाजाल त्यांना चांगले परिचयाचे झाले आहे. त्यामुळे गावात राहून बाहेरच्या जगाशी चांगला संपर्क त्यांना ठेवता येतो. त्यामुळे पूर्वीसारखे अज्ञान भारतातल्या खेड्यांमध्ये आता अजिबात राहिलेले नाही. गावे, खेडी खूप चांगली प्रगती करीत आहेत. खेड्यातला युवक हवी ती माहिती घरात बसून मिळवू शकतो.

भारतामधल्या खेड्यातील जनतेकडे नवीन तंत्रज्ञानाचा अभाव आहे, असे विधान केले जाते. मात्र 'तीन एच"च्या वतीने उत्तर कर्नाटकमधल्या चार जिल्ह्यांमध्ये केलेल्या ताज्या पाहणीत हे विधान चुकीचे असल्याचे स्पष्ट झाले आहे. ५३ टक्के ग्रामीण जनता स्मार्टफोन वापरते आणि यापैकी ७३ टक्के जण आपल्या फोनमधील इंटरनेट सुविधेचा वापर करतात. असे लक्षात आले आहे. आणखी ई-कॉमर्सविषयी केलेल्या पाहणीतही खूप चांगला निष्कर्ष मिळाला आहे. १०० पैकी ९०टक्के लोकांना ऑनलाईन खरेदीविषयी सगळी माहिती होती, त्यापैकी ४७ टक्के लोकांनी तर ऑनलाईन खरेदीचा प्रयत्नही केला होता. याचाच अर्थ आता भारताच्या अगदी ग्रामीण भागातही परिस्थिती बदलली आहे. तंत्रज्ञान लोकांच्या जीवनाचा अविभाज्य घटक बनत आहे, असे म्हणण्यास भरपूर वाव आहे.

'तीन एच' च्या सौजन्याने गावातल्या युवापिढीला अवघ्या चार महिन्यात इंग्रजी संभाषण, संगणकावर काम करणे म्हणज संगणक साक्षर करणे, आणि व्यावसायिक पद्धतीने काम करणे यासारखी कौशल्य शिकवली जातात. एक चांगला सेतू निर्माण केला असून त्याला 'रुबनब्रिज' असे नाव देण्यात आले आहे.या सेतूच्या माध्यमातून समाजाच्या अगदी तळागाळातील जनतेपर्यंत संपर्क साधला जाऊ शकणार आहे. सगळ्यांना आरोग्य, शिक्षण, इतर सेवा-सुविधा चांगल्या पद्धतीने कशा मिळतील हे पाहिले जाणार आहे. त्याचबरोबर मनोरंजनाची साधने, ई-कॉमर्सच्या माध्यमातून ग्रामीण युवकांना काम कसे मिळू शकते, हे प्रामुख्याने पाहिले जाणार आहे. 'डिजिटल भारत" ही संकल्पना गावांगावामध्ये राबविली गेली तरच युवकांना रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहेत.

**सारांश -**

भारतामध्ये युवावर्गाची लोकसंख्या जास्त आहे, त्यामुळे त्यांच्या हातांना काम मिळाले तर भारताची प्रगती अपेक्षेपेक्षा झपाट्याने होणार आहे. आता जागतिक पातळीचा विचार केला तर नवीन तंत्रज्ञानावर अधिकाधिक भर देवून रोजगाराच्या संधी निर्माण करण्याची गरज आहे. कोणत्याही नवीन उद्योग व्यवसायाची उभारणी करताना परदेशी बाजारपेठांचा त्यांच्या दर्जाचा विचार करून त्याप्रमाणे कारखान्यांमधून उत्पादन करण्याची आवश्यकता आहे.

भारतामध्ये कुशल कामगारांचा तुटवडा जाणवत असला तरी आता कौशल्य विकसनावर अधिक भर देवून ही कमतरता भरून काढणे शक्य आहे. अकुशला कामगारांना नोकरीच्या मर्यादीत संधी असतात, हे आता सगळ्यांना पटत असल्याने कौशल्य वृद्धीवर लक्ष केंद्रीत करण्याची गरज आहे. त्यामुळे व्यावसायिकांनीही आपल्या कर्मचाऱ्यांना अधिकाधिक कुशल बनवले पाहिजे.

■■■

लेखक *अरूण मायरा हिमाचलप्रदेश केंद्रीय विद्यापिठाचे कुलगरू तसेच भारताच्या नियोजन आयोगाचे माजी सदस्या आहेत.*
*email: arun.maira@gmail.com*
*सह लेखक मदन पदाकी हे हेड हेल्ड हाय सर्व्हिसेचे सह संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत.*
*email: madan@head-held-high.com*

## आगामी अंक

**नोव्हेंबर २०१५**

**'सार्वजनिक वाहतूक'.**

## सूचना

वाचकांना विनंती आहे की, त्यांनी योजना मासिका संबंधीत अभिप्राय योजना कार्यालय:- 'बी' विंग, केंद्रीय सदन, सेक्टर १०, सी.बी.डी. बेलापूर - ४००६१४ या पत्त्यावर पाठवावे. अभिप्राय सूचनांचे नेहमीच स्वागत असेल.

# समावेशक विकासासाठी कौशल्ये : नवनिर्मिती आणि वैविध्यपूर्ण शिक्षणाचे पुढील दशक

पुजा ग्यानचंदानी

दक्षिण ओदिशामधील रायागाडा या आदिवासी जिल्ह्यात १९ वर्षांची संजिता नायक राहते. सात माणसांच्या तिच्या कुटुंबाचा गाडा तिचे शेतमजूर असलेले वडील चालवतात. त्यांच्या हलाखीच्या परिस्थितीमुळे त्यांच्या मुलांनी शाळा अर्ध्यावरच सोडली आहे. संजिताची वृत्ती नेहमीच धाडसी राहिल्यामुळे तिने अगदी लहान वयातच तिच्या प्रियकराबरोबर पळून जाण्याचा निर्णय घेतला. या प्रियकराने तिच्याशी विवाह केल्यानंतर सहा महिन्यांच्या आतच तिचे शोषण करून सोडून दिले. घरी परतल्यानंतर तिच्या कुटुंबाने तिचा स्वीकार करायला नकार दिला. त्यामुळे पुरेसे अन्न, कपडे आणि निवारा मिळवण्यासाठी संघर्ष करण्याची तिच्यावर वेळ आली. या परिस्थितीमुळे वैफल्यग्रस्त झालेल्या आणि एकाकीपणा वाटयाला आलेल्या संजिताने जगण्याची इच्छाच संपून गेली आणि तिने आयुष्य संपवण्याचा निर्णय घेतला. अनेक वेळा तिने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. पण तिच्या आयुष्यात काहीच तिच्या मनासारखे घडले नाही. त्यामुळे तिने माओवाद्यांच्या दलात सामील होण्याचाही विचार केला. सामाजिक-आर्थिक दरीच्या संकटात दोन वेळचे जेवण मिळवण्यासाठी प्रचंड आटापिटा करणा-या आणि त्यातून अस्तित्व टिकवण्यासाठी धडपड करणा-या अनेक मुलींपैकी ती एक आहे. संजिताच्या सुदैवाने तिला एका समुपदेशकाचे मार्गदर्शन लाभले आणि त्यांनी उपलब्ध करून दिलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमामुळे तिला रोजगार मिळाला.

युवकांसाठी मोफत असलेल्या आणि अगदी शाळा सोडलेल्यांनाही सामावून घेणाऱ्या रोजगाराशी संबंधित घरगुती प्रशिक्षण देणाऱ्या एका कार्यक्रमात नोंदणी करण्याची संधी तिला मिळाली. या केंद्रामध्ये तिने शिवणयंत्र चालवण्याचे प्रशिक्षण देणाऱ्या कार्यक्रमाची निवड केली. भारत सरकारने सुरू केलेल्या या कार्यक्रमामुळे तिला जगण्याची नवी दिशा



प्रतिकात्मक छायाचित्र

मिळाली. तिने त्यापूर्वी कधीही शिवणयंत्र चालवले नव्हते. शिवणकामाविषयी, टाक्यांविषयी आणि कपडे तयार करण्याविषयी तिला काहीच माहीत नव्हते आणि लोकांशी कसे बोलायचे याची तर तिला अजिबात माहिती नव्हती. त्यामुळे ती काहीशी उदास झाली असली तरी आपण काहीतरी नवे शिकत आहोत या भावनेने तिच्यात एक उत्साह आणि उत्सुकता निर्माण झाली होती. या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी तिला नेत्रतपासणी, हात आणि डोळे यांच्यातील समन्वय, वस्तू आणि सामग्री हाताळण्यामधील सहजता,

**युवकांसाठी मोफत असलेल्या आणि अगदी शाळा सोडलेल्यांनाही सामावून घेणाऱ्या रोजगाराशी संबंधित घरगुती प्रशिक्षण देणाऱ्या एका कार्यक्रमात नोंदणी करण्याची संधी संजिताला मिळाली. या केंद्रामध्ये तिने शिवणयंत्र चालवण्याचे प्रशिक्षण देणाऱ्या कार्यक्रमाची निवड केली. भारत सरकारने सुरू केलेल्या या कार्यक्रमामुळे तिला जगण्याची नवी दिशा मिळाली. तिने त्यापूर्वी कधीही शिवणयंत्र चालवले नव्हते. शिवणकामाविषयी, टाक्यांविषयी आणि कपडे तयार करण्याविषयी तिला काहीच माहीत नव्हते आणि लोकांशी कसे बोलायचे याची तर तिला अजिबात माहिती नव्हती. त्यामुळे ती काहीशी उदास झाली असली तरी आपण काहीतरी नवे शिकत आहोत या भावनेने तिच्यात एक उत्साह आणि उत्सुकता निर्माण झाली होती. या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी तिला नेत्रतपासणी, हात आणि डोळे यांच्यातील समन्वय, वस्तू आणि सामग्री हाताळण्यामधील सहजता, रंगांधळेपणा आदी चाचण्यांमधून जावे लागले.**

रंगांधळेपणा आदी चाचण्यांमधून जावे लागले. या चाचण्यांमधून तिची निवड झाल्यावर आपल्या कुटुंबाला हातभार लावण्याच्या उद्देशाने या प्रशिक्षण वर्गामध्ये प्रशिक्षण घेण्यासाठी जवळच्या गावांमधून आलेल्या इतर अनेक तरुण मुलींची तिला सोबत मिळाली. या केंद्रामध्ये तिला तीन वेळा खाणे मिळत असे आणि तिच्यासाठी ही एक मोठी चैन होती. प्रशिक्षकांनी तिला शिवणयंत्र चालवण्याच्या कार्यपद्धतीचे मुळापासून धडे दिले. त्याचबरोबर तिला प्रकल्प कार्य म्हणून काही नियमित कामेही दिली. स्वच्छतागृह आणि स्वच्छ पाण्याची सोय असलेल्या अतिशय छान अशा संस्थेमध्ये ती जाऊ लागली. या संस्थेमध्ये वैयक्तिक स्वच्छतेचे, इंग्रजीचे व इंटरनेटच्या वापराचे वर्ग घेतले जात. केवळ ४५ दिवसांच्या अल्प कालावधीत शिवणयंत्र चालवण्यात, दिलेल्या सूचना समजून घेण्यामध्ये आणि विशिष्ट कालावधीत तयार कपडे शिवण्यात संजिता अगदी तरबेज झाली. तिच्या या गुणांमुळे तिला तमिळनाडूमधील तिरूपूर येथील कॉटन ब्लॉसम या निर्यात उद्योगातील अतिशय प्रसिद्ध कंपनीमध्ये काम मिळाले. तिला जेवण, राहण्याची सोय, आरोग्य तपासणी, भविष्य निर्वाह निधी आणि बँक खाते यांसारख्या इतर सुविधांसह महिन्याला ८०००/- रुपये वेतन मिळते. जेव्हा संजिताने रायागाडा सोडले तेव्हा तिने पहिल्यांदाच रेल्वे गाडीमध्ये पाय ठेवला. एवढ्या मोठ्या कंपनीमध्ये आपण काम करत आहोत आणि आपल्याला इतक्या चांगल्या प्रकारे वागणूक दिली जात आहे, यावर तिचा विश्वासच बसत नव्हता. तिच्या पहिल्या पगारातून तिने तिच्या कुटुंबातील सर्वांसाठी चपला खरेदी केल्या. त्यापूर्वी तिच्या कुटुंबातील कोणीही चपला वापरल्या नव्हत्या. या उन्हाळ्यात तिच्या वडिलांना घराचे छप्पर दुरुस्त करता आले. दिवाळीसाठी ती जेव्हा घरी परतली तेव्हा अतिशय चांगल्या प्रकारे रंगवलेले, प्रकाशाने उजळलेले घर आणि तिचे कुटुंब आपल्या मुलीचे करत असलेले स्वागत पाहून ती गहिवरून गेली.

संजिता हे कोणी काल्पनिक पात्र नव्हे. ती ओदिशामधील रायागाडा येथील आयएल अँड एफएस इन्स्टिट्यूट ऑफ स्किल्समध्ये प्रशिक्षणार्थी होती. ती भारताच्या कौशल्य विकासाची वास्तवातील प्रतिनिधी आहे. स्किल इंडिया हा कार्यक्रम राबवणा-या सर्व संबंधितांनी त्यासाठी घेतलेल्या कष्टांमुळे आणि प्रामाणिक प्रयत्नांमुळे ज्या अनेक लोकांचे जीवन पूर्णपणे बदलून गेले, त्यांच्यापैकी ती एक आहे. एखाद्या मोहिमेला कशामुळे गती मिळावी याचा मार्गदर्शक दीप म्हणजे तिची कहाणी आहे. प्रशिक्षणार्थींची क्षमता आणि रोजगार देणाऱ्याच्या गरजा कशा प्रकारे लक्षात घ्याव्यात याचे हे उदाहरण आहे. भारतातील कौशल्य विकास कार्यक्रम चाकोरीबद्ध पद्धतीने ( विशिष्ट व्यवसाय आणि शहरी केंद्रे यांच्यापुरते मर्यादित) राबवता येणार नाहीत, तर ते बाजारपेठेतील मागणीनुसार आणि समावेशक असले पाहिजेत याची आठवण करून देणारी ही कहाणी आहे.

छायाचित्र शीर्षक: आयएल अँड एफएस स्किल्सच्या रोजगार संबंधित कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षण घेतलेल्या ४,५०,००० प्रशिक्षणार्थीपैकी संजिता एक आहे. या प्रशिक्षणार्थींमध्ये मोठ्या प्रमाणावर शाळा अर्धवट सोडणाऱ्या आणि विविध सामाजिक आणि शैक्षणिक स्तरातील ४७ टक्के महिला आहेत. आयएल अँड एफएस स्किल्सचा बहु-स्तरीय कार्यक्रम १० राज्यातील ३७ अल्पविकसित जिल्ह्यांसह एकून २५ राज्यांमध्ये कार्यरत आहे.

> भारतात तब्बल ८८ कोटी ३० लाख लोकांचे वय ३५ वर्षांच्या खाली आहे. चीनच्या ४७ टक्के तरुण लोकसंख्येच्या तुलनेत हे प्रमाण खूपच जास्त म्हणजे ६६ टक्के इतके आहे. मात्र, तरीही दुर्दैवाची बाब म्हणजे बेरोजगार तरुणांचे प्रमाण १२.९ टक्के आहे. २०१४ मध्ये जागतिक बँकेने व्यक्त केलेल्या अंदाजानुसार भारतामध्ये १७.९६ कोटी लोक दारिद्र्यरेषेखाली (दिवसाला १ डॉलरपेक्षाही कमी उत्पन्नावर जगणारे) होते. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर जागतिक लोकसंख्येच्या १७.५ टक्के लोक असणाऱ्या भारतात जगातील गरिबांपैकी २०.६ टक्के लोक राहतात. ओदिशा, झारखंड, पश्चिम बंगाल, मध्य प्रदेश, बिहार, छत्तीसगड आणि उत्तर प्रदेश या राज्यांमधील २५ टक्क्यांहून अधिक लोकसंख्या दारिद्र्यरेषेखाली आहे.

**समावेशक कौशल्य कार्यक्रम म्हणजे विकासाला चालना**

संयुक्त राष्ट्रांच्या अंदाजानुसार जगात सर्वात जास्त तरुण लोकसंख्या भारतात आहे. भारतात तब्बल ८८ कोटी ३० लाख लोकांचे वय ३५ वर्षांच्या खाली आहे. चीनच्या ४७ टक्के तरुण लोकसंख्येच्या तुलनेत हे प्रमाण खूपच जास्त म्हणजे ६६ टक्के इतके

आहे. मात्र, तरीही दुर्दैवाची बाब म्हणजे बेरोजगार तरुणांचे प्रमाण १२.९ टक्के आहे. २०१४ मध्ये जागतिक बँकेने व्यक्त केलेल्या अंदाजानुसार भारतामध्ये १७.९६ कोटी लोक दारिद्र्यरेषेखाली( दिवसाला १ डॉलरपेक्षाही कमी उत्पन्नावर जगणारे) होते. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर जागतिक लोकसंख्येच्या १७.५ टक्के लोक असणाऱ्या भारतात जगातील गरिबांपैकी २०.६ टक्के लोक राहतात. ओदिशा, झारखंड, पश्चिम बंगाल, मध्य प्रदेश, बिहार, छत्तीसगड आणि उत्तर प्रदेश या राज्यांमधील २५ टक्क्यांहून अधिक लोकसंख्या दारिद्र्यरेषेखाली आहे. हे एक भीषण वास्तव आहे. आपल्याकडे तरुण, उत्पादन मनोवृत्तीचे मनुष्यबळ मोठ्या प्रमाणात आहे. पण बेरोजगारी आणि अल्परोजगारी यामुळे त्यांच्या सामाजिक आणि आर्थिक स्थितीवर मोठ्या प्रमाणावर विपरित परिणाम झाल्याने प्रत्येक दिवसागणिक मोठी आव्हाने निर्माण होऊ लागली आहेत.

शिक्षण, रोजगार किंवा प्रशिक्षण(एनईईटी) यामध्ये नसलेल्या लोकांचे प्रमाण लक्षणीय आहे. त्यांना कोणत्याही प्रकारच्या प्रशिक्षणासाठी अधिकृत प्रवेश मिळालेला नाही, त्यांच्यातील कामकरी/ कारागीर वृत्तीला वाव देईल अशा प्रकारचे शिक्षण त्यांनी घेतलेले नाही. त्यांना कोणत्याही प्रकारचे प्रशिक्षण उपलब्ध झालेले नाही किंवा त्यांना कोणत्याही प्रकारच्या प्रशिक्षणाचा खर्च परवडणारा नाही. यातील विरोधाभास हा आहे की खाजगी महाविद्यालयात भरमसाठ शुल्क देऊन, विद्यापीठ पातळीवरील शिक्षण पूर्ण करून आणि प्रमाणपत्र मिळवल्यानंतरही दहापैकी केवळ एका पदवीधर व्यक्तीला रोजगार उपलब्ध होतो. यातून भारतीय शिक्षण आणि प्रशिक्षण व्यवस्थेतील तफावत दिसून येते. काम मिळवण्यासाठी धडपड करणारे युवक आणि बेरोजगारी आपल्याकडे आहे. मात्र आपल्याकडे मर्यादित साधने किंवा कौशल्य आधारित प्रशिक्षणाचा अभाव आहे. दुसरीकडे तरुण वर्ग सुशिक्षित होत आहे मात्र ती पात्रता रोजगारयोग्य नाही. त्यामुळेच सर्वसमावेशक विकासासाठी कौशल्य विकास अत्यावश्यक आहे जेणेकरून विविध प्रकारची पार्श्वभूमी असलेले तरुण विकासाच्या प्रक्रियेत सहभागी होऊ शकतील. ‘मेक इन इंडिया’ या संकल्पनेच्या माध्यमातून उद्योग क्षेत्राला चालना मिळालेली असताना संघटित क्षेत्रापैकी केवळ ३ टक्के क्षेत्र कामगारांच्या उपलब्धतेमधील सर्वांना सामावून घेऊ शकले आहे. डिजिटल इंडिया, स्वच्छ भारत, नमामि गंगे आणि इतर अनेक पायाभूत क्षेत्रातील इतर विकास कार्यक्रमासाठी मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळाची आवश्यकता निर्माण होणार आहे. तितक्याच मोठ्या प्रमाणात अनौपचारिक क्षेत्रातील कारागीरांनाही उस्ताद, पारंपरिक व्यवसायातील कौशल्य कार्यक्रम शिका आणि कमवा या कार्यक्रमांद्वारे प्रशिक्षित केले जात आहे आणि अनौपचारिक क्षेत्रातील रोजगार देखील पहिल्यांदाच कौशल्य आधारित फलनिष्पत्ती म्हणून ओळखला जाऊ लागला आहे. त्यामुळेच नोकरी आणि स्वयंरोजगार अशा दोन्ही क्षेत्रांमध्ये जनतेला रोजगार मिळवून देण्याची क्षमता निर्माण करणाऱ्या कौशल्य कार्यक्रमांची मागणी वाढली आहे.

**कौशल्य विकास प्रणालीची जोपासना**

भारत सरकारने खाजगी क्षेत्र आणि आयएलओ, जागतिक बँक, ओईसीडी, युरोपियन संघ यांसारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांच्या भागीदारीच्या माध्यमातून कौशल्य विकास प्रणालीचे संवर्धन करत आहे. विविध कौशल्य विकास योजनांच्या माध्यमातून २०हून अधिक विभागांनी परिणाम दाखवणारे कार्यक्रम सुरू केले आहेत. कौशल्य विकास व उद्यमशीलता मंत्रालयाकडून त्यांच्यावर देखरेख ठेवली जात आहे. देशाच्या अगदी दुर्गम भागातील व्यक्तीलाही मुख्य प्रवाहातील रोजगारसंधी उपलब्ध होऊ शकतील अशा प्रकारे या कार्यक्रमांची अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने त्यांनी गुंतवणूक केली आहे. वस्त्रोद्योग मंत्रालयाची एकात्मिक कौशल्य विकास योजना आणि ग्रामीण विकास मंत्रालयांतर्गत असलेली ग्रामीण कौशल्य योजना यांसारख्या सरकारच्या सर्वात मोठ्या योजना ग्रामीण आणि शहरी भागातील तळागाळातील युवक समूह, मागास भाग व डोंगराळ भाग, नागरी संघर्ष आणि कट्टरवाद यांच्या तणावाखाली असलेले भाग, अल्पसंख्याक समुदाय असलेल्या भागापर्यंत पोहोचत आहेत. या कार्यक्रमाचा भर मुख्यत्वे महिला आणि अपंगत्व असलेल्या व्यक्तींवर आहे जेणेकरून सर्व स्तर सहभागी होऊ शकतील.

अनेक दखल घेण्याजोग्या खाजगी क्षेत्रांनीही यामध्ये उल्लेखनीय योगदान दिले आहे. एमएसडीईचा सध्या एक भाग बनलेले राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ प्रशिक्षणविषयक पुढाकार, कौशल्य परिषदांची स्थापना व आंतरराष्ट्रीय पातळीवर भारतीय युवकांच्या कौशल्याला प्रोत्साहन देण्याच्या माध्यमातून उद्योगाला एकवटण्यामध्ये मध्यवर्ती भूमिका बजावत आहे. ३५ विभागांहून अधिक विभागांतील कॉर्पोरेट राष्ट्रीय कौशल्य पात्रता चौकटीतील राष्ट्रीय व्यवसायविषयक मानकांनुसार क्षेत्रीय कौशल्य परिषदांसोबत काम करत आहे, जो तरुण व्यक्तींचा कामाच्या जगाचा पासपोर्ट आहे. स्किल इंडियाच्या लक्ष्यपूर्तीसाठी या संघटनांनी सर्व

संबंधितांशी अधिक जास्त संपर्कात राहून काम करणारी एक यंत्रणा एकत्रितपणे निर्माण केली आहे. गेल्या काही वर्षात कौशल्यविषयक पर्यावरणामध्ये मोठ्या प्रमाणावर गतिमानता दिसून येत आहे. मात्र, त्यामधील निव्वळ पातळी आणि गुंतागुंत यांमुळे त्याला किंवा तिला रोजगारक्षम करताना प्रशिक्षणार्थींच्या अध्ययनविषयक गरजा लक्षात घेऊन त्यात वेळोवेळी हस्तक्षेप करण्याची गरज निर्माण झाली आहे.

**बाजार आधारित कौशल्य कार्यक्रम**

कोणत्याही कौशल्यविषयक पुढाकारासाठी उद्योगांमध्ये स्पर्धात्मकता निर्माण करणे आवश्यक असते. त्यामुळे प्रशिक्षण कार्यक्रमाचा दर्जा प्रमुख गरज बनते. प्रशिक्षणार्थीचा विकास हीच बाब डोक्यात ठेवून संबंधित लाभधारकांमधील भागीदारी आणि विविध प्रकारचे तंत्रज्ञान ते साध्य करता येईल. ज्यावेळी रोजगाराची भूमिका मध्यवर्ती मानली जाते त्यावेळी त्याला दिल्या जाणा-या प्रशिक्षणाबाबत अंमलात आणलेल्या समग्र दृष्टिकोनामुळे त्याला/तिला केवळ योग्य प्रकारचा वाव मिळत नाही तर उद्योगासोबत विकास करण्याची संधी उपलब्ध होते. भारतामध्ये सर्वत्र यशस्वीरित्या सुरू करण्यात आलेल्या विविध उपक्रमांपैकी कौशल्य विकासाला एक मानकप्राप्त, मोजमाप करण्याजोगे व्यवहार्य मॉडेल ठरवण्यामध्ये खाली दिलेले काही घटक उपयुक्त ठरले आहेत.

औद्योगिक भागीदारी:

रोजगार आणि मनुष्यबळ यांच्यामधील कौशल्य हा सेतू आहे. वस्त्रोद्योग, अभियांत्रिकी, बांधकाम व्यवसाय, सेवा उद्योग यांच्या सारख्या उच्च विकास असलेल्या उद्योगांमध्ये (२०१३-२०२२) मनुष्यबळाची मागणी वाढती असून ती १२.०८ कोटी इतकी होणार असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

ब) रोजगार ही शिक्षण आणि प्रशिक्षणार्थी व सरकार यांच्याकडून शिक्षणामध्ये होणारया गुंतवणूकीमध्ये महत्त्वाची गुरूकिल्ली ठरणार आहे. एसएससीच्या माध्यमातून प्रशिक्षणार्थ्यांच्या गुणवत्तेची निश्चिती केली जात असल्याने रोजगार देणा-यांची भूमिका महत्त्वाची ठरते. एका विशाल अधिमानांकनप्राप्त प्रशिक्षण देणा-या भागीदारांच्या जाळयातून त्याची अंमलबजावणी केली जाते आणि जे एसएससी प्रमाणपत्रधारक आहेत त्यांनाच रोजगार दिला जातो.

ब) पायाभूत सुविधा: सध्याच्या कौशल्य विकास कार्यक्रमामध्ये मर्यादा येण्यामागील प्रमुख कारण म्हणजे अतिशय कमकुवत असलेल्या पायाभूत सुविधा आणि द्वितीय, तृतीय श्रेणीतील शहरे व ग्रामीण भागातील त्यांची उपलब्धता. आजच्या घडीला १४०००हून अधिक सरकारी आणि खाजगी आयटीआय, २००हून अधिक राष्ट्रीय कौशल्य विकास केंद्रे एकमेकांच्या सहकार्याने त्यांच्या व्याप्तीच्या माध्यमातून आणि इतर अनेक उद्योग, स्वयंसेवी संस्था आणि संस्थात्मक भागीदार आणि प्रमुख मंत्रालये कौशल्य विकास प्रशिक्षण उपलब्ध करत आहेत. हे प्रशिक्षण कार्यक्रम भारताच्या कानाकोप-यात असलेल्या व्यक्तींना व्यावसायिक शिक्षण देण्यासाठी उपयुक्त ठरत आहे. हजारो खाजगी संस्थांकडून उपलब्ध करून दिल्या जाणा-या अभ्यासक्रमांकडे आणि रोजगारविषयक कार्यक्रमांकडे रोजगारांच्या प्रतिक्षेत असलेल्या युवकांचा ओढा झपाटयाने वाढत आहे. यापैकी काही कार्यक्रम कृतीतून शिक्षण या तत्त्वावर विकसित करण्यात आले असून त्यांचा मोठा परिणाम दिसून आला. मात्र, तंत्रज्ञानात होणारी सुधारणा आणि उद्योगजगतात झपाट्याने होणारे बदल लक्षात घेता उद्योग क्षेत्रात जी स्थिती आहे( उदा. औद्योगिक समूह, विशेष आर्थिक क्षेत्र) त्याच अनुषंगाने प्रशिक्षण कार्यक्रम असले पाहिजेत आणि तशा सुविधा प्रशिक्षण केंद्रात असल्या पाहिजेत किंवा प्रशिक्षण केंद्र( उदा. आयटीआय, तंत्रनिकेतन, विद्यापीठ संकुले) असली पाहिजेत

तंत्रज्ञान: प्रशिक्षकांचा तुटवडा हे एक मोठे आव्हान कौशल्य विकास कार्यक्रमाला भेडसावत आहे. २०२२ पर्यंत ३० कोटी लोकांना प्रशिक्षण देण्याचे लक्ष्य साध्य करण्यासाठी भारताला विविध क्षेत्रातील किमान १० कोटी प्रशिक्षकांची गरज भासणार आहे. त्यांना वर्ग व्यवस्थापन,प्रात्यक्षिक वर्ग आयोजित करण्याचे ज्ञान आणि इतर प्रकारच्या हाताळणीची माहिती असली पाहिजे. त्यासाठी त्यांना त्याचे

> भारत सरकारने खाजगी क्षेत्र आणि आयएलओ, जागतिक बँक, ओईसीडी, युरोपियन संघ यांसारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांच्या भागीदारीच्या माध्यमातून कौशल्य विकास प्रणालीचे संवर्धन करत आहे. विविध कौशल्य विकास योजनांच्या माध्यमातून २०हून अधिक विभागांनी परिणाम दाखवणारे कार्यक्रम सुरू केले आहेत. कौशल्य विकास व उद्यमशीलता मंत्रालयाकडून त्यांच्यावर देखरेख ठेवली जात आहे. देशाच्या अगदी दुर्गम भागातील व्यक्तीलाही मुख्य प्रवाहातील रोजगारसंधी उपलब्ध होऊ शकतील अशा प्रकारे या कार्यक्रमांची अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने त्यांनी गुंतवणूक केली आहे.

प्रशिक्षण दिले पाहिजे. अशा प्रकारच्या उत्तम प्रशिक्षणविषयक व्यासपीठांची गरज झारखंड, ईशान्येकडील राज्ये, जम्मू-काश्मीर यांसारख्या दर्जेदार आणि शिक्षित प्रशिक्षकांची तीव्र टंचाई असलेल्या दुर्गम आणि वनक्षेत्र असलेल्या भागात सर्वाधिक आहे. तंत्रज्ञानाची माहिती व त्याची हाताळणी हा एक अत्यावश्यक घटक आहे आणि ते आत्मसात करणे मोठे आव्हान आहे.

**पुढे काय?**

२०२२ पर्यंत ५० कोटी लोक एकमेकांशी इंटरनेटने जोडले जातील असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. ग्रामीण भागातील वापरकर्त्यांचे प्रमाण २०१३ मधील २९ टक्क्यांवरून तीन वर्षात सुमारे ५० टक्क्यांपर्यंत वाढण्याचा अंदाज आहे. महिला वापरकर्त्यांचे प्रमाणही २०१३ मधील २८ टक्क्यांवरून २०१८ पर्यंत ३५ टक्क्यांपर्यंत जाणाचा अंदाजही व्यक्त करण्यात आला आहे. यामुळे केवळ मनोरंजनासाठी मोठ्या प्रमाणात संपर्कप्रणाली उपलब्ध होण्याचाच अंदाज नसून त्यामुळे शिक्षण-मनोरंजन यांची सांगड असलेल्या एज्युटेनमेंटमध्ये वाढ होणार आहे. स्किल इंडिया डिजिटल इंडिया व मेक इन इंडियाच्या खांद्याला खांदा लावून वाटचाल करणार असून त्यामुळे सक्षम प्रशिक्षणाची व्याप्ती वाढणार आहे आणि शिक्षण केवळ एका जागी मर्यादित न राहता त्याची चलक्षमता वाढून शिक्षणासाठी इंटरनेटचा वापरही वाढणार आहे. त्यामुळे एका जागी स्थिर असलेल्या निश्चित अशा पायाभूत सुविधांचा वापर करूनच कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे का? असा प्रश्न निर्माण होतो. या प्रश्नाचे उत्तर कदाचित नाही, असे असू शकेल. सर्व स्तरातील व्यवसायाभिमुख प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये चांगल्या प्रकारे शिक्षण मिळण्यावर त्यांचा दर्जा निश्चित होत असला तरीही नावीन्यपूर्ण ऑनलाईन कार्यक्रमांची घोषणाही आवश्यक आहे. त्यामुळे कोणत्याही ठिकाणी आणि कोणत्याही वेळी प्रशिक्षण देण्याचे स्वातंत्र्य मिळू शकेल. याच दृष्टिकोनातून वैविध्यपूर्ण शिक्षणाची टीव्हीएटी ही संकल्पना एका पूर्णपणे वेगळ्या रुपात साकार करता येऊ शकेल. टीव्हीएटीमधील वैविध्यपूर्ण शिक्षणाचा दृष्टिकोन प्रत्यक्ष संपर्काद्वारे शिक्षणाबरोबरच तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शिक्षणावर भर देणारा असू शकेल. याचबरोबर लोकांच्या नेहमी वापरात असलेली रेल्वे स्थानके, मेट्रो रेल्वे स्थानके, मॉल्स या ठिकाणांचाही प्रशिक्षण केंद्रांसाठी विचार करता येऊ शकेल. खरे तर स्किल्स ऑन व्हिल्स ही संकल्पना या कार्यक्रमाला आणखी महत्त्व प्राप्त करून देऊ शकेल. ब्राझीलमध्ये सेनाईकडून वापरण्यात आलेल्या स्किल्स ट्रक्सचे याच संकल्पनेच्या संदर्भातील एक चांगले आणि प्रसिद्ध उदाहरण आहे. ग्रामीण आणि दुर्गम भागांमध्ये त्यांचा वापर कौशल्य प्रशिक्षणासाठी करण्यात आला. या प्रयत्नांमुळे ऑनलाईन व ऑफलाईन अशा दोन्ही प्रकारच्या संसाधनांची हाताळणी करू शकणाऱ्या अनेक प्रकारच्या एकमेकांत मिसळून जाणाऱ्या तंत्रज्ञानांसाठी मार्ग खुले होतील. अशा प्रकारच्या मिश्र अध्ययन आराखड्यामुळे कौशल्य आराखड्याचे सिंहावलोकन करता येईल. त्यामुळे संस्थांना विशेषत: रोजगार देणाऱ्या मालकवर्गाला आणि रोजगार उपलब्ध करणा-यांना कौशल्याकडे उत्पादनाच्या नव्हे तर फलनिष्पत्तीच्या दृष्टीने पाहता येईल. गुंतवणुकीवर सामाजिक परताव्यासारख्या साधनाचा वापर करून सरकारी किंवा खाजगी क्षेत्रातील निधी पुरवठादारांना त्याच्या प्रभावाचा विचार करावा लागेल. या ठिकाणी संजिताचे उदाहरण विचारात घेतले पाहिजे. केवळ तिचे कौशल्यविकासाद्वारे सक्षमीकरण केल्यामुळे केवळ तीच आर्थिकदृष्ट्या सक्षम झाली नाही, तर तिचे संपूर्ण कुटुंब, समाज आणि गावही सुधारला.

**इन्सर्ट फिगर १** मिश्र शिक्षणाची चौकट किंवा अवकाशावर अवलंबून असलेले मिश्र शिक्षणाचे मॉडेल

**शेवटचे परंतु महत्त्वाचे:**

स्किल इंडिया हे उद्योगांच्या मनुष्यबळाच्या गरजांवर आणि कौशल्याची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधांवर बारीक लक्ष ठेवून राहण्याचे अतिशय अवघड आव्हान आहे. कौशल्याच्या अवकाशात सातत्याने नवीन उद्योगपतींचे आगमन होत असल्यामुळे प्रशिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी, मूल्यमापन करण्यासाठी व रोजगारनिर्मितीसाठी गुंतवणूक, नवनिर्मिती, संस्था कौशल्याच्या त्रिसूत्रीवर कायम भर असला पाहिजे. अनेक यशस्वी उद्योगआधारित प्रशिक्षण आराखड्यांनी हे दाखवून दिल आहे की प्रशिक्षण स्पर्धात्मक आधारावर आहे व प्रशिक्षणार्थींची कामासाठी सज्जता वाढवणारे आहे. या भागामध्ये तंत्रज्ञानाने एखाद्या नांगराप्रमाणे एकात्मिक भूमिका बजावली आहे. शालेय शिक्षण अर्ध्यावर सोडून देणारे आणि कामकऱ्यांच्या समूहात सहभागी होण्याची इच्छा असणाऱ्यांसाठी कौशल्य प्रशिक्षण हा माहिती, प्रशिक्षण, मृदू कौशल्ये व अनुभव यांचा सेतू आहे आणि या शिक्षणामुळे अनुभवातून त्यांना फायदेशीर रोजगार मिळेल.

■■■

*लेखिका पॉलिसी अँड कम्यूनिकेशन ग्रुपच्या समुह प्रमुख आहेत.*


*email: poojagianchandani@gmail.com*

# स्किल डेव्हलपमेंट : गरज नव्या युगाची

विश्वेश कुलकर्णी

**केंद्र सरकारने नॅशनल स्किल डेव्हलपमेंट एजन्सी (NSDA) या नावाने संपूर्ण स्किल डेव्हलपमेंट कार्यक्रमांचा समन्वय साधणारी राष्ट्रीय स्तरावरील संस्था स्थापन केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने तर स्किल डेव्हलपमेंटसाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन केले आहे. याशिवाय स्किल डेव्हलपमेंटला प्रोत्साहन देण्याच्या दृष्टिने नुकतेच नॅशनल स्किल डेव्हलपमेंट एजन्सीने देशभरात या क्षेत्रात काम करणाऱ्या विविध संस्थांकडून आपापल्या कामाची माहिती तसेच नवनवीन संकल्पना मागवल्या आहेत. या कामांची व संकल्पनांची पाहणी केल्यानंतर संपूर्ण देशभरात याची व्याप्ती वाढविण्याच्या दृष्टिने प्रयत्न करण्यात येणार आहेत. उद्योगाभिमुख रोजगार निर्मिती करण्यासाठी केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाने एआयसीटीई व युजीसीच्या साहाय्याने देशभरात १०० कौशल्य केंद्रे स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रत्येक केंद्राला रूपये ५ कोटींचे अर्थसाहाय्य देण्यात येणार आहे.**

देशात लोकसंख्या वेगाने वाढत असताना दुसरीकडे तंत्रज्ञानामध्ये दिवसेंदिवस नवनवे बदल होत आहेत. या बदलत्या विकसित तंत्रज्ञानाशी सांगड घालण्याच्या दृष्टिने उद्योग जगताला नेमक्या कुठल्या कौशल्य असलेल्या मनुष्यबळाची आवश्यकता आहे. याकडे लक्ष देण्याची गरज आहे. या पार्श्वभूमीवर नोकरी/रोजगारप्राप्त होण्याच्या दृष्टिने बेरोजगार तरूणांना असे कालसुसंगत कौशल्य प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. विशेषत: व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या प्रत्यक्ष नोकरीला सुरूवात करू पाहतात तेव्हा त्यांच्याकडे उद्योगधंद्याच्या दृष्टिने आवश्यक असलेले कौशल्य नसल्याने ते अकुशल ठरतात. त्यामुळे त्यांना रोजगाराच्या संधी मिळवताना अडचणी येतात व बेरोजगारांची फौज वाढत जाते. अशा अकुशल मनुष्यबळाचा वापर करून उद्योगजगतालाही अपेक्षित विकास साधता येत नाही. तसेच आवश्यक ते कुशल मनुष्यबळ उपलब्ध न झाल्याने ते निर्माण करण्यासाठी उद्योगजगताला वेळ व पैसा खर्च करावा लागतो. म्हणूनच उद्योगजगताला अभिप्रेत असलेल्या



औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून आजही जुन्या व वापरात नसलेल्या यंत्रसामुग्रीचा वापर करून विद्यार्थ्यांना प्रॅक्टिकल ट्रेनिंग देण्यात येते. तसेच या संस्थांमधून शिकवला जाणारा अभ्यासक्रमसुध्दा जुना व कालसुसंगत नसल्याने साहजिकच अशा संस्थामधून बाहेर पडणारे विद्यार्थी जेव्हा कौशल्याचे प्रशिक्षण असलेले मनुष्यबळ निर्माण करणे गरजेचे आहे. देशात आज सर्व क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर असलेली कुशल मनुष्यबळाची कमतरता भरून काढण्यासाठी 'स्किल डेव्हलपमेंट' अर्थात 'कौशल्य विकास' ही संकल्पना चळवळ होण्याची नितांत आवश्यकता आहे.

या कौशल्य विकसनासाठी केंद्र सरकारचे २८ वेगवेगळे विभाग कार्यरत

आहेत. यामध्ये केंद्र सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाच्या पुढाकाराने सुरू करण्यात आलेली ‘पंडित दिनदयाळ उपाध्याय कौशल्य वर्धन योजना’ तसेच अल्पसंख्याक मंत्रालयाच्या वतीने सुरू करण्यात आलेली ‘सीखो और कमाओ’ योजना, पर्यटन मंत्रालयाने सुरू केलेली ‘हुनर से रोजगार तक’ योजना, ‘आजीविका’ यासारख्या प्रयत्नातून केंद्र सरकारसुध्दा ‘स्किल डेव्हलपमेट’ संदर्भात कार्यरत असल्याचे दिसते.

याशिवाय ‘स्किल डेव्हलपमेंट’साठी प्रत्येक राज्यामध्ये एक स्वतंत्र संस्था उभारून आयएएस दर्जाच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून राज्याचे मुख्यमंत्री या संस्थेचे प्रमुख आहेत. महाराष्ट्रातही ‘महाराष्ट्र स्किल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन’ या नावाने महामंडळ सुरू करण्यात आले आहे.

केंद्र सरकारने नॅशनल स्किल डेव्हलपमेंट एजन्सी (NSDA) या नावाने संपूर्ण स्किल डेव्हलपमेंट कार्यक्रमांचा समन्वय साधणारी राष्ट्रीय स्तरावरील संस्था स्थापन केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने तर स्किल डेव्हलपमेंटसाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन केले आहे. याशिवाय स्किल डेव्हलपमेंटला प्रोत्साहन देण्याच्या दृष्टिने नुकतेच नॅशनल स्किल डेव्हलपमेंट एजन्सीने देशभरात या क्षेत्रात काम करणाऱ्या विविध संस्थांकडून आपापल्या कामाची माहिती तसेच नवनवीन संकल्पना मागवल्या आहेत. या कामांची व संकल्पनांची पाहणी केल्यानंतर संपूर्ण देशभरात याची व्याप्ती वाढविण्याच्या दृष्टिने प्रयत्न करण्यात येणार आहेत. उद्योगाभिमुख रोजगार निर्मिती करण्यासाठी केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाने एआयसीटीई व युजीसीच्या साहाय्याने देशभरात १०० कौशल्य केंद्रे स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रत्येक केंद्राला रूपये ५ कोटींचे अर्थसाहाय्य देण्यात येणार आहे.

विशेष कौतुकाची बाब म्हणजे नुकतेच १९ ऑगस्ट २०१४ला महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्यावतीने महाराष्ट्र राज्यातील पहिले स्किल डेव्हलपमेंट सेंटर जालना जिल्हयातील अंबड येथे “महाराष्ट्र कौशल्य विकास केंद्र” या नावाने सुरू करण्यात आले आहे. या केंद्रात डायलिसिस टेक्निशियन, रोबोटीक्स टेक्निशियन, फोर्कलिफ्ट ऑपरेटर, पेंट शॉप टेक्निशियन यासारखे २० अल्पमुदतीचे अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत. हे सर्व अभ्यासक्रम उद्योगजगतातील तज्ज्ञ व्यक्तींशी चर्चा करून तयार करण्यात आले आहेत. सध्या या केंद्रात २५०० विद्यार्थी प्रत्यक्ष प्रात्यक्षिकासह प्रशिक्षण घेत आहेत.

याशिवाय महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालयाच्या पुढाकाराने सुरू करण्यात आलेल्या “शिका व कमवा” योजनेत राज्यातील सुमारे १५ हजार विद्यार्थी १८६ नामांकित कंपन्यांमधून ऑन द जॉब ट्रेनिंग स्वरूपाचे प्रशिक्षण घेत आहेत. प्रशिक्षण काळात या विद्यार्थ्यांना दरमहा किमान रू. ६ ते ७ हजार रूपयांचे विद्यावेतन देण्यात येते, तसेच शासनमान्य डिप्लोमाचे शिक्षण मोफत देण्यात येते.

कुशल मनुष्यबळ निर्मितीसाठी सर्वात आधी आवश्यकता आहे ती असे प्रशिक्षण देऊ शकणारया प्रशिक्षकांची. ही गरज लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाने शासकीय तंत्रनिकेतनमधील अध्यापकांसाठी “शिक्षक प्रशिक्षण कार्यशाळा” हा एक उल्लेखनीय कार्यक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमांतर्गत तीन दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात येते. यामध्ये शिक्षकांना प्रत्यक्ष कंपनीची भेट घडवून आणली जाते. तसेच कंपनीच्या कामकाजासोबतच कंपनीतील वरिष्ठ तज्ज्ञ अधिकाऱ्यांशी संवाद साधला जातो.

विविध व्यवसायांना डोळयासमोर ठेऊन स्किल डेव्हलपमेंटच्या सुरू असलेल्या प्रयत्नांमुळे श्रमप्रतिष्ठा वाढीस लागली आहे. उद्योगजगतामध्येही त्यांना हवे असलेले कुशल मनुष्यबळ उपलब्ध होत आहे. या जाणीव जागृतीमुळे पोषक वातावरण तयार झाले आहे. पर्यायाने नवे औद्योगिक प्रकल्प सुरू होण्यास वाव निर्माण झाला आहे. उद्योगासाठी आवश्यक असलेले मॅन, मटेरियल आणि मनी यापैकी ‘स्किल मॅन पॉवर“ उपलब्ध होण्याची संभावना वाढीस लागल्यामुळे उद्योगजगताच्याही आशा पल्लवित झाल्या आहेत.

या सर्व बाबींमुळे थोड्याफार प्रमाणात का होईना बेरोजगार तरूणांमध्ये नवा उत्साह व उमेद निर्माण झाली आहे. विविध व्यवसायांना डोळयासमोर ठेऊन स्किल डेव्हलपमेंटच्या सुरू असलेल्या प्रयत्नांमुळे श्रमप्रतिष्ठा वाढीस लागली आहे. उद्योगजगतामध्येही त्यांना हवे असलेले कुशल मनुष्यबळ उपलब्ध होत आहे. या जाणीव जागृतीमुळे पोषक वातावरण तयार झाले आहे. पर्यायाने नवे औद्योगिक प्रकल्प सुरू होण्यास वाव निर्माण झाला आहे. उद्योगासाठी आवश्यक असलेले मॅन, मटेरियल आणि मनी यापैकी ‘स्किल मॅन पॉवर’ उपलब्ध होण्याची संभावना वाढीस लागल्यामुळे उद्योगजगताच्याही आशा पल्लवित झाल्या आहेत. यामुळे देशांतर्गत गुंतवणुकीसोबतच थेट परकीय गुंतवणुकीचा वेग वाढल्यास व पर्यायाने देशाची अर्थव्यवस्था वाढीस लागण्यास मदत मिळू शकते. या सर्व बाबींमुळे ‘मेक इन इंडिया’ हे स्वप्न प्रत्यक्षात येण्यास

हातभार लागू शकतो. काय करायला हवे : देशात प्रत्येक तालुका पातळीवरील उद्योगजगताची पाहणी करून त्यांच्या गरजा लक्षात घेऊन त्या त्या भागात कौशल्य विकास केंद्रे निर्माण केली पाहिजेत, विशेषत: त्या-त्या भागातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये (आयटीआय) मध्ये खासदार दत्तक गाव योजनेखाली या "कौशल्य विकास केंद्रांची" उभारणी करावी.

याशिवाय महाराष्ट्र राज्यापुरता विचार करायचा म्हटला तरी राज्यातील मध्यवर्ती कारागृहांमध्ये तब्बल २५ हजार कैदी आहेत. हे कैदी कारागृहात सक्तमजुरीची शिक्षा भोगताना यंत्रमाग, हातमाग, फाईल बनवणे, लाकडी फर्निचर बनवणे, लोखंडी खाटा तसेच पितळी स्मृतिचिन्ह बनवणे, शिलाई मशिनवरील काम असे विविध प्रकारचे काम करत असतात. यासाठी त्यांना कुशल, अर्धकुशल व अकुशल कारागीर अशा वर्गवारीनुसार प्रति दिवशी क्रमश: रूपये ५५, रूपये ४४ व रूपये ३५ याप्रमाणे मोबदला दिला जातो. जर उद्योगजगताच्या सहकार्याने त्यांना आवश्यक असलेल्या उत्पादनाची निर्मिती कारागृहात कैद्यांच्या माध्यमातून करणे सुरू केले तर कैद्यांना या कामाच्या मोबदल्यात प्रति दिन रू. २०० ते २५० देणे शक्य आहे, असे झाल्यास त्यांचे पुर्नवसन होण्यास मदतच होईल.

तसेच महिला व बाल विकास विभागाच्या अनाथ मुलांचा सांभाळ करणा-या महाराष्ट्र राज्य परिवीक्षा व अनुरक्षण संघटनेतील विद्यार्थ्यांना कौशल्य विकास केंद्रातून रोजगारक्षम होण्यासाठीचे प्रशिक्षण देण्यात यावे.

कौशल्य विकास केंद्रांच्या निर्मितीसाठी औद्योगिक कंपन्यांचा सीएसआर फंड वापरात आणता येऊ शकतो.

'ऑन द जॉब ट्रेनिंग' स्वरूपाचे प्रशिक्षण सर्व क्षेत्रात देण्यात यावे.

निसर्ग संपन्न व सर्व संभाव्य शक्यतांनी सुसज्ज अशा ईशान्य भारताचे महत्त्व लक्षात घेऊन पर्यटन व हॉटेल व्यवसायाच्या अनुषंगाने आवश्यक असलेले कौशल्य प्रशिक्षण तेथील स्थानिक युवकांना देता येईल.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे समाजाच्या सर्व स्तरातून श्रमप्रतिष्ठा वाढीस लगण्यासाठी जाणीवजागृती निर्माण होणे आवश्यक आहे. आजही कोणताही पालक आपल्या पाल्याला डॉक्टर किंवा इंजिनिअर बनवण्याचेच स्वप्न पाहताना दिसतो आपला मुलगा प्लंबर व्हावा, सुतार व्हावा असे एखाद्याही पालकाला वाटत नाही. वस्तुत: सद्यस्थिती पाहिल्यास आपल्या लक्षात येईल की प्लंबर व सुताराचे आर्थिक उत्पन्न उत्तम दर्जाचे आहे. किंबहुना प्लंबर, सुतार यासारख्या श्रमाधिष्टीत काम करणा-या युवकांना चांगले उत्पन्न मिळत असूनही केवळ सामाजिक प्रतिष्ठेच्या कथित दुराभिमानामुळे लग्न ठरविताना वधुपिता आपली मुलगी देण्याचे टाळतानाच दिसतात. हा सुध्दा एक ज्वलंत सामाजिक प्रश्न निर्माण झाला आहे. श्रमजीवी वर्गाला सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी विविध प्रोत्साहनपर पुरस्कार देता येतील.

नॅशनल स्किल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन

एनएसडीसी अंतर्गत ३१ प्रकारचे वेगवेगळे सेक्टर स्किल कौन्सिल स्थापन करण्यात आले असून उद्योगजगताच्या मदतीने विविध प्रकारच्या रोजगारसंधी निश्चित केल्या आहेत. या रोजगारसंधीनुसार विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी पुढाकार घेण्यात आला आहे.

जम्मू काश्मीरमधील युवकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याच्या दृष्टीने एनएसडीसी अंतर्गत कौशल्य प्रशिक्षण देणारी "उडान" ही योजना सुरू करण्यात आली आहे. याशिवाय कौशल्य प्रशिक्षण क्षेत्रात काम करणा-या संस्थांना ६% दराने कर्ज उपलब्ध करून देण्याची सुविधा देऊ केली आहे.

शासकीय व शैक्षणिक स्तरावर कौशल्य विकसनासाठी होत असलेले प्रयत्न देशातील सर्व राज्यांमध्ये सुरू आहेतच. पण खरी गरज आहे ती या दृष्टीने समाजमन तयार होण्याची. देशाच्या विकासात कौशल्य विकासाची किती नितांत आवश्यकता आहे हे धोरणकर्त्यांनी कितीही वेगवेगळया व्यासपीठांवरून पटवून दिले तरीही चित्र बदलण्यासाठी आणि प्रत्यक्षात शाश्वत व सर्वांगीण विकासाच्या दिशेने वाटचाल सुरू होण्यासाठी समाजातील सर्व घटकांनी आपला सक्रिय सहभाग नोंदविणे आवश्यक आहे.

शाळा, शिक्षक, महाविद्यालय, प्राध्यापक, विद्यार्थी, पालक शिक्षणतज्ज्ञ, देशातील सर्व विद्यापीठांचे कुलगुरू, व्यावसायिक प्रशिक्षण देणाऱ्या शासकी व खाजगी शिक्षण संस्था, लोकप्रतिनिधी, प्रसारमाध्यमे, औद्योगिक कारखाने, उत्पादन व सेवा क्षेत्रातील प्रतिनिधींनी कौशल्य निर्मितीस चालना देण्यासाठी पुढाकार घ्यायला हवा. देशाच्या विकासात आत्तापर्यंत महाराष्ट्राचा फार मोठा सहभाग राहिलेला आहे तो असाच कायम ठेवण्यासाठी या सर्व बाबींवर त्वरेने कालबध्द कार्यक्रम आखून अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. असे घडल्यास "स्किल इंडिया" ही देशाची ओळख जगासमोर निर्माण होईल.

■■■

*लेखक "यशस्वी ग्रुप" या स्किल डेव्हलपमेंट क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थेचे अध्यक्ष आहेत*

email: vishwesh.yashaswi@gmail.com

# मिश्रित शिक्षणाद्वारे कौशल्य संपन्न भारत- एक पुरोगामी प्रयत्न

शरण्या रमेश
एम साई राम

**''कौशल्य विकासावरील इलेक्ट्रॉनिक माहितीचे खुले व्यासपीठ विकसीत केले जाईल जेथे उपयुक्त ठरणारी माहिती लोकांकडून मिळवली जाईल. उच्च दर्जाच्या माहितीच्या एकत्रीकरणासाठी यंत्रणा कार्यन्वित केली जाईल. विवीध व्यावसायीक प्रशिक्षणासाठी प्रशिक्षक/प्रशिक्षण संस्थांना या माध्यमातून प्रमाणित प्रशिक्षण साहित्य उपलब्ध होईल. सहज उपलब्धता आणि सुविधेसाठी भागधारकांना मोठ्या प्रमाणावर ऑनलाईन मुक्त कोर्स आणि आभासी वर्ग चालू करण्यासाठी प्रोत्साहीत केले जाईल. अपुरी सेवा असलेल्या भागात उच्च दर्जाचे व्यावसायिक प्रशिक्षण देण्यासाठी मिश्रित शिक्षणाचा पुरस्कार केला जाईल.यावरून प्रेरणा घेत पारंपारीक 'ब्रिक एँड मोर्टार दृष्टीकोनाच्या" च्या पलिकडे जाऊन कौशल्य संपन्नतेसाठीचे वेगवेगळे नमुने समजून घेणे आवश्यक आहे. येथे अस्तित्वातील अध्यापनशास्त्र बदलण्याची संकल्पना नसून पूरक अध्यापनशास्त्र स्वीकारण्याची कल्पना आहे. ज्यामुळे तळागाळात हे उपक्रम सक्षमपणे घेऊन जाणे शक्य होईल. मिश्रित शिक्षण ही अशीच एक पूरक अध्यापनशास्त्र पद्धती आहे.**

देश आर्थिक आणि आशा-आकांक्षा बाबतच्या बदलातून जात असल्यामुळे भारतातील मनुष्यबळाला कौशल्यपूर्ण बनवण्यासाठी एक अमुलाग्र बदल करण्याची गरज आहे. जेंव्हा आपण भारतातील कौशल्या बाबतच्या आव्हानकडे बघतो तेंव्हा या अमुलाग्र बदलाचे महत्व अजून वाढते.

**भारतातील कौशल्या बाबतच्या आव्हानाचे स्वरूप**

१. कौशल्य संपन्न व्यक्ती घडवण्याचे प्रमाण हे लक्षणीय आहे. राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळाच्या (एनएसडीसी) च्या अभ्यासानुसार २०२२ पर्यंत २४ महत्वाच्या क्षेत्रात ११.९२ कोटी कौशल्य संपन्न मनुष्यबळ लागणार आहे.
२. उच्च पातळी कौशल्य प्रकारांची गरज
३. कौशल्य गटांचे लागणारे वेगवेगळे स्वरूप हे देशाच्या भौगोलिक स्थितीनुसार वेगवेगळे असून ते त्या भागातील औद्योगिक मागणीवर अवलंबून असतील ज्यामुळे कौशल्य संपन्नतेसाठी स्थान विषयक धोरणांची गरज आहे.
४. कौशल्य विकासाच्या उपक्रमांचे लक्ष्य असलेली लोकसंख्या ही सुद्धा वेगवेगळ्या शैक्षणिक पार्श्वभूमीमुळे वैविध्यपूर्ण आहे.
५. उच्च शिक्षणा बरोबर व्यावसायिक शिक्षणाची तुलना केल्यास त्याबाबतची असलेली धारणा.
६. मागणी-पुरवठा यातील तफावत मोजण्यासाठी लागणार्या श्रमिक व्यवस्थापन माहिती व्यवस्थेचा अभाव

भारतात जेथे कौशल्या बाबतचे



कोडे हाताळण्यासाठी एककेंद्राभिमुखतेची विचारसरणी वापरली जाते ज्यात फायदे व एकूण कामगिरी मोजण्याच्या पद्धती आहेत तेथे एकसंध दृष्टीकोनाची गरज आहे. यामुळे कौशल्याकडे एक यंत्रणा आणि अभ्यास म्हणून बघितले जाऊन त्याद्वारे नव संशोधन स्वीकारण्याचा मार्ग प्रशस्त होईल.

भारतातील कौशल्याबाबतचा पुढाकार हा कौशल्य व उद्यमशीलता (एमएसडीई) मंत्रालयाकडे आहे. कौशल्या बाबतच्या राष्ट्रीय धोरणाच्या मसुद्याद्वारा कौशल्य विकासाला चालना देण्यासाठी वेगवगळे उपक्रम तयार केले जात असून ज्याद्वारे चक्र आधीच फिरू लागली आहेत ज्यात कौशल्य शक्य करणारे १० मुद्दे आहेत.

- महत्वाकांक्षा
- क्षमता
- प्रमाण
- समन्वय
- संचलन आणि प्रतिबद्धता
- जागतिक भागिदारी
- पोहोच आणि पुरस्कार
- माहिती संभाषण तंत्रज्ञानाची सुरवात
- प्रशिक्षकांचा विकास
- समावेशकता

या १० शक्यता भारतातील

कौशल्याचा अवकाश पुनरुज्जीवित करण्यासाठी कोणताही आशय देत नाहीत. परंतु, सदर यादीतील माहिती संभाषण तंत्रज्ञान हा मुद्दा सर्वात महत्वाचा ठरतो. धोरणाचा मसुदा माहिती संभाषण तंत्रज्ञान शक्यते बाबत स्पष्टपणे म्हणतो की सरकारला कौशल्य व्यवस्थेतील महत्वाच्या कमतरता दूर करू शकणारी अनोखी उत्पादने, उपाय आणि प्रतिकांचाही प्रभावीपणे पुरस्कार करावा लागेल. या मध्ये पुढे असे ही म्हटले आहे की ''कौशल्य विकासावरील इलेक्ट्रॉनिक माहितीचे खुले व्यासपीठ विकसीत केले जाईल जेथे उपयुक्त ठरणारी माहिती लोकांकडून मिळवली जाईल. उच्च दर्जाच्या माहितीच्या एकत्रीकरणासाठी यंत्रणा कार्यन्वित केली जाईल. विवीध व्यावसायीक प्रशिक्षणासाठी प्रशिक्षक/प्रशिक्षण संस्थांना या माध्यमातून प्रमाणित प्रशिक्षण साहित्य उपलब्ध होईल. सहज उपलब्धता आणि सुविधेसाठी भागधारकांना मोठ्या प्रमाणावर ऑनलाईन मुक्त कोर्स आणि आभासी वर्ग चालू करण्यासाठी प्रोत्साहीत केले जाईल. अपुरी सेवा असलेल्या भागात उच्च दर्जाचे व्यावसायिक प्रशिक्षण देण्यासाठी मिश्रित शिक्षणाचा पुरस्कार केला जाईल.

यावरून प्रेरणा घेत पारंपारीक 'ब्रिक एँड मोर्टार दृष्टीकोनाच्या" च्या पलिकडे जाऊन कौशल्य संपन्नतेसाठीचे वेगवेगळे नमुने समजून घेणे आवश्यक आहे. येथे अस्तित्वातील अध्यापनशास्त्र बदलण्याची संकल्पना नसून पूरक अध्यापनशास्त्र स्वीकारण्याची कल्पना आहे. ज्यामुळे तळागाळात हे उपक्रम सक्षमपणे घेऊन जाणे शक्य होईल. मिश्रित शिक्षण ही अशीच एक पूरक अध्यापनशास्त्र पद्धती आहे.

**मिश्रित शिक्षण समजून घेताना**

मिश्रित शिक्षणा बाबत अनेकवेळा पूर्व कल्पित समज असतात. यातील एक महत्त्वपूर्ण समज म्हणजे मिश्रित शिक्षणाला या उपक्रमाला इंटरनेटने चालना मिळाली आहे ज्यात प्रशिक्षण/शाखा अनावश्यक होऊन जातात. परंतू मिश्रित शिक्षण जसे नाव दर्शवते त्यानुसार माहिती संभाषण तंत्रज्ञानाने शक्य केलेले समोरासमोर (प्रशिक्षक, प्रात्यक्षिक सत्र इ.) आणि सहयोगी शिक्षण (संवंगड्यांकडून शिक्षण) यांचे मिश्रण आहे.

संपूर्ण जगात अनेक देश एकत्रित शैक्षणिक आणि कौशल्य प्राधांन्यांसहीत मिश्रित अध्ययनाची सुरवात करत आहेत. यात कोणतेही आश्चर्य नसून मिश्रित शिक्षणाचे एक अध्ययन पद्धती म्हणून मुख्यत्वे खालील फायदे आहेत.

- एकाचवेळी लाखो विद्यार्थ्यांपर्यंत पोहचण्याची क्षमता
- सवंगड्यांकडून शिकण्याच्या संकल्पनेला मिश्रित शिक्षण चालना देते
- मिश्रित शिक्षणात तंत्रज्ञानाचा वापर योग्य स्वरुपात करण्याचा पयत्न होतो

भारताला सुयोग्य असा उपाय शोधण्यासाठी मिश्रित शिक्षण संकल्पने बाबत अजून विचार करण्याची गरज आहे जे अत्यंत महत्वाचे आहे.

**मिश्रित शिक्षणाला भारतात लागू करण्यासाठी चार उपाय**

पारंपारिक कौशल्य विचारसरणीचा दबदबा असलेल्या पटलावर मिश्रित अध्यापनशास्त्रा सारख्या विस्तृत बदलासाठी केंद्रीत धोरणाची गरज आहे. या उपायांचे सदर धोरणांबरोबर नवीन कृतींसहित अस्तित्वात असलेल्या आराखड्यात विलीनिकरणाचे ध्येय असावे. अर्थातच कोणतेही एक धोरण वेगळे कार्य करेल असा कोणताही मध्यवर्ती विचार नाही. सक्षम वातावरण निर्माण करण्यासाठी हे सर्व सर्वंकशपणे कार्य करेल.

**उपाय १ : धोरणाचा मसुदा**

सदर धोरणाचा आराखडा हे स्पष्ट करते की मिश्रित अध्यापन पद्धतीचे सध्याच्या यंत्रणेत विलीनीकरण आवश्यक आहे. आज भारतातील कौशल्य यंत्रणेत प्रचंड बदलाची लाट येत आहे. विवीध क्षेत्रातील कौशल्य परिषदा व्यावसायीक मानके विकसीत करत आहेत जी राष्ट्रीय कौशल्य पात्रता आराखड्याला अनुसरुन आहेत. मिश्रित अध्यापनाचे स्थान दर्शवणाऱ्या एका समावेशक धोरणामुळे अध्यापनशास्त्राच्या स्वीकाराला चालना देईल. त्याबरोबरच प्रशिक्षण देणाऱ्याच्या दृष्टीकोनातुन मिश्रित दृष्टिकोना बरोबर त्यांच्या कॉर्सेसना विलीन करणे शक्य आहे.

धोरणात्मक पातळीवर प्रयत्न केल्यामुळे मिश्रित शिक्षणा बाबत जगभरात चांगले फायदे दिसून आले आहेत. या सगळ्या परिस्थितीत ही नविन संकल्पना रुजवण्यासाठी सरकारने पावले टाकणे अवश्यक आहे. इंग्लडमध्ये एफइएलटीएजी (फर्दर एज्युकेशन लर्निंग टेक्नॉलोजी ॲक्शन ग्रुप) हे एक उत्तम उदाहरण आहे. एफइएलटीएजी ने पुढच्या शिक्षणाच्या बाबतीत तंत्रज्ञान वापरासाठी स्पष्ट शिफारशी केल्या आहेत. एफइएलटीएजीच्या शिफारशींना व्यवसाय नवसंशोधन आणि कौशल्य (बीआयएस) विभागाने मुद्यांनुसार प्रतिसाद देतांना पुढचा मार्ग दाखवला आहे.

आपल्या इथे मिश्रित शिक्षणाबाबत परिक्षणाची प्रक्रीया आणखी कठोर कशी करता येईल याचे उत्तर शोधण्यासाठी धोरणा बाबत मार्ग निघणे आवश्यक आहे. कौशल्य मूल्य साखळीत आणि मिश्रित अध्यापनशास्त्र यांच्या बाबत मुल्यांकन ही अत्यंत महत्वाची बाब आहे. आज भारतात मुल्यांकन हे अनेकवेळा कोणते कौशल्य मिळाले या पेक्षा कौशल्य कसे मिळाले यावरून केले जाते. कौशल्या बाबतचा राष्ट्रीय मसुदा परिक्षणा बाबतचा मार्ग दर्शवतो व त्या नुसार स्वतंत्र्य परिक्षण आणि प्रमाणीकरणासाठी स्वतंत्र

आराखडा असेल ज्यात क्षमता आणि सुविधेसाठी ई-मुल्यांकन केले जाईल. मिश्रित शिक्षण आणि मुल्यांकनासाठी या सर्व संकल्पनांचा मिलाप होऊन धोरणाची दिशा ठरणे आवश्यक आहे.

**उपाय २ पायाभूत सुविधांची उभारणी :**

मिश्रित अध्ययनशास्त्र तळागाळात घेऊन जाणे म्हणजे शक्य असलेल्या सर्व ठिकाणी पायाभूत सुविधा उभारणे असा होत नाही. विविध उद्देशांसाठी भारतात बहुविध पायाभूत सुविधा उभारण्यात आल्या आहेत ज्याचा १००% टक्के वापर होतोच असे नाही. मिश्रित अध्ययनशास्त्राने युक्त कौशल्य घडणीसाठी अशा स्त्रोतांचा वापर भौगोलीक दृष्ट्या विखुरलेली यंत्रणा उभारण्यासाठी करता येऊ शकतो. स्त्रोतांचा अशा प्रकारे वापर केल्यामुळे भौगोलिक दृष्ट्या उपलब्धता आणि असलेल्या स्त्रोतांचा वापर असे दोन फायदे आहेत जे समोरा समोर प्रशिक्षण आणि थेट सत्र आयोजीत करण्यासाठी करता येतात.



**उपाय ३ : पात्र प्रशिक्षकांची घडण**

आज भारतात यंत्रणेला महत्वाचा घटक देणारे पात्र प्रशिक्षक मिळण्यासाठी यंत्रणा निर्माण करण्याची तत्काळ गरज आहे.

कौशल्याच्या जाळ्याचा मिश्रित शिक्षणाद्वारे विस्तार करताना आपल्या भूमिकेतील वेगळेपणा स्विकारणाऱ्या प्रशिक्षकांचे चमू निर्माण करणे गरजेचे आहे. मिश्रित शिक्षणात प्रशिक्षक हा सुविधाकार आणि सल्लागार होतो जो चालक (जसे पारंपारीक प्रशिक्षणा बाबत) होण्यापेक्षा तो प्रशिक्षणार्थ्याला स्वत:च्या पैलूकंडे घेऊन जातो. प्रशिक्षकाच्या पुरवठ्यासाठी अनोख्या स्त्रोतांचा आधार आवश्यक आहे आणि केंद्रीत प्रयत्नांची गरज आहे.

**उपाय ४ : योग्य प्रकारे गुंतवणूक**

कोणत्याही मोठ्या प्रमाणावर घेतलेल्या उपक्रमाने जोम धरून गुंतवणूक होण्यासाठी योग्य मार्ग असणे आवश्यक आहे ज्यामुळे उपक्रमाला योग्य उभारी मिळणे शक्य होईल. मिश्रित शिक्षणाबाबत गुंतवणूक निर्णयासाठी "अशाच क्षेत्रात गुंतवणूक करा ज्यात मोजता येईल असा परिणाम असेल" हे एकच तत्व आहे.

याबाबत एकतर इतर राष्ट्रांबरोबर ज्यांना मिश्रित शिक्षण राबवण्याचा अनुभव आहे वा असे शिक्षण उपलब्ध करण्यासाठी त्या-त्या ठिकाणी पायाभूत सुविधा सुधारण्याचा अनुभव आहे वा मिश्रित शिक्षणाला चालना देणारी मानव संसाधनाची अशी यंत्रणा उभारण्याचा अनुभव आहे, अशा राष्ट्रांबरोबर शाश्वत अशी भागीदारी कदाचित शक्य होईल.

**पुनरावलोकन**

कौशल्य विकासाच्या अनोख्या पद्धतींचा पुरस्कार करण्याची हीच वेळ आहे. बराच काळ व्यावसायिक कौशल्याकडे विकासाकडे एकांगी दृष्टीकोनातून बघितले गेले आहे ज्यामुळे सक्षम अशी मानव संसाधनाची साखळी निर्माण करण्या ऐवजी कौशल्य विकास यंत्रणा या 'अग्निशमन' म्हणून राहिल्या आहेत. भारताला पुढे जाण्यासाठी सर्व पातळीवर आणि क्षेत्रात मानव संसाधनाची गरज आहे. पारंपारीक विचारधारा आणि कौशल्य विकासाच्या नविन मार्गांचा अवलंब ही भारताच्या कौशल्य विकासाच्या आव्हानातील महत्वाचा गुणधर्म आहे. आपल्या रोजच्या जीवनात तंत्रज्ञान एकरुप झाल्यामुळे योग्य परिस्थिती निर्माण झाली आहे. 'मेक इन इंडिया' सारख्या उपक्रम आणि अनेक महत्वाकांक्षी ध्येयांद्वारे सरकारने कौशल्याला साद घालताना पटलाचा विस्तार करण्याची गरज आहे. मिश्रित शिक्षण हे केवळ प्रचलित कौशल्य अध्यापनशास्त्र जोखण्याचा मार्ग आहे.

वर दिलेले उपाय हे केवळ विस्तृत रुपरेषा आहेत ज्यांच्यावर अमलबजावणीला उत्तेजन देण्यासाठी आणखी विचारमंथन करण्याची गरज आहे. उपायांच्या विस्तृत, टप्प्याटप्यांनी आणि पद्धतशीर विकास केल्यामुळे मिश्रित अध्यापनशास्त्र राबवणे शक्य होऊ शकेल. नव्या यंत्रणेच्या विकासापुढे आव्हाने आहेत.त्यावर चाकोरी बाहेरील आणि धाडसी उपायांची गरज आहे. यापुढे, भारतातील कौशल्यविषयक स्थिती उत्साहवर्धक उपायांची साक्षीदार होईल, अशी अशा करूया.

■■■

*लेखिका शरण्या रमेश या शिक्षण आणि कौशल्य विकास या क्षेत्रात सल्लागार आहेत.*

*सह लेखक एम साई राम हे शिक्षण आणि कौशल्य विकास क्षेत्रात कार्यरत आहेत.*

*email : sairam.,@imacs.in*

# कौशल्य विकास आणि व्यावसायिक शिक्षण

स्वाती मुजुमदार

आज भारत हा जगातील सर्वात मोठी वृद्धींगत होणारी अर्थव्यवस्था आहे. भारताला लोकसंख्यीय लाभांशाचा फायदा मिळालेला आहे. भारताला विकसित देश बनवायचे असेल तर आपल्याला कुशल मनुष्यबळाची गरज असून त्याहून अधिक महत्वाचे म्हणजे आपल्या तरुणांना कौशल्य प्रदान करावे लागेल. तरीसुद्धा उद्योग जगताला आवश्यक असलेल्या विविध स्वरुपांच्या कौशल्यांच्या बाबतीत अन्य देशांच्या तुलनेत आपल्याकडे औपचारिक प्रशिक्षित मनुष्यबळाचा अभावच आहे. उदाहरण द्यायचे झाले तर कोरियात ९३ टक्के कामगारवर्ग हा प्रशिक्षित आहे. भारतात मात्र या ना त्या स्वरुपाच्या उपयुक्त कौशल्य प्राप्त असलेल्या कामगारांची संख्या दहा टक्क्यांच्या आसपासच आहे. भारत सरकारला याची जाणीव झाली आणि कुशल भारत बनवण्याच्या उद्देश्याने स्वतंत्र मंत्रालय तसेच राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळासारख्या संस्था स्थापन करून 'स्किल इंडिया' हा व्यापक कार्यक्रम सुरू केला आहे. पंतप्रधानांच्या मेक इन इंडिया या उपक्रमाच्या दृष्टीकोनात गेल्या वर्षभरात कौशल्य विकासावर मोठा भर दिला आहे. २०२२ पर्यंत देशातील ५० कोटी तरुणांना कौशल्य प्रशिक्षण देण्याची सरकारची योजना आहे. उद्योग क्षेत्र, शिक्षण व्यवस्था आणि सरकार या तिघांनी सुवर्ण त्रिकोण तयार केला तरच हे महत्वाकांक्षी उद्दिष्ट साध्य करता येईल.

उद्योग क्षेत्राच्या आवश्यकता आणि कौशल्यातील कमतरता समजून घेण्यासाठी एनएसडीसी सक्रीय भूमिका बजावत असून उद्योग व अन्य भागीदार क्षेत्रांतील तज्ञांचा समावेश असलेली क्षेत्रनिहाय कौशल्य मंडळे स्थापन करण्यात आली आहेत.



कौशल्य विकास आणि व्यावसायिक शिक्षणांसंबंधी विविध मुद्दे आणि् त्यातील आव्हानांवर विचार करुन धोरण तयार करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने नेमलेल्या अशाच एका ११ सदस्यीय समितीचे अध्यक्ष होण्याचे भाग्य मला लाभले.

चार वर्षांच्या आमच्या संशोधनादरम्यान आम्ही या क्षेत्रात असलेल्या हजारो विद्यार्थी आणि प्राध्यापक/ प्रशिक्षकांच्या मुलाखती घेतल्या.त्यातून आमच्या निदर्शनास आलेले काही महत्वाचे मुद्दे खाली दिले आहेत.

**१. व्यावसायिक अभ्यासक्रमांचे अल्पकालीन स्वरूप:** सर्टिफिकेटपासून ते डिप्लोमा आणि नंतर डिग्री अशा उभ्या गतिशीलतेचा त्यात अभाव आहे. याच्या परिणामी, ज्या पालकांना वाटते की आपल्या मुलांमध्ये जन्मजात कौशल्य आहे, ते व्यावसायिक करिअरचा मार्ग निवडण्यासाठी मुलांना प्रवृत्त करत नाहीत. अशा तऱ्हेने व्यावसायिक अभ्यासक्रम मनापासून निवडून कुणी करत नाहीत आणि त्यामुळेच कुशल मनुष्यबळाला प्रचंड मागणी असतानाही या शाखेत प्रवेश घेतलेल्यांची संख्या मर्यादितच असते.

**२. सामाजिक स्वीकारार्हता:**

**उद्योग जगताला आवश्यक असलेल्या विविध स्वरुपांच्या कौशल्यांच्या बाबतीत अन्य देशांच्या तुलनेत आपल्याकडे औपचारिक प्रशिक्षित मनुष्यबळाचा अभावच आहे. उदाहरण द्यायचे झाले तर कोरियात ९३ टक्के कामगारवर्ग हा प्रशिक्षित आहे. भारतात मात्र या ना त्या स्वरुपाच्या उपयुक्त कौशल्य प्राप्त असलेल्या कामगारांची संख्या दहा टक्क्यांच्या आसपासच आहे. भारत सरकारला याची जाणीव झाली आणि कुशल भारत बनवण्याच्या उद्देश्याने स्वतंत्र मंत्रालय तसेच राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळासारख्या संस्था स्थापन करून 'स्किल इंडिया' हा व्यापक कार्यक्रम सुरू केला आहे. पंतप्रधानांच्या मेक इन इंडिया या उपक्रमाच्या दृष्टीकोनात गेल्या वर्षभरात कौशल्य विकासावर मोठा भर दिला आहे. २०२२ पर्यंत देशातील ५० कोटी तरुणांना कौशल्य प्रशिक्षण देण्याची सरकारची योजना आहे. उद्योग क्षेत्र, शिक्षण व्यवस्था आणि सरकार या तिघांनी सुवर्ण त्रिकोण तयार केला तरच हे महत्वाकांक्षी उद्दिष्ट साध्य करता येईल.**

**उद्योग क्षेत्राच्या आवश्यकता आणि कौशल्यातील कमतरता समजून घेण्यासाठी एनएसडीसी सक्रीय भूमिका बजावत असून उद्योग व अन्य भागीदार क्षेत्रांतील तज्ञांचा समावेश असलेली क्षेत्रनिहाय कौशल्य मंडळे स्थापन करण्यात आली आहेत.**

व्यावसायिक आणि कौशल्य विकासाच्या अभ्यासक्रमांकडे तुच्छतेने पाहिले जाते आणि अन्य अभ्यासक्रमांच्या तुलनेत अशा विद्यार्थ्यांना सामाजिक मान्यताही दिली जात नाही.आमच्या अभ्यासात असे निदर्शनास आले की, अनेक विद्यार्थ्यांसमोर जे कौशल्य आत्मसात केले होते, त्यातील अंडर ग्रज्युएट अभ्यासक्रम निवडण्याचा पर्यायच नव्हता. पदवी घेण्याचा पर्यायच नसल्याने बहुतेक विद्यार्थी मध्येच शिक्षण सोडून देतात आणि मानसिकदृष्ट्या खच्ची होतात.

**३. चांगल्या पायाभूत सुविधांचा अभाव आणि अभ्यासक्रमांचा सुमार दर्जा**: कौशल्य प्रशिक्षण देणाऱ्या अनेक संस्था अथवा केंद्रांमध्ये पायाभूत सुविधांचा दर्जा सुमार असतो आणि त्यात सुधारणा केली जात नाही. त्यामुळे उद्योग क्षेत्राला इच्छित कौशल्य आणि प्रशिक्षणासाठी वापरली जाणारी उपकरणे यातील तफावत वाढतच जाते.

**४. प्रशिक्षकांचा सुमार दर्जा**: कौशल्य प्रशिक्षण देणाऱ्या प्रशिक्षकांकडे उद्योगांना कोणत्या प्रकारचे कौशल्य हवे आहे, याचे अद्ययावतज्ञान नसते आणि प्रशिक्षणाची परिणती इच्छित दर्जाची होत नाही. त्यामुळे हे अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना उद्योग जगतातील नोकऱ्या मिळत नाहीत.

**५. उद्योग क्षेत्राकडून पुढाकाराचा अभाव**: विशेषत: लघु आणि मध्यम उद्योग व्यावसायिक प्रमाणपत्र अथवा औपचारिक प्रशिक्षणावर भर देत नाहीत कारण त्यामुळे कधीकधी मनुष्यबळाची किंमत वाढते. काही वेळेला असेही पाहण्यात येते की, लघु आणि मध्यम उद्योग औपचारिक प्रशिक्षित अथवा कुशल कामगाराऐवजी स्वस्तात मिळतात म्हणून अर्धकुशल किंवा अप्रशिक्षित कामगारांना कामावर घेतात.

**६. प्रमाणीकरणाचा अभाव**: अनेक मंत्रालये कौशल्याचे अभ्यासक्रम देऊ करत असल्याने विद्यार्थ्यांच्या मनातील संभ्रम वाढतो आणि त्याचा परिणाम प्रमाणीकरणाच्या अभावात होतो.

या क्षेत्राचा विस्तार आणि यासंदर्भात करण्यात येत असलेल्या विविध उपाययोजना वरील सर्व मुद्दे व क्षेत्राला भेडसावणाऱ्या समस्यांचा विचार न करताच केल्या जात आहेत, असे निरीक्षण नोंदवण्यात आले आहे.

**शिफारशी**

१. व्यावसायिक शिक्षणात प्रमाणपत्र अभ्यासक्रमापासून डिप्लोमा ते पदवी शिक्षणापर्यंत उभी मांडणी तयार करणे. शालेय स्तरापासून ते पदव्युत्तर स्तरापर्यंत पर्यायांचा पुरवठा करणे. अद्ययावत कौशल्याचे प्रशिक्षण देणारे विशेष पदवी अभ्यासक्रम शिकवणारी कौशल्य विकास विद्यापीठ स्थापन करणे. बहुतेक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्याची महत्वाकांक्षा असल्याने अधिकाधिक विद्यार्थी व्यावसायिक शिक्षणाच्या शाखेत येण्यास या विद्यापीठाचा उपयोग होणार आहे.

२. व्यावसायिक शाखेच्या विद्यार्थ्यांना विशेषत: बारावी स्तरावर समकक्षता प्रदान करणे ज्यामुळे ते पदवी अभ्यासक्रमांना जाऊ शकतील व समांतर गतिशीलता पुरवली जाईल.

३. व्यावसायिक प्रशिक्षणाच्या सर्व पैलूंमध्ये उद्योगांची भूमिका वाढवणे

प्रशिक्षणासाठी अद्ययावत उपकरणे पुरवणे, प्रशासन, उद्योग क्षेत्रातून प्रशिक्षक पुरवणे आणि प्रत्येक दर्जाच्या खात्रीसाठी प्रत्येक टप्प्यावर आढावा घेणे.

४. भरती करताना तसेच करिअरमध्ये पुढील प्रगतीच्या वेळेस उद्योगांनी औपचारिक व्यावसायिक प्रशिक्षण आणि प्रमाणपत्रांवर भर दिला पाहिजे.

५. व्यावसायिक अभ्यासक्रम शिकवणाऱ्या विविध संस्थांसाठी एकच प्रमाण अभ्यासक्रम व गुणांकन पद्धती तयार करणे.

६. व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शिक्षक आणि प्रशिक्षकांना औपचारिक प्रशिक्षण देणे ज्यामुळे ते अध्यापनशास्त्र समजू शकतील.

वरील शिफारशींमुळे पालक आपल्या मुलांना व्यावसायिक अभ्यासक्रम शाखांमध्ये प्रवेश घेण्यासाठी प्रोत्साहन देतील व या विद्यार्थ्यांना सामाजिक मान्यता मिळवून देतील, याची खात्री होऊ शकेल. उद्योगांना तयार मनुष्यबळ मिळेल आणि कौशल्याचा दर्जाही सुधारेल.

एनएसडीसीने यासंदर्भात अनेक मोठी पावले अगोदरच उचलली आहेत आणि विविध उपायांद्वारे या समस्यांचे निराकरण सुरूच आहे. कौशल्यवृद्धीसाठी प्रत्येक राज्याचे मंडळ हे प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करत असून सध्याची स्थिती बदलण्यासाठी लक्षणीय प्रयत्न करत आहे.

माझे वैयक्तिक मत असे आहे की, वर उल्लेख करण्यात आलेल्या विविध शिफारशींची अंमलबजावणी करण्याखेरीज विद्यमान शिक्षण व्यवस्थेचे व्यावसायिकीकरण करणे महत्वाचे आहे. उद्योगांच्या गरजांनुसार अभ्यासक्रम विकसित करणे, कौशल्य प्रशिक्षणासाठी पायाभूत सुविधा तयार करणे, अभ्यासक्रम विकसित करण्याच्या सर्व पैलूंमध्ये, प्रशिक्षण देणे, विद्यार्थ्यांचे मूल्यमापन, उद्योगांचा सहभाग घेतला पाहिजे ज्यामुळे विद्यार्थी एकाच वेळेस कौशल्य आणि पदवीही प्राप्त करू शकतील, असे मॉडेल तयार होईल.

■■■

*लेखिका सिम्बॉयसिस फाऊंडेशन च्या उपाध्यक्षा असून त्यांनी व्यावसायिक शिक्षणात पी.एच.डी. केली आहे. अनेक वर्षे संशोधन केले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली सिम्बॉयसिस इंदूर येथे भारताचे पहिले निवासी कौशल्य विकास विद्यापीठ स्थापन करत आहे.*

email: eatodirector@scdl.net

# कौशल्य विकास कार्यक्रम युवा वर्गासाठी आधारभूत उपक्रम

**राजू पाटोदकर**

**मेक इन इंडिया या पंतप्रधानांच्या संकल्पनेला गतवर्षीच म्हणजे २०१४ सालापासून सुरूवात झाली. त्यानुसार भारतात देश विदेशातून उद्योजक व्यवसायवृध्दीसाठी पुढे येत आहेत. वाढती बाजारपेठ, कमी किमतीत उत्पादन करता येईल अशी जागा अथवा ठिकाण आणि कुशल मनुष्यबळ पुरविण्याची क्षमता असा तिहेरी स्त्रोत भारतात उपलब्ध आहे. त्यामुळे विदेशी गुंतवणूकदारांचा ओढा आपल्याकडे आणण्याचा पंतप्रधान आटोकाट प्रयत्न करत आहेत. काही प्रमाणात त्यास यशही आलेले आहे. त्यामुळे मेक इन इंडियाच्या संकल्पनेस अनुसरुन असलेल्या स्कील इंडियाच्या उपक्रमास केंद्र शासनामार्फत सर्वोच्च प्राधान्य देण्यात आलेले आहे.विदेशातील मोठमोठ्या उद्योजकांना भारतात उद्योग स्थापन करण्यासाठी रेड कार्पेट अंथरण्यात येत आहे. त्यांचे कारखाने पुढील काही कालावधीत आपल्याकडे उभे राहतील आणि आपल्या युवा वर्गाला मोठ्या प्रमाणात तेथे रोजगार मिळेल. केवळ अकुशल कामगार म्हणूनच या युवा वर्गाने त्या कारखान्यात काम न करता तेथील तंत्र व आस्थापना शाखेतील इतर विभागांतही कुशल कामगार म्हणून काम करायची संधी आपल्या युवा वर्गाला मिळू शकते.**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधान पदाची सुत्रे हाती घेतल्यानंतर देशाच्या विकासासाठी क्रांतीकारी अशा विविध योजना आखण्यास सुरूवात केली. केवळ योजनांची घोषणा न करता त्या प्रत्यक्षपणे अंमलात देखील आणल्या. पंतप्रधान जनधन योजना असो की स्वच्छ भारत अभियान असो, जनतेला त्या भावल्या. कृषि, महिला, ग्रामीण, अर्थ, शरीरस्वास्थ, युवा, आदींसाठी असलेल्या या सर्व योजनांद्वारे देशाचा चौफेर विकास करण्याचे पंतप्रधानांचे स्वप्न आहे.

तर देशाला जागतिक पातळीवर महासत्ता बनविण्यासाठी आवश्यक असलेला युवा वर्गाचा आधार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अचूक हेरला आणि या युवा पिढीसाठी कौशल्य विकास कार्यक्रम अधिक जोरदारपणे राबविण्याचा महत्वकांक्षी निर्णय घेतला.

**प्रस्तावना**

भारत हा जगातील सर्वात तरुण देश होण्यासाठी आपणास २०२२ पर्यंत वाट पहावी लागणार आहे. त्यावेळेस भारतातील लोकांचे सरासरी वयोमान २९ वर्षे असेल आणि उत्पादन क्षमता असलेले बहुसंख्य मनुष्यबळ केवळ आपल्याकडेच म्हणजे भारताकडे असेल. मात्र हे सर्व होण्यासाठी आपल्याला कौशल्यावर आधारित असलेल्या योजना अथवा उपक्रम याकडे लक्ष देणे क्रमप्राप्त आहे. म्हणूनच २०२२ साली अपेक्षित असलेला युवा भारत होण्यासाठी कौशल्य विकास कार्यक्रम राबविण्यात येत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात तथा अध्यक्षतेखाली या कौशल्य विकास कार्यक्रमाच्या माध्यमातून देशातंर्गत २०२२ पर्यंत ५० कोटी कुशल मनुष्यबळ या योजने अंतर्गत तयार करण्याचा हा महत्वाकांक्षी उपक्रम आहे.

मेक इन इंडिया या पंतप्रधानांच्या संकल्पनेला गतवर्षीच म्हणजे २०१४ सालापासून सुरूवात झाली. त्यानुसार भारतात देश विदेशातून उद्योजक व्यवसायवृध्दीसाठी पुढे येत आहेत. वाढती बाजारपेठ, कमी किमतीत उत्पादन करता येईल अशी जागा अथवा ठिकाण आणि कुशल मनुष्यबळ पुरविण्याची क्षमता असा तिहेरी स्त्रोत भारतात उपलब्ध आहे. त्यामुळे विदेशी गुंतवणूकदारांचा ओढा आपल्याकडे आणण्याचा पंतप्रधान आटोकाट प्रयत्न करत आहेत. काही प्रमाणात त्यास यशही आलेले आहे. त्यामुळे मेक इन इंडियाच्या संकल्पनेस अनुसरुन असलेल्या स्कील इंडियाच्या उपक्रमास केंद्र शासनामार्फत सर्वोच्च प्राधान्य देण्यात आलेले आहे.

विदेशातील मोठमोठ्या उद्योजकांना भारतात उद्योग स्थापन करण्यासाठी रेड कार्पेट अंथरण्यात येत आहे. त्यांचे कारखाने पुढील काही कालावधीत

आपल्याकडे उभे राहतील आणि आपल्या युवा वर्गाला मोठ्या प्रमाणात तेथे रोजगार मिळेल. केवळ अकुशल कामगार म्हणूनच या युवा वर्गाने त्या कारखान्यात काम न करता तेथील तंत्र व आस्थापना शाखेतील इतर विभागांतही कुशल कामगार म्हणून काम करायची संधी आपल्या युवा वर्गाला मिळू शकते. त्यासाठीच हा कौशल्य विकास उपक्रम सुरू करण्यात येत आहे. दिवसेंदिवस वाढत असलेल्या देशातील मनुष्यबळास कौशल्याधारित प्रशिक्षण देऊन त्यांच्या सर्वांगिण कौशल्यामध्ये वाढ करणे हा महत्वपूर्ण उद्देश ठेवून ही योजना आखण्यात आली.

**विभागांचे एकत्रिकरण**

एन.एस.डी.ए. (National Skill Development Agency) एन.एस.डी.सी. (National Skill Development Corporation), एन.एस.डी.एफ. (National Skill Development fund), आणि ३३ एस.एस.सी. (Sector Skill Councils), या सर्वांना कौशल्य विकास मंत्रालयाच्या अंतर्गत समाविष्ट करुन हा कौशल्य विकास कार्यक्रम सुरू करण्यात आला. २०१४-१५ या आर्थिक वर्षात केंद्रामार्फत जवळपास ५८ लाख ७२ हजार ८०० व्यक्तींना प्रशिक्षण देण्यात आले. या शिवाय १६ एप्रिल २०१५ पासून रोजगार आणि प्रशिक्षण विभागालाही या विभागात समाविष्ट करुन घेण्यात आले. त्यामुळे हा उपक्रम मोठ्या प्रमाणात देशात सर्वत्र राबविण्यात येत आहे.

**युवांचा आधार**

मध्यंतरी महाराष्ट्रातील उरण जे.एन.पी.टी. येथे एका कार्यक्रमाच्या निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या भाषणातून देशातील युवकांबद्दल त्यांच्या कार्यशक्ती बद्दल फार महत्वाचा मुद्दा मांडला. “आपल्या देशाचा युवक कोणतेही निर्यातक्षम उत्पादन करण्यास समर्थ आहे. देशातील तरुण वर्गावर माझा मोठा भरोसा असून त्यांना प्रोत्साहन व योग्य वातावरण देण्याची आवश्यकता आहे.” तसेच पंतप्रधानांनी पुढे बोलताना असे सांगितले की, विशेष आर्थिक क्षेत्राच्या माध्यमातून संबंधित भागात मोठ्या प्रमाणात विकास होईल.

भुमिपुत्रांना, तरुणांना रोजगाराच्या मुबलक मोठ्या संधी मिळतील. भुमिपुत्रांना रोजी रोटीसाठी बाहेर जाण्याची गरज भासणार नाही. सर्वसामान्याच्या आर्थिक विकासासाठी त्यांना रोजगाराची संधी, आवश्यकत्या सुविधा, शिक्षण, आरोग्ययास प्राधान्य देणे आवश्यक आहे. अतिशय स्पष्ट शब्दात युवा वर्गाबद्दलची भावना पंतप्रधान महोदयांनी व्यक्त केली. आणि केवळ भावनाच व्यक्त न करता पुढील काळात युवकांना आधार देण्यासाठी कौशल्य विकास उपक्रमासारखा कार्यक्रम प्राधान्याने हाती घेतला ही बाब निश्चितच युवा वर्गाला उल्हासित करणारी आहे.

साधारणत: १५ ते ४५ हा वयोगट युवा म्हणून आपण पाहिला तर यातील घटकाला निश्चितपणे कौशल्य विकास उपक्रमाचा लाभ अपेक्षित आहे. या वयोगटातील व्यक्तींवर असलेली जबाबदारी मग ती कौटुंबिक असो की अन्य कोणती असो. ती पूर्ण करण्यासाठी हा उपक्रम लाभदायक असाच ठरू शकतो.

**महाराष्ट्रातील कौशल्य विकास**

देशाच्या कोणत्याही विकासासाठी महाराष्ट्राचे योगदान फार मोठ्या प्रमाणात राहिलेले आहे. किंबहुना महाराष्ट्र शासनाने राबविलेल्या काही योजना केंद्राने संपूर्ण देशात राबविल्याची उदाहरणे आहेत. त्यामुळे देशाच्या विकासासाठी महाराष्ट्र समर्थपणे पुढे असतो यात शंका नाही. कौशल्य विकास कार्यक्रमात

> कौशल्य विकास कार्यक्रमात महाराष्ट्रानेही आपले योगदान देण्याचे ठरविले असून भारतासाठी २०२२ पर्यंत ५० कोटी मनुष्यबळाची निर्मिती होत असताना महाराष्ट्रातून ४.५० कोटी कुशल मनुष्यबळाचे उद्दिष्ट आहे. यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय शिखर परिषद तर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली राज्य कौशल्य विकास कार्यकारिणी समिती स्थापन करण्यात आलेली आहे. राज्यात सर्वत्र या कौशल्य विकास योजनेचे सनियंत्रण आणि नियोजन तसेच प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था स्थापन करण्यात आली व नोडल एजन्सी म्हणून ही संस्था राज्यात काम करत आहे.

महाराष्ट्रानेही आपले योगदान देण्याचे ठरविले असून भारतासाठी २०२२ पर्यंत ५० कोटी मनुष्यबळाची निर्मिती

होत असताना महाराष्ट्रातून ४.५० कोटी कुशल मनुष्यबळाचे उद्दिष्ट आहे. यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय शिखर परिषद तर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली राज्य कौशल्य विकास कार्यकारिणी समिती स्थापन करण्यात आलेली आहे. राज्यात सर्वत्र या कौशल्य विकास योजनेचे सनियंत्रण आणि नियोजन तसेच प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था स्थापन करण्यात आली व नोडल एजन्सी म्हणून ही संस्था राज्यात काम करत आहे.

राज्यातील युवांना या कार्यक्रमाद्वारे सक्षम करुन त्यांना उद्योग, सेवा आदी क्षेत्रांमध्ये रोजगार, स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्यासाठी प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान राज्य शासनाने स्थापन केले असून २ सप्टेंबर २०१५ रोजी शासन निर्णयाद्वारे त्यास मान्यता दिली.

१५ ते ४५ वयोगटातील युवांचे आवश्यक त्या मागणीनूसार व्यावसायिक कौशल्य विकास (Skill Development) तसेच त्यांच्या अंगी असलेल्या कौशल्यांचे वर्धन (Up-Skilling) त्याचप्रमाणे पुन:कौशल्य विकास (Re-Skilling) करुन त्यांना रोजगारक्षम बनविणे शिवाय त्यातील किमान ७५ टक्के युवांना प्रत्यक्ष नोकरी अथवा स्वयंरोजगार मिळवून देणे. देशाच्या मेक इन इंडिया प्रमाणे राज्याच्या मेक इन महाराष्ट्र या धोरणास अनुसरून राज्यातील वाढत्या औद्योगिकरणाच्या माध्यमातून कुशल मनुष्यबळ पुरवठ्याच्या सहाय्याने उत्पादकता वाढविणे, सतत निर्माण होणारी नव-नविन उद्योगक्षेत्रे, रोजगारांच्या विविध संधी याचा शोध घेऊन त्यानुसार कुशल मनुष्यबळ निर्मिती या खेरीज राज्यातील शिक्षण विभागाशी समन्वय साधून त्यांच्यामार्फत मागणीप्रमाणे कुशल मनुष्यबळ निर्मिती करणे आदी महत्वाचा प्रमुख उद्देश या अभियानात आहे. एवढेच नव्हे तर विविध संस्थामधून उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उच्च व्यवसायिक शिक्षणाची द्वारे खुली करण्यास कौशल्य विकास विद्यापीठाची स्थापना देखील करण्यात येईल. हे सर्व करत असताना समाजातील उपेक्षित घटकांच्या सहभागावरही विशेष भर देण्यात आलेला आहे.

**अपेक्षित क्षेत्रे**

केवळ राज्यच नव्हे तर जिल्हा पातळीवर हा उपक्रम राबविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर यंत्रणा कार्यरत झाली आहे. शासनासोबतच इतर शासकीय व खाजगी उद्योजक, शिक्षण संस्था यांच्यामार्फत या उपक्रमासाठी मदत घेण्यात येत आहे. स्थानिक पातळीवरील गरजेनूसार तेथे निर्माण होणाऱ्या उद्योगाला अपेक्षित कुशल मनुष्यबळाच्या आवश्यकतेनूसार प्रशिक्षण देण्याची ही योजना असल्याने निश्चितच स्थानिक रोजगारात मोठी वाढ होईल व त्याचा दुरगामी सकारात्मक परिणाम दिसून येईल. जवळपास ११ अशी अपेक्षित क्षेत्रे यासाठी राज्यात निवडली आहेत. यात प्रामुख्याने, १) बांधकाम २) उत्पादन व निर्माण ३) वस्त्रोद्योग ४) ऑटोमोटिव्ह ५) आदरातिथ्य ६) आरोग्य देखभाल ७) बँकींग, वित्तसेवा व विमा ८) संघटित किरकोळ विक्री ९) औषधोत्पादन व रसायने १०) माहिती तंत्रज्ञान व संलग्न सेवा आणि ११) कृषि प्रक्रिया आदी क्षेत्रांचा समावेश आहे. या क्षेत्रात आवश्यक असलेल्या कुशल मनुष्यबळ निर्मितीवर विविध संस्था, खाजगी उद्योग, शैक्षणिक संस्था, शासकीय विभाग आदींच्या मार्फत भर दिला जाणार आहे. त्यामुळे निश्चित अशी कुशल मनुष्यबळाची बँक आपल्याकडे तयार होऊन त्याचा उपयोग होणार आहे.

■■■


### विकासात्मक प्रगतीचा महामार्ग

केवळ सात वर्षात ५० कोटी कुशल मनुष्यबळ निर्मिती हे ध्येय गाठण्यासाठी कौशल्य विकास हा महत्वाकांक्षी उपक्रम देशात सर्वत्र राबविण्यात येत आहे. या द्वारे देशाच्या प्रगतीची गती वाढेल यात शंका नाही. कोणतीही प्रगती होत असताना तेथील लोकांचे जीवनमान उंचावणे त्यांच्या आर्थिक सामाजिक स्तरामध्ये बदल होणे क्रमप्राप्त असते आणि कुशल मनुष्यबळ निर्मिती होऊन स्थानिक रोजगारात भर पडली तर तेथे होणारी ही प्रगती कोणीही रोखू शकत नाही. एकूणच देशाच्या आणि त्यासोबत राज्याच्याही प्रगतीसाठी कौशल्य विकास कार्यक्रम हा विकासात्मक प्रगतीचा महामार्ग ठरेल असा विश्वास वाटतो.

*लेखक महाराष्ट्र शासनाच्या माहिती आणि जनसंपर्क विभागात अधिकारी पदावर कार्यरत आहेत.*

email: patodkar@yahoo.co.in

# ‘द कलेक्टेड वर्क्स ऑफ महात्मा गांधी“इलेक्ट्रॉनिक आवृत्तीत उपलब्ध



‘द कलेक्टेड वर्क्स ऑफ महात्मा गांधी’ (CWMG) हे १०० खंडांचे आणि एकूण ५५००० पृष्ठांचे पुस्तक आता इलेक्ट्रॉनिक आवृत्तीत उपलब्ध झाले आहे. ज्यायोगे जगभरातील लोकांना या आवृत्तीचा लाभ घेता येईल. या इ-आवृत्तीचे अनावरण माहिती व प्रसारण, तथा अर्थ मंत्री श्री. अरुण जेटली यांच्या हस्ते ८ सप्टेंबर २०१५ रोजी झाले. या अनावरण प्रसंगी माहिती प्रसारण राज्यमंत्री व निवृत्त लष्करी अधिकारी श्री.राज्यवर्धन राठोड देखील उपस्थित होते. हे अनावरण गांधी पीस फाऊंडेशन, नवी दिल्ली येथे झाले.

या आवृत्तीचे काम मंत्री महोदयांनी गांधी हेरिटेज पोर्टलशी संलग्न केले होते. पोर्टलचे नियंत्रण साबरमती आश्रम संवर्धन आणि स्मारक विश्वस्त मंडळाकडे आहे. भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाने या उपक्रमात विशेष योगदान दिले.

या प्रसंगी बोलताना, मंत्रीमहोदय श्री. जेटली म्हणाले, की, CWMG ची डिजिटल आवृत्ती हा जतन करण्याजोगा अमूल्य राष्ट्रीय ठेवा आहे आणि या डिजिटलीकरणामुळे ते कार्य सर्वा पर्यंत पोहोचेल. ई-CWMGच्या प्रकल्पाला यामुळे अत्यंत महत्व प्राप्त झाले आहे. श्री जेटली म्हणाले की, हा प्रकल्प खुद्द गांधीजींनी स्थापित केलेल्या संस्थांच्या सहयोगाने शक्य झाला. शिवाय या पुस्तकाची हिंदी आवृत्ती ‘संपूर्ण गांधी वाड्.मय’ लवकरच डिजिटल करण्यात येईल.

सप्टेंबर २०११ मध्ये, केंद्राच्या प्रकाशन विभागाने CWMG च्या इलेक्ट्रॉनिक आवृत्तीकरणासाठी अहमदाबाद येथील गुजराथ विद्यापीठाशी सहयोग करार केला होता. या कार्याच्या पर्यवेक्षणासाठी गांधीवादी नेत्यांची नियुक्ती करण्यात आली. यामुळे या प्रकल्पाला सर्वांगाने विश्वासार्हता मिळाली. यासाठी नेमलेल्या समितीमध्ये गुजराथ विद्यापीठाचे माजी कुलगुरु प्रा. सुदर्शन अय्यंगार, प्रख्यात गांधीवादी विचारवंत श्रीमती दिनाबेन पटेल, साबरमती आश्रमाचे विश्वस्त व संचालक श्री. त्रिदीप सुहरुड यांचा यात समावेश आहे.

महात्मा गांधींचा हा कार्यसंग्रह, सन १९५६-१९९४ या काळात केंद्राच्या प्रकाशन विभागाने प्रकाशित केला होता. हा संग्रह, गांधींनी सन १८८४ म्हणजेच कारकिर्दीच्या आरंभापासून ते ३०जाने १९४८ अर्थात त्यांच्या हत्येपर्यंत व्यक्त केलेला व लिहीलेला शब्दान् शब्द नमूद करत असल्याने सर्वांसाठी तो एक संस्मरणीय ऐवज बनला आहे. या संग्रहामुळे महात्माजींचे कार्य लिखित स्वरुपात जगभर पोहचेल, व शैक्षणिक कार्याशी संलग्न राहून संग्रहीत केले जाईल.

■■■


# ●हस्तव्यवसाय आणि शिक्षण●

## गांधीजी आणि प्रशिक्षणार्थी शिक्षक यांच्यात फेब्रुवारी १९३९ रोजी झालेल्या चर्चेतील उतारा

(प्यारेलाल यांचे 'वर्धा स्कीम अंडर फायर'या पुस्तकातून मधून उद्धृत केलेला हा लेख. भारतभरातून आलेल्या पंच्याहत्तर उमेदवारांनी तीन आठवड्यांचा शिक्षक- प्रशिक्षण अभ्यास, वर्धा येथील केंद्रत पूर्ण केला त्यानंतर आपापल्या प्रांतात परतण्यापूर्वी त्यांनी गांधीजींची भेट घेतली.)

गांधीजींना या भेटीपूर्वी एका मित्राने विचारले, या योजनेमागील मध्यवर्ती कल्पना जर शिक्षकांनी विद्यार्थ्यांशी काही न बोलता शिकवावे अशी असेल तर हे मूलभूत शिक्षण चरख्याशी सुसंगत करुन कसे बरे शिकवता येईल ? या भेटीदरम्यान गांधीजींनी उल्लेखनीय उत्तर दिले—

**गांधीजी:** हा तर माझ्यावर केलेला आरोप होय. हे एकदम खरे की मी असे म्हणतो की, या सर्व सूचना या हस्तव्यवसायास मध्यवर्ती ठेवून कराव्यात. जेव्हा तुम्ही वय वर्षे ७ ते १० या वयोगटातील मुलांना उद्योगांच्या माध्यमातून काही शिकवू पाहात आहात तर तुम्ही सुरुवात अशा विषयापासून करावयास हवी की जो हस्तव्यवसायाशिवाय शिकवला जाऊ शकत नाही. हळूहळू तुम्हाला सुरुवातीस वगळलेल्या बऱ्याच गोष्टी पुढे पुढे गवसत जातील आणि इतर गोष्टींचा संदर्भ हस्तव्यसयाशी कसा लावला हेही उमगत जाईल. यामुळे तुम्ही तुमची आणि मुलांची शक्ती बऱ्याच अंशी वाचवू शकाल. आज आपल्यापाशी पुस्तके नाहीत, मार्गदर्शक नाहीत. त्यामुळे आपल्याला थोडे सावध पाऊल उचलले पाहिजे. एक गोष्ट नक्की की तुम्हाला शिक्षकांची मानसिक प्रसन्नता टिकवावी लागेल. जर तुम्हाला या गोष्टींची हस्तव्यवसायाशी सांगड घालता येत नसेल तर त्या गोष्टींशी झुंजत बसू नका तथापि निराश ही हाऊ नका. ते सोडून इतर विषयांबरोबर पुढे चला, ज्यांचा तुम्ही संदर्भ लावू शकता. कदाचित दुसरा एखादा शिक्षक हे काम उत्तम तऱ्हेने करुन संदर्भ जोडण्यात



यशस्वी होईल. जेव्हा अशा अनुभवांचा पूल भक्कम पणे बांधला जाईल– पुस्तके उपलब्ध असतील, आणि पुढे हेच कार्य करणाऱ्यांचे काम सहज सुलभ होईल.

आपल्याला आज शैक्षणिक क्रांतीची गरज आहे. हस्त कौशल्याने मेंदूचा विकास व्हावयास हवा. जर मी कवी असतो तर या पाच बोटांच्या साह्याने काही कविता लिहू शकलो असतो. आपण असा विचारच का करावा, की मेंदूच सर्व काही आहे आणि हातपाय म्हणजे काहीच नव्हे. जे हातापायांना प्रशिक्षित न करता वहिवाटेने शिक्षण घेत राहतात त्यांच्या आयुष्यातले संगीत नक्की हरवते. केवळ पुस्तकी शिक्षण मुलांचे लक्ष एकवटण्यास पुरेसे असत नाही. अशाद्वारे मेंदू केवळ शब्दांचे आवरण परिधान करतो पण मुलांचे चित्त मात्र कोठे तरी दूरवर भरकटत असते. परिणामी ती मुले ती गोष्ट करतात जी त्यांनी करु नये, ती गोष्ट पाहतात जी त्यांनी पाहू नये, ती गोष्ट ऐकतात जी त्यांनी ऐकू नये. अशाप्रकारे निषिद्ध अशा बऱ्याच गोष्टी ते करतात, पाहतात नि ऐकतात. त्यांना योग्य निवड करण्याचे न शिकवल्याने त्यांचे शिक्षण वाया जाते. जे शिक्षण आपल्याला भल्याबुऱ्यांची चिकित्सा करण्यास शिकवत नाही, वा कोणत्या गोष्टी आत्मसात केल्या पाहिजेत व कोणत्या गोष्टी वर्ज्य केल्या पाहिजेत हे शिकवित नाही, ते शिक्षण व्यर्थ होय.

**प्रश्न : श्रीमती आशादेवी यांनी गांधीजींना विचारले की हस्तकौशल्याद्वारे मेंदू कसे प्रशिक्षित करता येतील याविषयी मार्गदर्शन करावे.**

**गांधीजी–** जुनी कल्पना अशी होती की 'हस्तकला' हा अभ्यासक्रमात एक स्वतंत्र विषय शाळाशाळांत सुरु असावा. म्हणजेच हस्तव्यवसाय मूलभूत शिक्षणातून स्वतंत्रपणे हाताळला जावा. मात्र मला हे चुकीचे वाटते. शिक्षकांना हस्तव्यवसाय शिकवले जावे आणि त्यांच्या ज्ञानाची त्या हस्तकलानुभवाशी सांगड घालावी.ज्यामुळे तो शिक्षक त्याचे पूर्ण ज्ञान निवडक हस्तव्यवसायामधून मुलांना वाटू शकेल.

जरा आपण सूत कताईचे उदाहरण घेऊ. जोवर मला अंकगणित येत नाही तोपर्यंत मी किती लांबीचे सूत कातले याचा हिशोब देऊ शकत नाही, किंवा किती फेरे घेंतले वा एकूण किती सूत कातले हे सांगू शकत नाही. त्यासाठी मला अंकांची ओळख हवी. शिवाय भागाकार, गुणाकार, बेरीज आणि वजाबाकी यावयास हवी. अवघड गणितांची उकल करताना चिन्हांचा सढळ वापर हवा. तेव्हाच बीजगणित येऊ शकेल आणि येथेही मी रोमन अंकांऐवजी भारतीय अंकांचा आग्रह धरेन.

आता भूमितीचे उदाहरण पाहू. चरख्याच्या चकतीपेक्षा अजून कोणत्या गोलाने भूमितीतील वर्तुळाचे विश्लेषण करता येईल. मी युक्लिडच्या नावाचा साधा उल्लेखही न करता 'वर्तुळ' व संबंधित परिभाषा शिकवू शकतो.

आता तुम्ही मला विचाराल की, भूगोल व इतिहास सूत कताईद्वारा कसा शिकवला जाईल? अलिकडेच माझ्या वाचनात एक पुस्तक आले 'कॉटन- द स्टोरी ऑफ मॅनकाईंड'. त्या पुस्तकाच्या वाचनाने मी अगदी रोमांचित झालो. मी ते पुस्तक वेड्यासारखं वाचून काढलं. पुस्तकाच्या सुरुवातीस अत्यंत प्राचीन कालखंडाचा उल्लेख आहे. सर्वप्रथम कापूस कोठे नि कसा उगवला, त्याचे वाढीचे टप्पे कसे नि कोणते, दोन देशांतला कापसाचा व्यापार कसा चालतो आणि बरचं काही त्या पुस्तकात लिहीले आहे. जसं मी त्या मुलाला वेगवेगळ्या देशांबद्दल सांगेन तसंतसं असे निरनिराळे देश आणि् त्यांचा इतिहास आणि भूगोल याबद्दल ही सांगेन. त्या देशांमध्ये विविध काळांत आलेल्या राजवटी आणि जे व्यापारी करार झाले त्याबद्दलही सांगेन. कापूस उत्पादक देश आणि कापड वितरक देश वेगवेगळे का आहेत? का प्रत्येक देश कपास उत्पादनाबाबत स्वयंपूर्ण नाही? कापसाची आयात कशी होते? या बाबतचे विचार मला त्यांना कापसाचे अर्थकारण आणि कृषीशास्त्रीय अंगाने माहिती द्यावयास लावतील. यापुढे झालेच तर मी त्यांना कपाशीच्या वेगवेगळ्या जाती सांगेन. त्या कोणकोणत्या प्रकारच्या हवामानात जगतात ते सांगेन, शिवाय त्यांची लागवड कशी करावी, त्यांचे बियाणे कोठून मिळवावे असे बरेच काही सांगेन. चरख्याचा इतिहास सांगत मला पार ईस्ट इंडिया कंपनीच्या स्थापनेपर्यंत माहिती सांगावी लागेल. त्यानंतर इंग्रज इथवर कसे आले, त्यांची इथे सत्ता स्थापना झाल्याने भारताचे किती नुकसान झाले. त्यांच्यामुळे भारताच्या सूत उद्योगांची कशी अधोगती झाली, व्यापाराचा अजेंडा घेऊन इथवर आलेले इंग्रज नंतर कसे भ्रष्ट राजकीय अभिलाषेत बरबटले. मुघल आणि मराठ्यांचा पाडाव होण्यास इंग्रजांची सत्ता स्थापना हेच कसे मुख्य कारण झाले, आणि त्यानंतर लोकजागृतीसाठी आपली जनता कशी पेटून उठली हा सारा इतिहास ओघाने सांगता येईल. या नव्या शिक्षणप्रणालीच्या कक्षा फार विस्तारलेल्या आहेत. आपण हस्तव्यवसायातून कोणताही विषय सहज समजावून देऊ शकतो. महत्वाचे हेच की कोणताही भार मुलांच्या मनावर न लादता आपण त्याला प्रवीण करु शकतो.

आता मी या कल्पनेचा पुढे विस्तार करतो. एक चांगला जीवशास्त्रज्ञ होण्यासाठी केवळ जीवशास्त्रच नव्हे तर इतरही शास्त्रे शिकावी लागतात. मात्र शिक्षण हे एक मूलभूत विज्ञान आहे असे गृहीत धरले तर ते आपल्याला विविध अंगांनी शिकण्यास प्रवृत्त करेल. येथे पुन्हा चरख्याचे उदाहरणही आपल्याला घेता येऊ शकेल. शिक्षकाने चरख्याच्या यांत्रिक प्रक्रियेवर जोर देण्यापेक्षा त्याच्या


> केवळ पुस्तकी शिक्षण मुलांचे लक्ष एकवटण्यास पुरेसे असत नाही. अशाद्वारे मेंदू केवळ शब्दांचे आवरण परिधान करतो पण मुलांचे चित्त मात्र कोठे तरी दूरवर भरकटत असते. परिणामी ती मुले ती गोष्ट करतात जी त्यांनी करु नये, ती गोष्ट पाहतात जी त्यांनी पाहू नये, ती गोष्ट ऐकतात जी त्यांनी ऐकू नये. अशाप्रकारे निषिद्ध अशा बऱ्याच गोष्टी ते करतात, पाहतात नि ऐकतात. त्यांना योग्य निवड करण्याचे न शिकवल्याने त्यांचे शिक्षण वाया जाते. जे शिक्षण आपल्याला भल्याबुऱ्यांची चिकित्सा करण्यास शिकवत नाही, वा कोणत्या गोष्टी आत्मसात केल्या पाहिजेत व कोणत्या गोष्टी वर्ज्य केल्या पाहिजेत हे शिकवित नाही, ते शिक्षण व्यर्थ होय.

इतर अंगांकडे लक्ष द्यावयास हवे. हा चरखा पितळेपासून का बनविला आहे, त्याला स्टीलचा आस का आहे? अशी प्रश्नावली तयार झाली पाहिजे. खरंतर मूळचा चरखा हा अन्य माध्यमातूनही बनवला जाई. फारपूर्वी तर चरख्याचा आस लाकडापासून बनवला जाई व चकती मातीची असे. जसजशी चरख्याची वैज्ञानिक विचारांनी प्रगती झाली तसतशी ती चकती आज पितळ, स्टील पासून बनवली जाऊ लागली. यामुळे ते मूल असे ठराविक धातूचा उपयोग करण्यामागचे कारण शोधून काढेल. ज्यायोगे ते गणिताविषयी बरेच ज्ञान मिळवेल अगदी अभियंता होईल. आणि चरखा जणू कामधेनू अर्थात इच्छिलेले सर्व काही विपुलहस्ते पुरवणारी गाय वाटू लागेल. ह्या माध्यमाने शिकवल्यास ज्ञानाच्या कक्षांना कोठेही अडचण येणार नाही. फक्त तुमची ऊर्जा आणि कामाबद्दलची खात्री इतकीच काय ती मर्यादा. तुम्ही येथे ३ आठवड्यांकरिता आला आहात. तुम्ही ही योजना गांभीर्याने राबवायची ठरवली तर या काळाचा सदुपयोग करुन घेऊ शकता, त्यासाठी तुम्हाला अगदी स्वत: 'करा किंवा मरा' अशा दृष्टीने काम करण्याची गरज आहे.

मी वारंवार सूत कताईचे उदाहरण देतो ते यासाठी की, ते मी नीट जाणतो. जर मी सुतार असतो तर मी माझ्या या लेकरांना सुतारकामातून शिक्षण देऊ केले असते.

आजची खरी आवश्यकता आहे शिक्षतज्ज्ञानांची. असे शिक्षण तज्ज्ञ जे उत्साहाने भारावलेले असतील तथा दिवसेंदिवस हाच विचार करतील की मी माझ्या शिष्यांना कोणते नवनवीन ज्ञान पूरवू शकतो. शिक्षक ते ज्ञान केवळ मोठमोठ्या ग्रंथांतून,खंडांतून मिळवू शकत नाहीत. त्यास ते स्वत:च्या निरीक्षणातून आणि विचारातून मिळवावयाची गरज आहे. ते ज्ञान पुढे मुखावाटे आणि हस्तव्यवसायाच्या मदतीने ते मुलांपर्यंत पोचवू शकतात. हीच खरी क्रांती असेल शिक्षण पद्धतीत आणि शिक्षकी व्यक्तिमत्वातही.......

**प्रश्न: प्रशिक्षणार्थी शिक्षकांना अगोदर हस्तकौशल्ये शिकवणे आणि त्यानंतर त्यांना हवी तितके स्वातंत्र्य बहाल करणे अधिक उचित ठरणार नाही का ? कारण ह्या नव्या पध्दतीचा**



**अवलंब करता त्या प्रशिक्षणार्थींना शिक्षक होण्याअगोदर प्रथम स्वत:स ७ वर्षाइतके होऊन हे सारे ज्ञान आत्मसात करावे लागेल आणि या सा-या प्रक्रियेत बराच वर्षांचा कालावधी व्यतित होईल.**

गांधीजी - नाही. अशी अनेक वर्षे नाही लागणार यासाठी. समजा एखादा शिक्षक माझ्यापाशी आला ज्यास गणित - इतिहास आदी विषयांचे व्यावहारिक ज्ञान आहे. तर मी त्यास फळे बनवणे वा सूत कताई शिकवेन. या ठराविक हस्तकौशल्यात तो त्याचे ज्ञान भरेल व ही कला हस्तगत करेल.

त्यास इतका वेळ मुळीच लागणार नाही. चला अजून एक उदाहरण घेऊ. समजा मी माझ्या ७ वर्षाच्या मुलाबरोबर शाळेत जातो आणि दोघेही सूत कताई शिकतो. त्यावेळेस मी माझे पूर्वीचे अनुभवज्ञान या ज्ञानाशी संबंध जोडेन. पण त्या मुलासाठी मात्र सारेच नवे असेल. ७० वर्षांच्या वडिलांसाठी ही असेल पुनरावृत्ती. पण तो मुलगा, तो आपले पूर्वीचे ज्ञान कसे बरे जोडेल या नव्या कलेत. परिणामी त्यास हे ज्ञान अवगत करण्यास अधिक काल लागेल. काही आठवडेही लागतील. म्हणूनच जोवर शिक्षक स्वत:मध्ये त्या ७ वर्षाच्या मुलातील उत्सुकता रुजवत नाही. तोवर तो निव्वळ यंत्रज्ञ जन्मास येईल शिक्षक म्हणून नव्हे. जे या नव्या शिक्षणप्रणालीस अभिप्रेत नसेल.

**प्रश्न: ही प्राथमिक शिक्षण पध्दती मूख्यत: ग्रामीण भागांसाठी आहे. मग ही पध्दती शहरांसाठी नाहीच का? त्यांनी शिक्षण जुन्याच पध्दतीने मार्गक्रमण करत मिळवावे का?**

गांधीजी - हा अत्यंत उचित व चांगला प्रश्न आहे पण हे मी अगोदरच 'हरिजन'मधील स्तंभलेखनातून मांडलेले आहे. आपण आजच्या पुरता विचार केला तर तो पुरेसा असेल. आज पुरेसा मोठा घास आपल्यापाशी आहे. जो असा, की आज आपण ७ लाख गावांचा शिक्षण विषयक प्रश्न सोडवला तर आजच्या पुरता प्रश्न नक्की सुटेल. हे अगदी खरेच की शिक्षणतज्ज्ञ शहरांबद्दलही विचार करत असतील पण जर आपण शहराचा प्रश्न गावांबरोबर विचारात घेतला तर आपला निष्कारण शक्तीव्यय होईल.

**प्रश्नः समजा आपण आपल्या गावात वेगवेगळे हस्तव्यवसाय शिकवणा-या तीन शाळा आहेत आणि पाल्याची आवड तीनपैकी एकात आहे तर त्याने काय केले पाहिजे?**

गांधीजी - असे अतिव्यापन होता कामा नये. आपली गावे एका पेक्षा अधिक शाळा असणारी नाहीत. मात्र काही मोठी गावे आहेत ज्यात एकाहून अधिक शाळा आहेत.मात्र त्या दोन्हीकडे सारखेच शिकवले गेले पाहिजे. पण तसा दंडक मात्र नक्की नसावा. अनुभवासारखा मार्गदर्शक नाही. विविध हस्तव्यवसायांत लोकप्रिय होण्याची क्षमता आहे, मुलांमधील सुप्त कार्यक्षमतेचा विकास करण्याचीही क्षमता आहे, केवळ गरज आहे ती याचा शोध घेण्याची.

या मागे हेतू असा आहे की, तुम्ही कोणताही हस्तव्यवसाय निवडा, मुलांची पूर्ण व सर्वांगीण गुणवत्ता तेथे खरी उतरवयास हवी. फक्त ती कला गावातच विकसित झालेली असेल व त्याचा विनियोगही तेथेच पाहावयास मिळू शकेल.

**प्रश्नः जर एखादे मूल मोठेपणी वेगळ्या व्यवसायाचा स्वीकार करणार असेल तर त्या मुलाने त्याच्या जीवनातली सुरुवातीची ७ वर्षे का बरे अशा हस्तकला कौशल्यांत व्यतित करावीत ? उदा. एखाद्या बँक अधिका-याचा मुलगा जो मोठेपणी कदाचित बँकिंग व्यवसायच स्वीकारणार असेल, तर त्याने ही ७ वर्षे सूत कताई का बरे करावी?**

गांधीजी- हा प्रश्नच योग्य नाही. या शिक्षणप्रणालीच्या मूळ हेतूकडे हा प्रश्न दुर्लक्ष करतो आहे. येथे येणारे प्रत्येक मूल काही हस्तव्यवसाय शिकावयास येत नाही. ते तेथे हस्तव्यवसाय माध्यमाने मूलभूत शिक्षण घेण्यास येते. मला खात्री आहे ती असे ७ वर्षे असे शिक्षण घेणारा मुलगाही सर्वसाधारणपणे शिक्षण घेणा-या मुलांपेक्षा उत्तम बँक अधिकारी होईल. उलट बँकिंग स्कूलमध्ये जाऊन शिक्षण घेणारा मुलगा तुलनेने कमी पडेल कारण त्याच्या सर्व कार्यक्षमतांचाा योग्य विकास झालेला नसेल. पूर्वग्रह कायमच वाईट. त्यामुळे तुम्ही या नव्या शिक्षण प्रणालीची ही मध्यवर्ती कल्पना विसरता कामा नये की हा निव्वळ हस्तव्यवसाय नव्हे. हे प्राथमिक अवस्थेत हस्तकौशल्याच्या माध्यमाने देण्यात येणारे संपूर्ण शिक्षण होय.

**प्रश्नः प्रत्येक शाळेत एकाहून अधिक हस्तव्यवसाय शिकवणे श्रेयस्कर नव्हे काय? एकच कला महिनोन् महिने व वर्षानुवर्षे शिकून शिक्षक कंटाळणार नाहीत काय?**

गांधीजी - जर एखादा शिक्षक मला मुलांना शिकवताना महिनाभरात कंटाळलेला जाणवला तर मी त्यास बडतर्फ करेन. जसे एखाद्या वाद्यातून पुन्हा पुन्हा नवनवे संगीत वाजते त्याप्रमाणे शिक्षणातून प्रसन्नता वजा होता कामा नये. एकापेक्षा अधिक कला शिकवल्याने मुले चंचल होतील. अगदी माकडाप्रमाणे. जे एकाहून दुसऱ्या झाडावर उड्या मारत असते. पण हे मी अगोदर चर्चेदरम्यान म्हटले आहे, की सूत कताई शास्त्रीय दृष्टीने शिकवल्याने सर्व बाजूंची इतर शास्त्रे शिकवली जातात. लवकरच ते मूल या योगे स्वत:चा चरखा तयार करेल. पुनश्च मला इथे हेच सांगावसे वाटते की, शिक्षकांनी हाती घेतलेले हस्तकौशल्य पूर्ण शास्त्रीय अंगाने, विविध मार्गांने शिकवल्यास पाल्याच्या सर्वांगीण प्रगतीत त्याचे योगदान असेल.

**शेगाव, फेब्रुवारी ९, १९३९**

**'हरिजन' १८-०२-१९३९ आणि ४-०३-१९३९**

**(द कलेक्टेड वर्क्स ऑफ महात्मा गांधी खंडः LXVIII ऑक्टोबर १५, १९३८, फेब्रुवारी २८,१९३९)**


## लेखकांना आवाहन

योजना मासिकासाठी लेख पाठवितांना लेखकांनी खाली नमूद केलेल्या फॉन्ट पैकी कोणत्याही एका फॉन्ट मध्येच आपले लेख पाठवावेत.

UNICODE or KRUTI DEV or APS or Mangal or DVTT or SHIVAJI or SHREE LIPI, हे नम्र आवाहन.

# आपला वारसा जपताना हातमागाचे संरक्षण आणि पुरस्कार

- मोनिका एस. गर्ग



**आज हातमाग क्षेत्रात ४ दशलक्ष कामगार विणकाम आणि पूरक उद्योगात कार्यरत असून त्यात मोठा टक्का हा अनुसुचित जाती आणि जमाती, महिला यांचा आहे. कृषी क्षेत्रानंतर हा रोजगाराचा दुसऱ्या क्रमाकांचा मोठा स्त्रोत आहे. हा उद्योग पर्यावरण स्नेही आहे त्याचबरोबर विकेंद्रीत आणि ग्रामीण भागात वसलेला आहे जो आपल्या विकसनशील अर्थव्यवस्थेसाठी महत्वाचा आहे. परंतु २०१० ची जनगणना हातमागा बाबत निराशा करणारा कल दर्शवते. विणकरांचे प्रमाण ७% प्रती वर्ष इतक्या वेगाने घटत असून त्यांची संख्या कमी होत चालली आहे. विणकरांची पुढची पिढी ही साशंक असून त्यांना पिढीजात व्यवसायात रस नाही. यावरून असे दिसते की हातमाग अस्ताकडे चाललेला उद्योग आहे.या घसरणीची अनेक कारणे आहेत. जनगणनेनुसार एक विणकर प्रती महिना रु.३,४०० कमावतो त्याचवेळी कोणत्याही कामगाराचे भारतातील सरासरी मासिकउत्पन्न हे रु.४,५०० आहे. जर कारागीराचा उत्कर्ष होऊ शकला नाही तर कला ही मृत होत जाईल.**

हातमाग क्षेत्र बदलत्या काळाला अनुसरुन कसे राहील हा केवळ शैक्षणिक कुतुहलाचाच भाग नाही तर या क्षेत्राच्या विविध पैलूंना समजुन घेणे आणि त्यानुसार धोरणे बनवणे हे ही महत्वाचे आहे. जुन्या काळातील परंपरेला संतुलितपणे पुनरुज्जीवित करणे, उत्पन्नाची पातळी वाढवणे, रोजगाराकडे जास्त लोकांना आकर्षीत करणे, हातमागातील श्रम कमी करणे, आयात सुधारणे आणि समाजाची मानसीकता बदलणे अशा या बाबतच्या पैलूंवर केंद्रीत योजना बनवण्याची गरज आहे. एकदा हे मुद्दे स्पष्ट झाले की प्रत्येकाचे केंद्रीत उपायांद्वारे निराकरण करणे शक्य आहे.

एक महत्वाचे उत्पादन म्हणून जसा जरी हे वधूच्या वस्त्रांचा अविभाज्य भाग आहे तसाच हातमाग हा आपल्या सांस्कृतीक ठेव्याचा अविभाज्य भाग आहे. रूग्वेद, महाभारत आणि रामायणात विणकामा बाबत विषद केले आहे. विणलेले वस्त्र, हाडांची सुई आणि रिळे ही मोहें-जो-दारो आणि हप्पा येथे सापडली आहेत. इजिप्त मधिल गुहेत गुजराती प्रकारचा खंडामध्ये रंगवलेला धाग्याचा तुकड्याचा अवशेष भारतीय पणन वस्त्रोद्योगाला ख्रि.पु. १९ व्या शतकातील मागणी सिद्ध करतो.


ही उच्चगुणवत्तेची परंपरा हाताने विणण्याच्या कलेत पिढ्यानपिढ्या कसलेल्या कारागिरांनी जतन केली आहे. आज हातमाग क्षेत्रात ४ दशलक्ष कामगार विणकाम आणि पूरक उद्योगात कार्यरत असून त्यात मोठा टक्का हा अनुसुचित जाती आणि जमाती, महिला यांचा आहे. कृषी क्षेत्रानंतर हा रोजगाराचा दुसऱ्या क्रमाकांचा मोठा स्त्रोत आहे. हा उद्योग पर्यावरण स्नेही आहे त्याचबरोबर विकेंद्रीत आणि ग्रामीण भागात वसलेला आहे जो आपल्या विकसनशील अर्थव्यवस्थेसाठी महत्वाचा आहे.

परंतु २०१० ची जनगणना हातमागा बाबत निराशा करणारा कल दर्शवते. विणकरांचे प्रमाण ७% प्रती वर्ष इतक्या वेगाने घटत असून त्यांची संख्या कमी होत चालली आहे. विणकरांची पुढची पिढी ही साशंक असून त्यांना पिढीजात व्यवसायात रस नाही. यावरून असे दिसते की हातमाग अस्ताकडे चाललेला उद्योग आहे.

या घसरणीची अनेक कारणे आहेत. जनगणनेनुसार एक विणकर प्रती महिना रु.३,४०० कमावतो त्याचवेळी कोणत्याही कामगाराचे भारतातील सरासरी मासिकउत्पन्न हे रु.४,५०० आहे. जर कारागीराचा उत्कर्ष होऊ शकला नाही तर कला ही मृत होत जाईल. एखाद्या चित्रकार वा कलाकारा प्रमाणे विणकर समाजालाही उच्च स्थान मिळणे आवश्यक आहे. हाताने विणलेले उत्पादन हे अनोखे असते ज्यात धागा मनापासून, संयम, सुरेखपणे आणि कौशल्याने पूर्ण भरला जातो. त्यामुळे तो तोडीसतोड मानधनाचा हक्कदार आहे. हातमाग क्षेत्रातील जमेच्या बाजुवर भर देऊन हे साध्य करता येईल. पारंपारीक हातमाग उत्पादनांच्या प्रमाण आणि वैविध्यामुळे भारताला जगात हेवा वाटण्याजोगे स्थान आहे. जगातील ८५% हातमाग उत्पादने ही भारतात होतात. श्रीलंका, नेपाळ, बांग्लादेश, कंबोडिया आणि इंडोनेशिया हे हातमागाचे इतर उत्पादक देश खूप कमी प्रकारची उत्पादने बनवतात जे मुख्यत्वे देशांतर्गत वापरासाठी आहेत. याउलट भारताचे हातमाग उत्पादन ची निर्यात जी २००९-१० मध्ये २६० दशलक्ष अमेरीकन डॉलर होती ती ४०टक्क्याने वाढून २०१३-१४ मध्ये ३७० अमेरीकन

डॉलर एवढी आली. ही वृद्धी या क्षेत्राची प्रचंड क्षमता दर्शवते. पारंपारीक परिपूर्ण सांस्कृतीक वारसा आणि लोकसंख्येच्या फायद्यामुळे जगातील हाताने बनवलेल्या उत्पादनांची मागणी पुर्ण करण्याची क्षमता भारतात आहे. यासाठी काळाची गरज ओळखून मागणी नुसार पुरवठा करण्याची





दृष्टीकोनाची गरज आहे जी बहुविध, वेगाने बदलणारी आणि जटील आहे. विणकाम उद्योगामध्ये आपल्या संपन्न परंपरेचे प्रतिबिंब रित्वायला हवे पण त्याच बरोबर आधुनिक रचना आणि प्रवाहांनाही या उद्योगाने सामावून घ्यायला हवे.

एखद्या बनारसी वा चंदेरी विणकराने साडी जर काल सुसंगत केली तर तो जास्त कमावतो. त्याने जर निर्यात करण्याजोग्या स्टोल, स्कार्फ, टाय, बेल्ट, बॅग्ज, पाऊच आणि हँड बँड वा उशांची कव्हर्स, टेबलाची कापडे आणि पडदे अशा घरगुती उत्पादनासारख्या विवीध उत्पादनांची निर्मिती केली तर तो आणखी जास्त कमावु शकतो. अशी उत्पादने आणि विविधता आणण्यासाठी विणकर आणि रचनाकारांमध्ये चांगले सामज्यस्य आवश्यक आहे. क्लस्टर ऍटॅचमेंटचा अभ्यासक्रमात समावेश करून राष्ट्रीय फॅशन तंत्रज्ञान संस्थेने चांगली सुरवात केली आहे. हातमाग आणि त्याच्याशी संबंधित अशा भागांना भेट दिल्यामुळे विद्यार्थी आपल्या अमूल्य परंपरेबाबत जागरुक होतात तर दुसरीकडे मूळ रचनांमुळे विणकर आणि कारागिरांना फायदा होतो. झाबुवा मण्यांच्या बाहुल्या पासून जर इयररिंग आणि कार डोंगल्स बनवले तर त्यास २० पट अधिक किंमत मिळते तर कोस्टर्स आणि नॅपकीन होल्डर्स साठी हाताने बनवलेले तुकडे वापरले तर १०० पट अधिक मूल्य मिळू शकते. विश्लेषणात्मक अभ्यास, करून आणि बाजारपेठेनुसार उत्पादने विकसित केल्यास हा उपक्रम पुढे नेता येऊ शकतो. त्यास अधिकाधिक लोकांपर्यत नेण्यासाठी दिर्घकालीन कार्याक्रम हाती घेणे आवश्यक आहे.

**विवीधता असलेली उत्पादने**

जरी रचनाकार उत्पादनांना मुल्य मिळवून देत असले तरी मुल्य साखळी हा विपणातील महत्वाचा भाग आहे. बाजाराच्या विशिष्ठ भागांच्या विवीध गरजांना ओळखण्यात विणकाम उद्योग अपयशी ठरला आहे. बाजाराची रचना समजुन घेणे, त्याची कदर करणे आणि खुबीने त्याचा फायदा उचलणे आवश्यक आहे. पाटणपटोला, कणी, बालुचारी आणि जामदानी सारखी उपयुक्त उत्पादने विशेष उत्पादने म्हणून विकली गेली पाहिजेत. विणकरांनी मिथके, श्रद्धा आणि प्रतिके यांना एकत्रित गुफल्यामुळे त्या वस्त्राना आकर्षक स्वरुप येते. नक्कल करता न येऊ शकणारी रचना आणि खास प्रकारच्या विणण्याच्या पद्धतीमुळे विणकरांनी सामान्य माणसा पेक्षा श्रीमंत माणसावर लक्ष केंद्रीत केली पाहिजे.विशेष वर्गाला समोर ठेऊन निर्मिती केल्यास विणकरांना बाजारपेठेकडून अपेक्षित मोबदला मिळू शकतो.

**क्लिष्ट रचना- विशेष उत्पादने**

विणकरासमोरील बाजारातील मोठे धोके हे यंत्रमाग आणि स्वस्त आयात उत्पादने आहेत. यंत्रमाग स्वस्त, सोप्या पद्धतीने कमी वेळात कापड उत्पादित करते. त्यातच वापरकर्ता यंत्रमाग आणि हातमाग यातील फरक ओळखू शकत नाही. याचा गैरफायदा घेत ग्राहकांची दिशाभूल करून यंत्रमाग उत्पादने हातमाग म्हणून गुपचुप विकली जाण्याचे प्रकार घडतात. त्यामुळे हातमाग उत्पादनाच्या तत्काळ ब्रँडीगची गरज आहे. हँडलूम मार्क हे खरेदीदाराला उत्पादन यंत्रमाग वा मील मध्ये बनवलेले नसून खरोखर हाताने विणलेले आहे याची खात्री देते. ते उत्पादनाची सत्यता प्रमाणित करते. पण या चिंन्हां विषयी लोकांना खूप कमी माहिती आहे. सामान्य जनतेमध्ये याबाबत जागृती करण्याची गरज आहे. दूरचित्रवाणीवर एखाद्या दैनिक मालिकेच्या वेळी एका ओळीची जाहिरातही संबंधितांना जागरुक बनवू शकेल इतके ते सोपे आहे. जगात आणि देशभरातील सरकार पुरस्कृत प्रदर्शनांमध्ये हँडलुमचे चिन्ह असलेली उत्पादनेच असली पाहिजेत. जागृती वाढवण्या बरोबरच यामुळे खरोखरच्या हातमाग विणकरांना सरकारी योजनांचा फायदा मिळू शकेल.

सामाजिक प्रभाव, वारसा आणि हाताने बनवलेल्या वस्तुंसाठीचे खरे खुरे प्रेम यांमुळे हातमाग टिकाव धरू शकेल. पण हा उपाय रचनाकारांशी संबंध असलेल्या अत्योच्च कौशल्य असलेल्या विणकरांसाठी आहे ज्यांच्या उत्पादनाचा रोख उच्चभ्रू ग्राहकांकडे असेल. असे केवळ २०% विणकर असतील पण महागड्या वस्तूंची निर्मितीत त्याचा वाटा ८०% असतो. जरी हा दृष्टीकोन मर्यादीत गटालाच लाभदायक असला तरी यामुळे विणकरांचे शाश्वत पुनरुज्जिवन शक्य होणार आहे. बाकी ८०% विणकर ज्यांच्यासाठी विणकाम हे उपजिविकेचे ऐकमेव साधन आहे त्यांच्या बाबतीत वेगळी योजना राबवावी लागेल. प्रकारे बघावे लागेल.

**प्रचंड रोजगाराची क्षमता**
**धोके आणि काही हाती घ्यायचे उपाय**

४३ लाखापेक्षा जास्त लोकसंख्येला थेट वा अप्रत्यक्षपणे हे क्षेत्र रोजगार देते याकडे आपण दूर्लक्ष करू शकत नाही. अर्थत या सर्वांना उच्च गुणवत्ता असलेल्या महागड्या वस्तू बनविण्यासाठी आपण लगेचच प्रशिक्षित करू शकत नाही. परंतु अजुनही, ग्रामीण आणि दुर्गम भागातील लोकांसाठी हातमाग हा रोजगाराचा महत्वाचा स्त्रोत आहे. सर्वात मोठा धोका हा यंत्रमाग आणि गिरण्यांकडून आहे कारण जवळजवळ सर्वच हातमाग उत्पादनांची नक्कल यंत्रमागाद्वारे झटपट आणि सहज करता येते. मोठ्या प्रामाणावर उत्पादन करण्यासाठी काही विणकरांनी आपल्या कौशल्यांमध्ये सुधारणाकरण्याचे ठरवले आहे. यंत्रमागाने अशा विणकरांचे आयुष्य सोपे केले आहे कारण यात, अचुकता, कार्यक्षमता आणि वेग वाढू शकतो. तसेच मोठया प्रमाणावर उत्पादन घेता येते.पण यांमुळे इतर अनेक लोकांचा रोजगार हिरावला गेला आहे. देशात विजेचा प्रचंड तुटवडा असताना पर्यायी लाभदायक रोजगाराकडे वा वळू न शकलेल्यांची तसेच यंत्रमाग न स्वीकारू शकलेल्याची मोठी हानी झाली आहे.



अशा परिस्थितीमध्ये या क्षेत्राला साह्यभूत ठरतील आणि लाखो हातमाग विणकरांचा रोजगार सुरक्षित राहील याची काळजी घेणाऱ्या योजना राबवणे आवश्यक आहे. पण विकासाच्या प्रक्रीयेत हातमाग बाधक आहे आणि गिरण्या मधील जन उत्पादन हे जास्त उपयुक्त आहे असा दावा करणर्यांना मी स्पष्टीकरण देऊ इच्छिते. मला इथे हे अधोरेखीत करावेसे वाटते की ही दोन्ही क्षेत्रे वेगळी असून ती तेवढीच महत्वाची आहेत पण तितकीच भिन्न ही आहेत आणि त्यांना स्वतंत्र धोरणांची गरज आहे. या दोन्ही क्षेत्रांनी एकमेकांशी स्पर्धा करणे योग्य नाही. प्रत्यक्षात ती एकमेकांना साध्य करतात आणि पूरक ही आहेत. एक जगाला वस्त्र पुरवठा करू शकते दुसरे लक्षावधी लोकांना रोजगार मिळवून देऊ शकते. आपले सरकार या दोन्ही क्षेत्रांचा पुरस्कार करण्याबरोबरच त्यांना प्रोत्साहीत करत आहे. परंतु हा लेख हातमाग क्षेत्र आणि त्यांची जोपासना या पुरताच मर्यादीत आहे.

यंत्रमाग आणि गिरण्यांपासून हातमागाचे संरक्षण करण्यासाठी हातमाग (उत्पादनासाठी वस्तूंचे आरक्षण) कायदा १९८५ मध्ये पारीत करण्यात आला. सदर कायद्यांतर्गत ११ वस्त्रोद्योगाचे घटक हे हातमागासाठी (विशिष्ठ तांत्रिक निर्देशांसहीत) आरक्षित करण्यात आले व त्यांच्या यंत्रमाग वा गिरण्यातील उत्पादनाला मनाई करण्यात आली. आरक्षण आदेशाचे उल्लंघन केल्यास दंडाची तरतूद आहे.

हातमाग विणकरांना सरकार राष्ट्रीय हातमाग विकास महामंडळाच्या माध्यमातून कमी दरात सूत उपलब्ध करून देतो. सुताचा आवश्यक पुरवठा हातमाग विणकरांना रास्त दरात व्हावा यासाठी अत्वावश्यक वस्तु कायद्यांतर्गत (१९५५) यंत्रणा कार्यन्वित करण्यात आली आहे. यालाच सुताचा गोंडा बंधन म्हंटले जाते. यामुळे हातमागासाठी सुत गिरण्यांना सुताच्या गोंडाचे काही प्रमाणात उत्पादन बंधनकारक करण्यात आले. गिरणी क्षेत्रातील सर्व मुल्य साखळी घटकांनी वरील उपायांना कडाडून विरोध केला आहे. असुरक्षित हातमाग क्षेत्रासाठी या सवलतींना चालू ठेवणे ही काळाची गरज आहे. खरेतर संबंधित यंत्रणा सक्षम करून प्रभावी अंमलबजावणीची गरज आहे.

सदर क्षेत्राला कर्जाची उपलब्धता हा आणखी एक काळजीचा मुद्दा आहे. ३ च्या जनगणनेनुसार ६१% टक्के स्वतंत्र विणकर आहेत तर ३४% हे मुख्य विणकराच्या हाताखाली किंवा खासगी क्षेत्रात कार्य करत आहेत तर केवळ ५% हे संस्थात्मक रोजगारा खाली आहेत. विणकरांच्या माहितीत असे म्हंटले आहे की ते काही फार सधन नाहीत. दलाल, मुख्य विणकर, मध्यस्थांमुळे त्यांना त्यांच्या श्रमाचा योग्य मोबदला मिळू शकत नाही. हातमाग विणकरांकडे पैशाची कमतरता आहेच आणि शिक्षणाच्या अभावा बरोबरच त्यांच्याकडे स्त्रोतांचाही अभाव आहे. औपचारिक कर्जाची उपलब्धता नसल्यामुळे त्यांच्यावरच्या तणावात वाढ झाली आहे

त्यांना भेडसावत असलेल्या या आर्थिक संकटाची दखल घेत सरकारने विणकर आणि सहकारी संस्थांच्या कर्ज माफीसाठी रु.३००० कोटीचे पॅकेज जाहीर केले. याचे ध्येय बंद झालेले कर्जाचे दरवाजे उघडून कर्जासाठी त्यांना पात्र बनवणे हे आहे. नियम आणि निकषाचे सुलभीकरण करून देशातील सर्व राज्यांत एकत्रितपणे फक्त एक हजार कोटी

रुपयांचे कर्ज माफ करण्यात आले आणि हातमाग संस्था व्यतिरीक्त ५०,००० हजार व्यक्तींना याचा लाभ झाला. याची परिणिती अनेकांचे डोळे उघडण्यात झाली. कारण गेल्या अनेक दशकात सदर क्षेत्राला फार कर्ज मिळालेले नाही. यामुळे क्रांतीकारी बदलांची मागणी होऊ लागली आणि सरकारने ६% दराने कर्ज सदर क्षेत्राला उपलब्ध करण्याचा निर्णय घेतला. हे अत्यंत स्वस्त कर्ज भांडवली संपत्ती आणि त्याच बरोबर खेळते भांडवल निर्माण करण्यासाठी वापरता येऊ शकते. प्रामाणीकपणे राबवली गेली तर ही योजना संपूर्ण चित्र पालटवणारी ठरू शकते. यामुळे हातमाग सुताचा अनावश्यक भाग काढून टाकणे, त्यास रंग देणे आदी सुविधा निर्माण करण्याबरोबरच विणकरांना खेळते भांडवल मिळू शकते.



विणकराच्या शैक्षणिक पात्रतेच्या बाबत जनगणने नुसार ८३% विणकर हे एचएसएलसी पातळीच्या खाली आहेत आणि केवळ १७% हे एचएसएलसी वा त्यावरील पात्रता धारक आहेत. हे सर्व मुद्दे चिंता करायला लावणारे आहेत कारण हा व्यवसाय अल्प शिक्षितांसाठी आहे ज्यामुळे त्याबाबत अभिमान रहात नाही. जर पुढची पिढी या व्यवसायात रहायला हवी असे वाटत असेल तर कला, छायाचित्रण, संगीत अशा आधुनिक कलांच्या बरोबरीने हातमागाला मान्यता देणे आवश्यक आहे. याचे पहिले पाऊल म्हणून एनआयएफटी सारखी संस्था हातमागाचे प्रशिक्षण द्यायला सुरवात करू शकते. असे प्रतिष्ठित अभ्यासक्रम खास हातमाग विणकराच्या पाल्यांसाठी सुरू केले जाऊ शकतात. एनआयएफटीचे प्रमाणपत्र त्यात अभिमान निमार्ण करून देईल आणि त्यांचे कौशल्यही सुधारू शकेल. यामुळे त्या कौशल्याचे प्रमाणीकरण होईल ते रोजगार आणि विपणनक्षम होऊ शकेल. कौशल्य एका पिढीतुन दुसर्या पिढीत जाऊ शकले तरच ते क्षेत्र टिकू शकेल आणि त्यासाठीच पुढच्या पिढीचे व्यावसायीक या क्षेत्रात रहाणे आवश्यक आहे.

**हातमाग तंत्रज्ञानाच्या सुधारणेसाठी**

हातमाग (वस्तुंच्या संरक्षणासाठी आरक्षण) कायदा, १९८५ अनुसार "हातमाग म्हणजे यंत्रमागा व्यतिरीक्त विणकामाचा कोणताही माग." भारतीय मानक विभागानुसार "हातमाग हे हाताने चालावून कापड विणणारे यंत्र आहे. हातमाग चालवताना पायाचा देखील वापर होतो. हाताने विणकाम करायच्या प्रक्रीयेचा तांत्रिक तपशील आता आपण पाहू. वर चर्चा केल्या प्रमाणे हातमागा वर विणण्याच्या तीन प्राथमिक प्रक्रीया आहेत: अनावश्यक भाग काढणे,वेचणे, आणि ठोक देणे. अनावश्यक भाग काढण्याच्या प्रक्रीयेत वळलेले धागे वेगळे होऊन हव्या त्या प्रकारात आडव्या प्रकारे ओवण्याची क्रिया होते. वरिल प्रकियेत लांब आडवा धागा टाकणे ही वेचण्याची प्रक्रीया आहे. त्यानंतर आडव्या धाग्याला बोरू ढकलतो वा धक्का देऊन कापड्याशी दुमडून शिवला जातो. या तीन प्रक्रीया विणकर विजेचा वापर न करता करतो. या प्रक्रियांचे विजेचा वापर न करता यांत्रीकिकरण करायला प्रचंड वाव आहे. त्याच बरोबर विणण्याच्या आधीच्या गुंडाळण्याच्या, आकार देण्याच्या प्रक्रियांसाठी आणि विणण्यानंतरच्या प्रक्रियांचे यांत्रीकीकरण शक्य आहे ज्यामुळे कष्टाचे प्रमाण कमी होऊ शकेल. हा भाग अत्तापर्यंत दुर्लक्षित राहिला आहे. या बाबत संशोधन केल्यास हाताने विणण्याचे श्रम कमी करता येऊ शकतात.

हातमागाच्या यांत्रीकीकरणा विषयी देशात मोठ्या प्रमाणावर चर्चा चालू आहे. २०१३ मध्ये नियोजन आयोगाने हातमागाची "विणण्याचे कोणतेही सुधारित माग ज्यात विणण्याची कोणतीही एक प्रक्रीया ज्यात मानवी हस्तक्षेप वा ऊर्जा लागते" अशा प्रकारे पुनर्व्याख्या करण्याची शिफारस केली. मंत्रालयाने संकरीत सुधारित माग ज्यात काही प्रक्रीया विजेच्या वापराने करता येतील त्याची शिफारस केली. याला विणकर समाजाने विरोध केला आणि त्याविरोधात मोठ्या प्रमाणावर आंदोलन झाले.

मी हा विरोध योग्य असल्याचे म्हणेन कारण यात आगामी वर्षांमध्ये हातमागाची कला सुळावर चढली असती. यंत्रमागाची उत्पादने जी आज हातमागाच्या नावाखाली चोरून विकली जातात ती अस्सल हातमागाच्या उत्पादनांशी योग्यप्रकारे स्पर्धा करतील व त्यात त्यांचा पराभव होईल. यंत्रमाग विणकरांनी हातमाग क्षेत्राच्या संवर्धन विकासाच्या सरकारी योजनाचा लाभ घ्यायला हवा होता. यामुळे हातमाग क्षेत्रावरील संकट पुढे ढकलले गेले असते. सुदैवाने २०१४ मध्ये वस्त्रोद्योग मंत्रालयाने "यंत्रमागा व्यतिरीक्त कोणताही विणणारा माग" हे हातमागाची व्याख्या कायम ठेवतानाच त्याच्या पुनर्विचाराची शिफारस केली ज्यामुळे चांगले उत्पादन मिळताना मानवी हस्तक्षेप कमी होईल.

मला येथे सांगावेसे वाटते की सध्याची व्याख्या प्राथमिक आणि दुय्यम

प्रक्रियांमध्ये यांत्रिकीकरण वगळत नाही. यांत्रिकिकरण म्हणजे विजेचा वापर असा अर्थ होत नाही. याचा सोपा अर्थ यांत्रिक उर्जा, साधने आणि तंत्र यांचा वापर कार्यक्षमता वाढवताना श्रम कमी करण्यासाठी करणे होय आणखी सोप्या शब्दात यंत्र वापरणे म्हणजे यांत्रिकी करण होय.

मुळात हातमाग हे एक यंत्रच आहे. पण असे दिसून आले आहे की हातमागाची वैज्ञानिक किवा शास्त्रीय अभ्यासन रचना झालेली नाही. पारंपारिक तंत्र हे श्रमिक प्रक्रीया, पूर्णवेळ सहभाग, शारिरीक अस्वस्थता आणि कमी आर्थिक परतावा असलेले आहे. सर्वेक्षणानुसार अशा घातक प्रक्रियेला सामोरे गेल्यामुळे शरीरात वेदना होतात आणि विणकराच्या हाताचा पंजा, हात आणि पायात मज्जातंतूत तीव्र अडथळे निर्माण होतात. मर्यादीत संशोधन आणि मुळातच मर्यादा असल्यामुळे तंत्रज्ञान फार कमी प्रमाणात आणण्यात आले ही एक चिंतेची बाब आहे. त्याचा परिणाम हस्तविणकाम ही नेहमीच कामगार केंद्रीत आणि तुलनेने कमी प्रमाणात उत्पादन करणारी प्रक्रीया रहाण्यात झाला.

हातमागासाठी कापडाचे उत्पादन वाढवण्यासाठी नविन संशोधन आणि निर्मितीची गरज आहे. यांत्रीकीकरणामुळे विणकराची कार्यक्षमता वाढेल आणि विणलेल्या कापडाचा दर्जा सुधारू शकेल. तांत्रीक सुधारणांचे पहिले पाऊल जॉन के यांनी पेटंट केलेले फ्लाईंग शटल होते. विणकामा क्षेत्राच्याबाबत हा महत्वाचा विकास होता कारण त्यामुळे मानवी कौशल्य अनावश्यक झाले. त्यांनतर विकासाच्या कार्याचा भाग म्हणून डॉबी आणि जॅक्वार्डच्या रुपात जटिल विणकामासाठी असे विवीध नविन तांत्रीक प्रयोग करण्यात आले आहेत. कॅच कॉर्ड सिस्टम भरीव बॉर्डर्स विणण्यासाठी वापरली जाते. यामुळे विणकराची कार्यक्षमता वाढली आहे. मॅट, स्टोल्स इ. विणण्यासाठी कापड दुहेरी पद्धतीने विणण्याची पद्धत आणल्यामुळे आणि दोन वेगळ्या प्रकारचे आडवे धागे विणण्यासाठीच्या मल्टिपल बॉक्स प्रक्रीयेमुळे कमी झाले आहेत.

हातमाग क्षेत्रातील छोट्या केंद्रांनी विणकाम व्यावसायीक पातळीवर न्यावे असे वाटत असेल तर विणकरांना कार्याचा जास्त वेळ काम करावे लागेल. व्यावसाईक उत्पादनासाठीच्या गरजा घरगुती विणकामापेक्षा वेगळया असतात ज्यात कार्य स्थळात काही बदल आवश्यक ठरतात. अर्ध-स्वयंचलीत हातमाग हे सामान्य विणकरासाठी चांगला पर्याय आहेत. यामध्ये आणखी स्वयंचलित क्रियांची भर घालून काम आणखी सुकर करता येऊ शकते.

हातमाग संशोधनासाठी केंद्रीत


## Subscription Coupon

**[For New Membership / Renewal / Change of Address]**

I want to subscribe to :

**Yojana** : 1 Yr. **Rs. 100/-;** 2 Yrs. **Rs. 180/-;** 3 Yrs. **Rs. 250/-**

(Circle the period of subscription)

DD / MO No. ____________ date ____________

Name (in block letters) : ____________

Subscriber profile : Student / Academician / Institution / Others

Address : ____________

PIN : □□□□□□

Please allow us 4 to 6 weeks to the despatch of the first issue.

P.S. : For Renewal / change in address, please quote your subscription number.

**सभासद शुल्क केवळ मनी ऑर्डरद्वारे पाठवावे.**

***Subscription Fee should be send only through MO***

प्रोत्साहन योजनेची गरज आहे. रचना विकास आणि उत्पादन प्रक्रियेतील नविन शक्यता नव्या तांत्रीक शोधामुळे शक्य होतील. यंत्र आणि साहित्य याबत उत्पादन तंत्रज्ञाना वर केलेल्या चर्चेनुसार उत्पादनाचे तंत्र, यंत्रांचा वापर आणि अंतिम उत्पादन वा कच्चा माल यावरील प्रक्रीया असू शकेल. मानवी श्रम, वेळ आणि उर्जा वाचवणारे तंत्रज्ञान ही काळाची गरज आहे. विणकामाच्या माग पुर्व आणि उत्तर सर्व प्रक्रियांचे यांत्रिकीकरण शक्य आहे. विणण्याचे काम नसल्यामुळे त्याच्यासाठी मोटरचा वापर ही करता येऊ शकतो. या तिनही प्राथमिक प्रक्रीया वैयक्तीक स्तरावर बघणे आवश्यक आहे आणि कार्याबाबतच्या संशोधनाद्वारे तांत्रिक सुधारणा आणून विणकराच्या श्रमांची पातळी कमी करता येऊ शकते.

नविन विकासित केलेल्या तंत्रज्ञानाचा स्वीकार हे मोठे आव्हान आहे. याचे मुख्य कारण हे कलेच्या प्रसाराचा अभाव आणि विणकरांच्या पिढीजात पारंपारीक तंत्रज्ञानावरील विश्वासामुळे विणकरांकडून होत असलेली टाळाटाळ हे आहे.यासाठी सरकारी योजनांचा विणकरांना अविभाज्य भाग बनवून त्यांच्यावर लक्ष केंद्रीत करणे आवश्यक आहे. संशोधन आणि विकास आणि त्याची माहिती तळा-गाळा पर्यंत पोहचवणे साध्य झाल्यास हातमाग क्षेत्रात मोठया प्रमाणावर रोजगार उपलब्ध होऊन उत्पादनही वाढेल.

व्यावसायीक पातळीवर तयार केलेल्या कापडाच्या बाबतीत विपणनाची समस्या उभी रहाते. अशा वेळी सरकारने पुढे येणे गरजेचे आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजने बरोबर याक्षेत्राला जोडले जावे अशी मागणी आहे. ही बाब विचार करण्यासारखी आहे. आजतागायत, राज्ये शाळातील विद्यार्थ्यांना आणि अंगणवाडी सेवकांना मोफत गणवेश देतात. त्याठिकाणी हाताने विणलेले कापड वापरण्याचा निर्णय घेतला जाऊ शकतो. हातमाग कामगारांची नोंदणी महात्मा गांधी ग्रामीण रोजगार योजने अंतर्गत केल्यास त्यांना दिलेल्या लांबीचे कापडाचे उत्पादन झाल्यावर पगार दिला जाऊ शकतो जो शाळा आणि आंगणवाडी केंद्रांना पुरवला जाऊ शकतो.

उत्पादनाचा पाया विस्तारणारे तंत्रज्ञान उपलब्ध करणे आणि त्यात विशेष विक्री तत्व जे हातमागाचे वैषिष्ठ्य आणि भावनिक भाग आहे त्याला हानी न पोहचवता सुधारणा करणे हे आपल्या संशोधक आणि शास्त्रज्ञांपुढे आव्हान आहे.

■■■

*लेखिका या भारतीय प्रशासकीय सेवेच्या १९८९ च्या बॅचच्या अधिकारी आहेत. त्यांनी वस्त्रोद्योग क्षेत्रात ७ वर्ष कार्य केले आहे.*

email: monikasgarg@gmail.com

Yojana : Published in Hindi, English, Urdu, Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Punjabi, Bengali, Assamese & Oriya

Send your subscription by DD / MO in the name of Director, Publications Division, addresses to :

**Advertisement & Criculation Manager, Publications Division, Ministry of Information & Broadcasting Room No. 48 to 53, Soochna Bhavan, CGO Complex, Lodhi Road, New Delhi - 110003.**

**Subscriptions will arise also be accepted at our sales emporia:**

● Hall No.196, Old Secretariat, **Delhi-110054,** Ph.011-2389 0205 ● A-wing, Rajaji Bhavan, Besant Nagar, **Chennai-600090,** Ph.: 044-2491 7673 ● 8, Esplande East, **Kolkata - 700069,** Ph: 033-2248 8030 ● Bihar State Co-operative Bank Building, Ashoka Rajpath, Patna-800004. Ph.: 0612-268 3407 ● Press Road, Near Govt., Press **Thiruvananthapuram-695001,** Ph.: 0471-2330 650 ● Hall No. 1, 2nd floor, Kendriya Bhawan, Sector - H, Aliganj, **Lucknow-226024,** Ph.: 0522-232 5455 ● 701, C-Wing, 7th Floor, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, **Navi Mumbai-400614,** Ph.: 022 2757 0686 ● Block 4, 1st Floor, Gruhakalpa Complex, M.G. Road, Nampally, **Hyderabad - 500001.** Ph.: 040-2460 5383 ● 1st Floor, F-Wing, Kendriya Sadan, Koramangala **Bangalore-560034.** Ph.: 080-2553 7244 ● KKB Road, New Colony, House No.7, Chenikuthi, Guwahati-781003, Ph.: 0361-2665 090 ● Ambica Complex, 1st Floor, Paldi, **Ahmedabad - 380007.** Ph.: 079-2658 8669.

**For Yojana Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Bengali, Assamese, Oriya, Urdu and English, Hindi - please enrol yourself with Editors of the respective at the addressess given Below;**


Editor, Yojana (Marathi), B-701, Kendriaya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai-400614. Ph.: 022-2756 6582
Editor, Yojana (Gujarati), Ambika Complex, 1st Floor, Paldi, Ahemdabad-380007. Ph.: 079-2658 8669
Editor, Yojana (Assamese), KKB Road, New Colony, House No. 7, Chenikuthi, Guwahati-781003. Ph.: 0361-266 5090
Editor, Yojana (Bengali), 8, Esplanade East, Ground Floor, Kolkata-700069. Ph.: 033-2248 2576
Editor, Yojana (Tamil), 'A' Wing, Rajaji Bhawan, Basant Nagar, Chennai-600090. Ph: 044-2491 7673
Editor, Yoajna (Telugu), Block No. 4, 1st Flr., Gruhakalpa Complex, M.G.Rd, Nampally, Hyderabad-500001. Ph.:040-2460 5383
Editor, Yojana (Malayalam), Press Road, Near Govt. Press, Thiruvananthapuram-695001, Ph: 0471-233 0650
Editor, Yojana (Kannada), 1st Floor, 'F' Wing, Kendriya Sadan, Koramangala, Bangalore-560034, Ph: 080-2553 7244.

# कौशल्यविकासात वृध्दी करून साधनसंपत्ती आणि क्षमतांचा लाभ मिळवताना

**प्रा. मनोज जोशी**
**डॉ. अरुण बहादुरिया**
**डॉ. शैलजा दीक्षीत,**

**गेल्या काही वर्षांत, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना, राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका मोहीम आणि राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ यांसारख्या व्यापक दारिद्र्य निर्मूलन व पात्रताधारित कार्यक्रमांच्या माध्यमातून समावेशक वाढीला प्रोत्साहन देण्यासाठी सरकार मोठी गुंतवणूक करण्यास उत्सुक आहे. त्याहीपुढे, सर्वंकष भरभराट आणि विकासाचे उद्दृष्ट साध्य करण्यासाठी मेक इन इंडिया ही योजना आहे. वस्तुतः, अशा स्वरूपाच्या योजनांद्वारे, एकीकडे साधनसंपत्तीचा सर्वाधिक वापर केला जातो आणि नवे स्त्रोत निश्चित केले जातात अथवा काही वेळा गरजांवर आधारित संशोधन आणि नवीन उपक्रमांतून तयार केले जाऊ शकतात. कुशल भारत (स्किल इंडिया) हे या दिशेने उचललेले ठोस पाऊल आहे. जेव्हा समूहाच्या उपजीविकेच्या सुरक्षेचा प्रश्न येतो तेव्हा सर्वप्रथम चर्चिला जाणारा गुणविशेष म्हणजे कौशल्यावर आधारित शिक्षण हाच असतो. यशस्वी साहसी उपक्रम आणि कल्याणाकडे जाणारा मार्ग म्हणून कौशल्य, उपलब्धता आणि त्याची सहजसाध्यता (access) यांचाच विचार उपजीविका निर्देशांक करतो.**

आर्थिक विकासाच्या सहाय्याने आर्थिक प्रगतीच्या संदर्भात युवाशक्तीने समृद्ध असलेल्या भारतासारख्या देशात कौशल्य विकासाला सर्वोच्च प्राधान्य देणे अत्यंत महत्वाचे आहे.आर्थिक प्रगती दोन प्रकारे साध्य करता येऊ शकेल, त्यात पहिली म्हणजे आर्थिक विकासाला सहाय्य करून त्यासाठी काम करणाऱ्या सध्याच्या



व्यवस्थांची कार्यक्षमता वाढवणे ही आहे. दुसरी म्हणजे, स्वयंरोजगार असलेले तरुण व व्यावसायिकांना उत्पादकतेचे कौशल्य पुरवून त्यांच्या सहाय्यार्थ असलेल्या पर्यावरणाला नवी चौकट पुरवणे, ज्यामुळे आर्थिक प्रगतीला अतिरिक्त उर्जा मिळेल. या चौकटीत नंतर चर्चा केल्याप्रमाणे दोन्ही उपायांच्या क्षमता आणि मर्यादाही असल्या तरीही या प्रस्तावित धोरणात्मक निबंधात कौशल्य विकास हा मुद्दा चर्चेच्या केंद्रस्थानी आहे. तरीसुद्धा, आर्थिक प्रगती आणि विकासातून साध्य होणाऱ्या आर्थिक भरभराटीसाठी सध्याचे आणि वाढीव कौशल्य संच तसेच साधनसंपत्तीचा जास्तीत जास्त वापर करण्याच्या माध्यमातूनच मार्ग शोधला पाहिजे.

**संस्थात्मक प्रयत्न आणि शिकलेले धडे**

गेल्या काही वर्षांत, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना, राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका मोहीम आणि राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ यांसारख्या व्यापक दारिद्र्य निर्मूलन व पात्रताधारित कार्यक्रमांच्या माध्यमातून समावेशक वाढीला प्रोत्साहन देण्यासाठी सरकार मोठी गुंतवणूक करण्यास उत्सुक आहे. त्याहीपुढे, सर्वंकष भरभराट आणि विकासाचे उद्दृष्ट साध्य करण्यासाठी मेक इन इंडिया ही योजना आहे. वस्तुतः, अशा स्वरूपाच्या योजनांद्वारे, एकीकडे साधनसंपत्तीचा सर्वाधिक वापर केला जातो आणि नवे स्त्रोत निश्चित केले जातात

अथवा काही वेळा गरजांवर आधारित संशोधन आणि नवीन उपक्रमांतून तयार केले जाऊ शकतात.

कुशल भारत (स्किल इंडिया) हे या दिशेने उचललेले ठोस पाऊल आहे. जेव्हा समूहाच्या उपजीविकेच्या सुरक्षेचा प्रश्न येतो तेव्हा सर्वप्रथम चर्चिला जाणारा गुणविशेष म्हणजे कौशल्यावर आधारित शिक्षण हाच असतो. यशस्वी साहसी उपक्रम आणि कल्याणाकडे जाणारा मार्ग म्हणून कौशल्य, उपलब्धता आणि त्याची सहजसाध्यता (access) यांचाच विचार उपजीविका निर्देशांक करतो. आणखी पुढे, कौशल्य विकास स्वत:हून क्वचितच येतो. संधीचा जास्तीत जास्त उपयोग करून घेण्यासाठी अथकपणे परिश्रम करणे आणि मर्यादेबाहेर जाऊन काम करणे यातून ते जोपासले जाते. समकालीन शिक्षणसंस्था आणि धोरण आखतानाच्या कौशल्य विकासावरील पुढील चर्चेत उद्योजकतेशी संबंधित कौशल्यसंचावर प्रमुख भर दिला जाणार आहे. उद्योजक आणि गुंतवणूकदार अनपेक्षित नाविन्यपूर्ण संधींचा लाभ उठवण्यासाठी तसेच कौशल्य प्रसारासाठी स्टार्ट अप्सकडे (नवीन उद्योग) उत्सुकतेने पाहत आहेत. तरीही या क्षमतांची परिणती यशस्वी उद्योग आणि रोजगारक्षम साधनांचा पुरेसा संच निर्माण करण्यात क्वचितच होते. संपूर्ण सामाजिक दारिद्र्य आणि संबंधित सामाजिक मुद्दे आर्थिक भरभराट, वाढ तसेच विकासाची उद्दिष्टे साध्य करण्यात मोठेच अडसर आहेत.

**आर्थिक प्रगतीत कौशल्य विकासाची भूमिका**

कौशल्य विकास म्हणजे प्रशिक्षण अथवा अनुभवांतून ग्रहण केलेले प्राविण्य असे म्हणता येईल. जगातील आघाडीच्या देशांनी आपल्या राष्ट्रीय धोरणांतून कौशल्य विकासाची भूमिका व परिणामांचे महत्व मान्य केले आहे. त्यातून बदलत्या बाजारपेठीय मागण्यांशी जुळवून घेण्याची तसेच नाविन्यपूर्ण संशोधन व उद्योजकीय क्रियाकलापांचा लाभ घेण्याची व्यक्तीची क्षमता मजबूत होते. कौशल्य विकासाच्या प्राथमिक निर्णायक घटकांशिवाय, स्पर्धात्मकतेच्या संदर्भात बदलत्या अर्थव्यवस्थेच्या नवीन मागण्या पूर्ण करण्यासाठी संधी आणि आव्हानांचा विचार करणेही आवश्यक आहे.

देशांची पुढील भरभराट ही शेवटी रोजगार असलेल्या व्यक्तींची संख्या आणि कामाच्या बाबतीत ते किती उत्पादक आहेत, यावरच अवलंबून असते. सर्वाधिक यशस्वी अथवा प्रागतिक देश तेच असतात जे व्हीयुसीएचा (अस्थिरता, अनिश्चितता, गुंतागुंत, संदिग्धता) सक्षमपणे मुकाबला करू शकतात. त्यामुळे अधिक व्यापक विकास, रोजगारक्षमता व प्रगतीशी कौशल्य विकास जोडण्यासाठी सरकारी हस्तक्षेप अनिवार्य ठरतो.

देशांची पुढील भरभराट ही शेवटी रोजगार असलेल्या व्यक्तींची संख्या आणि कामाच्या बाबतीत ते किती उत्पादक आहेत, यावरच अवलंबून असते. सर्वाधिक यशस्वी अथवा प्रागतिक देश तेच असतात जे व्हीयुसीएचा (अस्थिरता, अनिश्चितता, गुंतागुंत, संदिग्धता) सक्षमपणे मुकाबला करू शकतात. त्यामुळे अधिक व्यापक विकास, रोजगारक्षमता व प्रगतीशी कौशल्य विकास जोडण्यासाठी सरकारी हस्तक्षेप अनिवार्य ठरतो.

**भारताची स्पर्धात्मक वरचढ बाजू**

बोस्टन कन्सल्टिंग ग्रुपने केलेल्या अभ्यासातून असे समोर आले आहे की, २०२० मध्ये जगाला ४ कोटी ७० लाख कामगारांची कमतरता भासण्याची शक्यता आहे. दुसरीकडे, भारताचे मार्गक्रमण विकासाच्या दिशेने चालले असून लोकसंख्येच्या दृष्टीने भारताला असलेला संभाव्य लाभ जगातील चर्चेचा विषय ठरला आहे. १५ ते ५९ या कार्यक्षम वयाची ६२ टक्के लोकसंख्या असलेला भारत जगातील सर्वात तरुण देश म्हणून ओळखला जात असून एकूण लोकसंख्येच्या ५४ टक्के लोक २५ वर्षांखालील वयोगटातील आहेत. २०२२ मध्ये भारतात काम करणाऱ्या लोकांची संख्या ५ कोटी ६० लाख इतकी असेल. अगदी आजही दरवर्षी एक कोटी २० लाख तरुण कामगार म्हणून प्रवेश करतात आणि त्यांना योग्य शिक्षण व कौशल्य प्रदान केले तर ते झपाट्याने वाढणाऱ्या भारतीय बाजारपेठेत काम करण्यासच नव्हे तर जागतिक अर्थव्यवस्थेलाही पुरवू शकणाऱ्या मनुष्यबळाचा जबरदस्त साठा बनू शकतात. (नियोजन मंडळ धोरणात्मक आराखडा, १२ वी पंचवार्षिक योजना)

इतर अनेक आशियाई देशांप्रमाणेच भारतही कामगार बाजारपेठीय पाच संक्रमणातून जात आहे.: शेतीकडून बिगरशेती, ग्रामीण भागातून शहरी, असंघटित क्षेत्रातून संघटित क्षेत्राकडे, निर्वाहापुरत्या स्वयंरोजगाराकडून उत्तम पगारी रोजगाराकडे आणि शाळे ऐवजी रोजगारावर. पूर्वी शाप म्हणून मानली जाणारी भारतीय लोकसंख्या आता

इच्छित लाभांश म्हणून बनू पाहत आहे. मात्र लोकसंख्यीय लाभांश याचा अर्थ केवळ लोक असा नाही. तर कुशल, शिक्षित अथवा कर्मचारी असा आहे. स्वस्त मनुष्यबळ आणि बुद्धीने समृद्ध लोकांचा साठा हे भारताला मिळणारे दोन वैशिष्ट्यपूर्ण लाभ आहेत, ज्यामुळे ज्ञानाधारित समाज म्हणून भारताच्या स्पर्धात्मक क्षमतेला ताकद मिळाली आहे. (सबरवाल, २०१३)

**भारतातील कौशल्य प्रशिक्षणाच्या संधी**

जागतिक लोकसंख्येत झपाट्याने वाढ होत असतानाच सर्वात तरुण लोकसंख्या असलेल्या भारताला लोकसंख्यीय लाभांशाच्या संदर्भात डावपेचात्मक फायदा मिळाला आहे. असे असले तरीही भारतातील तीन चतुर्थांश लोकसंख्या अकुशल आहे. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या जागतिक प्रजा जोखीम अहवालात (डब्ल्यूइएफ २०११) असा सावधतेचा इशारा देण्यात आला आहे की, अल्प रोजगारक्षमतेमुळे भारत आणि ब्राझीलसारख्या विकसनशील देशांनाही कौशल्याच्या अभावाचा सामना करावा लागेल. उद्योगांना आवश्यक असलेले कौशल्य आणि शिक्षण व्यवस्था पुरवत असलेले कौशल्य यांत अतिशय मोठी तफावत आहे. राष्ट्रीय कौशल्य विकास मोहीमेंतर्गत प्रयत्न करूनही २०२२ पर्यंत ५० कोटी कुशल मनुष्यबळ तयार करणे एक मोठे आव्हान असणार आहे. कारण हे साध्य अतिप्रचंड आहे.

**संधीचा उपयोग आणि आर्थिक वाढ यांतील तफावती**

१. कमी विकसित देशांतील साधनसंपत्तीची विषम विभागणी, तुकडे स्वरूपातील जमिनीची धारणा आणि त्यात पडत असलेले आणखी वाटे, परिवहनाच्या अपुऱ्या सुविधा आणि अर्थातच जागृती व शिक्षणाचा निम्न स्तर अशांसारख्या उपजीविका व्यवस्थेतील दुर्बल रचनात्मक घटक, विकास प्रक्रियेबाबत मागास व विरोधात्मक दृष्टीकोन यामुळे वाईट स्थितीतील, राहण्यास अयोग्य, आर्थिक दुर्बल व कच्चे बांधकाम असलेली घरे

२. धान्य उत्पादन आणि स्थिरीकरणासाठी पर्यावरणस्नेही पिकांमध्ये वैविध्य आणणे, नैसर्गिक साधनसंपत्तीचे व्यवस्थापन, आर्थिक व राजकीय वितरण व्यवस्थेतील पोकळी भरून काढणे, कमी खर्चाचे व व्यवसायाभिमुख उपायांद्वारे उत्पादन आणि प्रक्रियेत सुधारित तंत्रज्ञान वापरण्यावर जाणीवपूर्वक चर्चा करून भर देण्याची आत्यंतिक गरज आहे.

**३.** स्वयंशाश्वत व्यवस्थेचे (लघुउद्योग विकसित करण्यासाठी क्रियाकलाप) उद्दिष्ट साध्य करण्यासाठी उत्पन्न निर्मितीचे पर्यायी क्रियाकलाप तयार करण्यासाठी कार्यरत पवित्रा स्वीकारणे

**४.** आर्थिक, पर्यावरणीय, जागतिक आणि अर्थातच स्थानिक पातळीवरील शाश्वत अशा उपाययोजना करण्याच्या धोरणांना नव्याने कुमक देण्याची गरज (उदाहरणार्थ योग्य हंगामी शेतीबाह्य रोजगार)

**५.** प्रत्यक्ष ठिकाणी शेतमाल पुरवठ्याचे व्यवस्थापन आणि अंमलबजावणीच्या क्षमतेत सुधारणा करुन बफर स्टॉक (राखीव साठा) वाढवणे ज्यामुळे अपरिहार्य स्थितीत धान्योत्पादन कमी झाल्यास फटका बसणार नाही.

**६.** सामायिक मालमत्ता आणि माल पुरवण्याच्या साखळीत (लॉजिस्टिक्स) समुदायांच्या सहभागातून सुधारणा घडवणे

**मागणीनुरूप पुरवठा करण्यातील समस्या**

मोजमापानंतर निश्चित केलेली बेरोजगारी कामावर घ्यावयाच्या खऱ्याखुऱ्या कामगारांची संख्या प्रतिबिंबित करत नाही त्याचप्रमाणे मोजमाप केलेल्या नोकऱ्या खरोखर किती रोजगार उपलब्ध आहेत, ते सांगत नाहीत. (डायमंड, २०११) रोजगाराची स्थिती आणि उत्पादकतेचे नमुने यांच्यात कमालीची तफावत असल्याचे उघड होते. भारतातील ९३ टक्के कामगार हे अनौपचारिक क्षेत्रातील असून कमी वेतनमान आणि एकंदरीत कमी उत्पादकतेमुळे ग्रासलेले असे हे क्षेत्र आहे. भारतातील ५८ टक्के कामगार हे कृषी क्षेत्रातील असून त्या क्षेत्राचा जीडीपीतील (सकल राष्ट्रीय उत्पन्न) वाटा अवघा १५ टक्के आहे. ५० टक्के कामगार उत्पादन क्षेत्रात असलेल्या चीनच्या तुलनेत भारतात फक्त १२ टक्के कामगार उत्पादन क्षेत्रात आहेत. अर्धकुशल संघटित उत्पादन क्षेत्रामुळे एक पोटथर (mezzanine) तयार

भारतातील ९३ टक्के कामगार हे अनौपचारिक क्षेत्रातील असून कमी वेतनमान आणि एकंदरीत कमी उत्पादकतेमुळे ग्रासलेले असे हे क्षेत्र आहे. भारतातील ५८ टक्के कामगार हे कृषी क्षेत्रातील असून त्या क्षेत्राचा जीडीपीतील (सकल राष्ट्रीय उत्पन्न) वाटा अवघा १५ टक्के आहे. ५० टक्के कामगार उत्पादन क्षेत्रात असलेल्या चीनच्या तुलनेत भारतात फक्त १२ टक्के कामगार उत्पादन क्षेत्रात आहेत.

होतो ज्यामुळे अवघड असे शेतीकडून बिगर शेतीकडील संक्रमण शक्य होते. भारतातील अर्ध्याहून अधिक कामगारवर्ग स्वयंरोजगार असलेला आहे, परंतु बहुतेक स्वयंरोजगार असलेले कामगार गरीब असल्याने त्यातून उद्योजकीय उर्जेची खूण दुर्दैवाने मिळत नाही.(मॅकिन्सी)

बहुतेक जण कामगारांच्या प्रवाहावर भर देतात- पुढील २० वर्षांत दर महिन्याला दहा लाख लोक कामगारवर्गात सामील होणार आहेत- परंतु मोठी संधी ही सध्या असलेल्या कामगार शक्तीमध्ये आहे- जे कामगार वर्गात आधीच आलेले आहेत परंतु शेती आणि अन्य क्षेत्रांत कमी उत्पादकतेमध्ये अडकून पडले आहेत,अशा दोन कोटी कामगारांना पुन्हा सुसज्ज करण्यात ही संधी आहे. २०११ मध्ये सरकार चालवत असलेल्या भारतातील १२०० रोजगार विनिमय केंद्रांनी फक्त तीन लाख लोकांना रोजगार पुरवले, मात्र प्रत्यक्षात ४ कोटी लोकांनी या रोजगार केंद्रांत नाव नोंदवले होते. (मॅकिन्सी, २०१४)

**शिक्षित आणि कुशल कामगारांची फळी तयार करण्यातील समस्या**

अधिक चांगली शैक्षणिक व्यवस्था तयार करण्याच्या व्यापक तत्वांमध्ये दर्जाचे चांगले नियमन, त्या अनुषंगाने प्रोत्साहन भत्ते आणि भविष्यातील आवश्यकतांना अनुरूप असा शिक्षित व कुशल कामगार तयार करणारे वातावरण तयार करण्याचा समावेश आहे. शिक्षण व्यवस्थेपुढील सर्वात मोठे आव्हान वेगवेगळ्या स्तरांवर विद्यार्थ्यांची होणारी मोठ्या प्रमाणावरील गळती हेच आहे. पहिलीत जे विद्यार्थी शाळा सुरू करतात, त्यातील ३५ टक्के विद्यार्थी दहावी इयत्तेपर्यंत पोहचत नाहीत. दोन कोटी ६० लाख विद्यार्थी दहावीपर्यंत जातात, परंतु त्यातील एक कोटी उत्तीर्ण होत नाहीत. बारावी परीक्षा देणाऱ्या ८० लाख विद्यार्थ्यांपैकी १६ लाख उत्तीर्ण होत नाहीत.८० लाखांपैकी फक्त ५० लाख विद्यार्थी बारावी उत्तीर्ण होऊन महाविद्यालयांत जातात. शिक्षित आणि कुशल कामगार व व्यावसायिकांची मजबूत फळी तयार करण्यासाठी निम्न स्तरावरील शिक्षण पूर्ण करण्याचा व संक्रमणाच्या प्रमाणात सुधारणा होण्याची गरज आहे. (सबरवाल, २०१३)

> दोन पद्धतीनी आर्थिक प्रगती साध्य केली जाऊ शकते. अर्थव्यवस्थेला सहाय्य करणाऱ्या विद्यमान व्यवस्थांची कार्यक्षमता वाढवणे ही पहिली पद्धती असून तिला मर्यादित वाव आहे. दुसऱ्या पद्धतीत स्वयंरोजगार आणि उद्योजकांना उत्पादक बनवणारे कौशल्य संच पुरवण्यास योग्य अशी नवी चौकट तयार करणे ही असून जी आर्थिक प्रगतीला थेट इंधन पुरवेल आणि त्याला अमर्याद वाव आहे.

शिक्षण व्यवस्थेतून लवकरच बाहेर पडलेल्यांमध्ये गरीब आणि वंचित घटकांचे प्रमाण मोठे आहे, ज्यामुळे दर्जेदार शिक्षणासाठी नाव नोंदवून ते घेणाऱ्यांचे प्रमाण आपोआपच विषमन्यायी होते. आरोग्य, शिक्षण आणि समाजाशी संबंधित गरजांबाबत निर्विवाद सुरक्षितता आणि संरक्षणातून इच्छित कौशल्यांचा संच तयार करण्याची गरज आहे.इतकेच नव्हे तर पुढील उपजीविका खालील विविध घटकांवर अवलंबून आहे.:

१. व्यवसाय संधी आणि विकासाची सुरक्षा
२. आर्थिक सुरक्षा (उत्पन्न, कौशल्य, वेळ)
३. आहारविषयक सुरक्षा (निवारा, पाणी आणि स्वच्छतेसह बाळ व बाळाच्या मातेच्या आरोग्याची काळजी)
४. पर्यावरणविषयक जागृतीची सुरक्षा
५. शैक्षणिक सहभागाची सुरक्षा
६. सामुदायिक सहभाग (लिंगभेद, वांशिक गट, धार्मिक संलग्नता)
७. घरविषयक सुरक्षा
८. अन्न सुरक्षा
९. आरोग्य सुरक्षा
१०.राजकीय व कायदेशीर सुरक्षा मनुष्यबळ **भांडवल/ कौशल्यवृद्धीतून आर्थिक विकास कसा साधायचा**

**तफावत भरून काढण्यासाठी इच्छित कौशल्य संच**

१. सामाजिक पिरॅमिडच्या तळाशी राहणाऱ्या समूहांसाठी कौशल्य संचाची नव्याने रचना करावी लागेल. पुरेसा कुशल कामगारांचा साठा तयार करण्यातील अपयशामागे शिक्षणापर्यंत प्रवेश आणि अनुकूलनशीलता यांचा अभाव हीच दोन प्रमुख कारणे आहेत.

२. तरुणांमध्ये संधी ओळखून ती पटकावण्यासाठी आकलनावर आधारित क्षमता असणे आवश्यक आहे.

३. तरुण आणि व्यवसायाच्या कोणत्याही स्वरूपामध्ये गुंतलेल्यांमध्ये प्राथमिक उद्योजकीय कौशल्यसंच इच्छित आहे.

शाश्वत दीर्घकालीन विकास आणि रोजगारनिर्मिती आणि उत्पन्न व संधींच्या

समन्यायी वाटपासाठी कौशल्याचा विकास, देखभाल आणि विनियोगाच्या प्रक्रियेत सुधारणा करणे धोरणातील कळीचा मुद्दा अधिकाधिक महत्वाचा मानला जात आहे. ओईसीडीने नुकत्याच जाहीर केलेल्या कौशल्य धोरणात (ओईसीडी, २०१२ ब) प्रस्तुत कौशल्याचा विकास, ते कार्यान्वित करणे आणि त्यांचा काही प्रमाणात वापर करणे ही सरकारने कृती करण्यासाठी तीन क्षेत्रे निश्चित केली आहेत.

**कौशल्य विकासासाठी चौकट**

निबंधाच्या सुरूवातीस सांगितल्याप्रमाणे दोन पद्धतीनी आर्थिक प्रगती साध्य केली जाऊ शकते. अर्थव्यवस्थेला सहाय्य करणाऱ्या विद्यमान व्यवस्थांची कार्यक्षमता वाढवणे ही पहिली पद्धती असून तिला मर्यादित वाव आहे. दुसऱ्या पद्धतीत स्वयंरोजगार आणि उद्योजकांना उत्पादक बनवणारे कौशल्य संच पुरवण्यास योग्य अशी नवी चौकट तयार करणे ही असून जी आर्थिक प्रगतीला थेट इंधन पुरवेल आणि त्याला अमर्याद वाव आहे.

कौशल्य विकासाच्य मार्गाने संधी हस्तगत करण्यासाठी लेखक सुधारणा घडवून आणणारी चौकट प्रस्तावित केली आहे.

**पहिला मार्ग**

सध्याच्या आर्थिक पद्धतींमध्ये अधीन राहून कामगारांना कौशल्य संच पुरवून त्यांची कार्यक्षमता

वाढवून विकासासाठी कामाला लावणे. याद्वारे सध्याच्या उद्योग क्षेत्राला आवश्यक असलेले परंतु आता त्यात विकासाला वाव नसलेले असे कौशल्य पुरवणे सूचित केले आहे. तरीसुद्धा, हा ही मार्ग चोखाळता

येण्याजोगा आहे कारण रोजगारविषयक अक्षमतेमुळे अनेक संधी वापरल्याच गेलेल्या नाहीत, हे आपल्याला समजले आहे. रोजगार मिळवू पाहणाऱ्या लोकांमध्ये रोजगारक्षमतेसाठी आवश्यक कौशल्य नसल्यामुळेच त्यांना झिडकारले जाते, यावरून ही मोठी दरी असल्याचा पुरावाच आहे. नव्या आणि जुन्या अर्थव्यवस्थेतील पारंपरिक उद्योगांमध्ये आवश्यक कौशल्याच्या अभावी रोजगारक्षमता व उपलब्ध संधी यातील तफावत आपण पाहू शकतो.

**दुसरा मार्ग**

सध्याची नवी अर्थव्यवस्था आणि पुढील वीस वर्षांसाठी विचार करण्यात आलेल्या अर्थव्यवस्थेत नव्या संधी निर्माण करण्यासाठीची उद्योजकीय चौकट आहे. अमर्याद वाव देणारे उद्योजकीय पर्यावरण तयार करण्याची अप्रकट इच्छा आहे. मात्र त्यासाठीही दोन उपमार्ग आहेत.

**मार्ग २, उपमार्ग १**

तरुणांची रोजगारक्षमता वाढवण्यासाठी त्यांना अतिरिक्त कौशल्य संचाद्वारे सक्षम करून अजून उपयोगात न आणल्या गेलेल्या संधींना कामाला लावले पाहिजे. याद्वारे क्षमतावृद्धी सूचित केली आहे.

**मार्ग २, उपमार्ग अ**

आर्थिक प्रगतीला उत्तेजन देण्यासाठी वर्धित क्षमतांसाठी नेहमीच उत्सुक असलेल्या उद्योजकांनी सशक्त अशा नव्या अर्थव्यवस्थेत संधींचा नवा साठा तयार करण्यावर याचा भर आहे.

**मार्ग २ उपमार्ग ब**

आर्थिक प्रगतीचे पोषण होईल, अशा वर्धित क्षमतांच्या शोधात असलेल्या उद्योजकांनी सशक्त झालेल्या नव्या अर्थव्यवस्थेत संधींचा संपूर्ण नवा संच तयार करण्यावर यात भर देण्यात येतो. यामुळे

साधनसंपत्ती आणि क्षमतांची वृद्धी मिळतेच परंतु नव्या संधींचा जास्तीत जास्त उपयोग करुन घेण्याच्या अभिमुख असे कौशल्य विकास कामगारांना पुरवला जातानाच नव्या प्रस्तावित आव्हानांसाठी त्यांना तयार केले जाते.

वरील दोन्ही मार्ग रोजगारक्षमतेस सहाय्य करणाऱ्या इच्छित नव्या किंवा आवश्यक कौशल्यासह सध्या विद्यमान असलेल्या संधींशी सुसंगत असले पाहिजेत. याच्या परिणामी उत्पादकता, रोजगारक्षमता आणि उद्योजकता यात वृद्धी होईल. या संपूर्ण प्रक्रियेत प्रमुख भागीदारांचा सहभाग असेल ज्यामुळे प्रागतिक आणि विकसित भारत निर्माण होईल.

■■■

*लेखक डॉ. मनोज जोशी ॲमिटी बिझीनेस स्कूल, ॲमिटी युनिव्हर्सिटी*
*लखनौ कँपस, उत्तर प्रदेश येथे प्राध्यापक आहेत.*
Email: manoj.m.joshi@gmail.com
*डॉ. अरुण बहादुरिया*
*सहप्राध्यापक, ॲमिटी बिझीनेस स्कूल, ॲमिटी युनिव्हर्सिटी, लखनौ कँपस, उत्तर प्रदेश*
Email: drarunbhadauria@gmail.com
*डॉ. शैलजा दीक्षित, सहप्राध्यापक (मार्केटिंग), ॲमिटी बिझीनेस स्कूल, ॲमिटी युनिव्हर्सिटी,*
*लखनौ कँपस, उत्तर प्रदेश*
Email:shailjadixit1@gmail.com

# वंचितांना रोजगारक्षम बनवण्यासाठी कौशल्य विकास

सुनीता सांघी



**जगातील वाढत्या अर्थव्यवस्थांची मनुष्यबळाची गरज भारत पुरवणार आहे पण ती संधी साधण्यासाठी आपल्या मनुष्यबळास कौशल्ये, कौशल्य सुधारणा प्राप्त करून देण्याची गरज आहे, जे नवीन तरूण रोजगारासाठी सज्ज आहेत त्यांना बाजारपेठेच्या गरजा ओळखून प्रशिक्षण देण्याची गरज आहे. या गरजा देशांतर्गत व परदेशात वेगवेगळ्या असतात त्यामुळे तसे प्रशिक्षण गरजेचे आहे. व्यवसाय प्रशिक्षणाचे आव्हान आपण स्वीकारले पाहिजे. शिक्षण व प्रत्यक्ष काम यांच्यात सध्या काहीच संबंध नाही त्याची सांगड आपल्याला आता घालावी लागेल. आपल्याकडे प्रशिक्षकांची कमतरता आहे व विविध भागात व गटात ती वेगवेगळी आहे. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या एम्प्लॉयमेंट नेटवर्कच्या मते चार इ महत्वाचे आहेत त्यात रोजगारक्षमता (एम्प्लॉयएबिलिटी), समान संधी (इक्वल अपॉरच्युनिटीज) उद्यमशीलता (आंत्रप्रेन्युरशिप) व रोजगार निर्मिती (एम्प्लॉयमेंट क्रिएशन) यांचा समावेश होतो.**

भारताचा लोकसंख्याशास्त्राच्या दृष्टीने विचार केला तर किमान ६५ टक्के लोक हे काम करू शकतील अशा वयोगटातील आहेत, अशी अवस्था कुठल्याही देशाच्या लोकसंख्येच्या संरचनेत एकदाच येत असते. संयुक्त राष्ट्रांचा २०१५ चा लोकसंख्या अहवाल पाहिला तर इ.स. २०२० पर्यंत भारतातील लोकांचे सरासरी वय हे २९ वर्षे असेल तर चीन व अमेरिकेत ते ३७ वर्षे तर युरोपात ४५ वर्षे असणार आहे. लोकसंख्याशास्त्रातील या वयाच्या घटकाचा फायदा आपल्याला होणार आहे व भारत हा मनुष्यबळाचा कारखाना असणार आहे. जगातील वाढत्या अर्थव्यवस्थांची मनुष्यबळाची गरज भारत पुरवणार आहे पण ती संधी साधण्यासाठी आपल्या मनुष्यबळास कौशल्ये, कौशल्य सुधारणा प्राप्त करून देण्याची गरज आहे, जे नवीन तरूण रोजगारासाठी सज्ज आहेत त्यांना बाजारपेठेच्या गरजा ओळखून प्रशिक्षण देण्याची गरज आहे. या गरजा देशांतर्गत व परदेशात वेगवेगळ्या असतात त्यामुळे तसे प्रशिक्षण गरजेचे आहे. व्यवसाय प्रशिक्षणाचे आव्हान आपण स्वीकारले पाहिजे. शिक्षण व प्रत्यक्ष काम यांच्यात सध्या काहीच संबंध नाही त्याची सांगड आपल्याला आता घालावी लागेल. आपल्याकडे प्रशिक्षकांची कमतरता आहे व विविध भागात व गटात ती वेगवेगळी आहे.

आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या एम्प्लॉयमेंट नेटवर्कच्या मते चार इ महत्वाचे आहेत त्यात रोजगारक्षमता (एम्प्लॉयएबिलिटी), समान संधी (इक्वल अपॉरच्युनिटीज) उद्यमशीलता (आंत्रप्रेन्युरशिप) व रोजगार निर्मिती (एम्प्लॉयमेंट क्रिएशन) यांचा समावेश होतो, त्यामुळे रोजगार वाढेल व सर्वांना संधी मिळेल. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या २००० मधील ठरावानुसार जेव्हा व्यक्तीचे शिक्षण, प्रशिक्षण व इतर कौशल्ये ही विस्तृत पायावर आधारित असतात तेव्हा ती व्यक्ती जास्त रोजगारक्षम असते. त्यात माहिती तंत्रज्ञान, प्रश्नांची सोडवणूक, साक्षरता व गणनक्षमता या कौशल्यांचा समावेश होतो. धोरणात्मक स्वरूपाचे अनेक पुढाकार, कार्यक्रम व व्यवस्थात्मक हस्तक्षेप यामुळे कौशल्य असलेल्या मनुष्यबळाची उपलब्धता वाढली आहे. त्यामुळे रोजगार व उद्यमशीलता समाजातील अनेक क्षेत्रात वाढत आहे व वंचित गटांना हस्तक्षेपांमुळे रोजगार निर्मितीत फायदा झालेला आहे.

या लेखात कामगार बाजारपेठेचे गुणधर्म, धोरणात्मक आव्हाने व वंचितांची कौशल्ये सुधारण्यासाठी धोरणात्मक हस्तक्षेप यांचा उहापोह केला आहे.

वंचित गट, कामगार बाजारपेठ, कौशल्य विकास

मूळ प्रश्न वंचित कुणाला म्हणावे हा आहे. आर्थिक घटकांच्या आधारे हे ठरवले जाते. कमी उत्पन्न, दारिद्र्य, लिंग-वंश-भौगोलिक अलगता, शिक्षणाच्या संधीचा अभाव, रोजगार संधीचा अभाव, शाळातून गळती, शारीरिकदृष्ट्या अक्षमता (विशेष व्यक्तींच्या बाबतीत) या घटकांच्या आधारेही वंचित कुणाला म्हणावे हे पुरेसे

स्पष्ट होते. अनेक घटकांचा विचार केला तर अमुक एकाच व्यक्तीला वंचित म्हणता येईल असे नाही त्यासाठी अनेक कारणे असू शकतात. ज्या लोकांना चांगले शिक्षण व प्रशिक्षण मिळालेले आहे ते त्यांची मूलभूत कौशल्ये वाढवतात व त्यामुळे त्यांना चांगल्या प्रतीचे रोजगार मिळतात. अशिक्षित, अर्ध्यावर शाळा सोडलेले व कमी शिकलेले लोक हे काही प्रमाणात वंचितच असतात कारण त्यांना रोजगार कमी प्रतीचे मिळतात. शिक्षण व प्रशिक्षण यांच्या माध्यमातून त्यांना कामगार बाजारपेठेत चांगले स्थान मिळवून देता येईल पण ते त्यापासून वंचित असतात. कमी प्रतीचे, कमी वेतनाचे जे रोजगार असतात त्यात दारिद्र्याचे दुष्टचक्र हे सुरूच राहते व समाजापासून ते तुटलेले राहतात. कौशल्य विकासाचा नेमका काय फायदा होतो हे पाहण्यासाठी कामगार बाजारपेठेचा आढावा घेणे महत्वाचे आहे. भारतातील कामगार बाजारपेठ ही दुहेरी गुणधर्माची आहे ६२.९ टक्के ( ४३५.६६ दशलक्ष) लोक अनौपचारिक क्षेत्रात काम करतात व ८.१ टक्के (३८.५६ दशलक्ष) लोक संघटित क्षेत्रात काम करतात.खेड्यांमध्ये ६८ टक्के लोक राहतात त्यातील बहुतांश लोक हे असंघटित क्षेत्रात काम करतात. ग्रामीण भागात रोजगारात सहभागी महिलांची संख्या कमी आहे. तेथे सर्वच वयोगटातील काम करणाऱ्या महिलांची संख्या ही २२.५ टक्के आहे.

शैक्षणिक अपात्रतेचाही एक मुद्दा आहे, कामगार बाजारपेठेत येणारे तीस टक्के लोक हे निरक्षर असतात व २४ टक्के लोकांना केवळ प्राथमिक शिक्षण मिळालेले असते. साधारणपणे ३० टक्के लोकांचे माध्यमिक व त्यापुढील शिक्षण झालेले असते. मुलगे व मुलींचे शाळांमधून गळतीचे प्रमाण प्राथमिक व माध्यमिक पातळीवर जास्त आहे. युडीआयएसइच्या आकडेवारीनुसार २०१३-१४ या वर्षात २० टक्के मुलांनी पाचवीच्या आधीच शाळा सोडली तर ४७.४ टक्के मुलांनी माध्यमिक शिक्षण पूर्ण करण्याच्या आधीच शाळा सोडली.शिक्षणाचा स्तर कमी असेल तर कौशल्येही कमी दर्जाची असतात. जे लोक मनुष्यबळात समाविष्ट होत असतात त्यातील तीन टक्के लोकांनी संघटित क्षेत्रातील कौशल्ये मिळवलेली असतात तर ७ टक्के लोकांकडे असंघटित क्षेत्राची कौशल्ये असतात. याचाच अर्थ ९० टक्के लोकांकडे कौशल्याधिष्ठित रोजगारासाठी आवश्यक असलेल्या कौशल्यांचा अभाव असतो. एकूण २.९ दशलक्ष महिलांना औपचारिक कौशल्य प्रशिक्षण मिळत आहे तर ८.६३ दशलक्ष पुरूषांना कौशल्य प्रशिक्षण मिळत आहे. अनौपचारिक प्रशिक्षणातही तीच स्थिती आहे. मनुष्यबळाचे वितरण पाहिले तर ४८ टक्के लोक कृषी क्षेत्रात काम करतात व त्यांचा एकूण देशांतर्गत उत्पन्नातील वाटा केवळ १६ टक्के आहे. एकतर उत्पादनक्षमता कमी आहेच शिवाय बेरोजगारी त्यात अधिक आहे. कृषी क्षेत्रात स्वयंरोजगार आहे. त्यानंतर बांधकाम क्षेत्रासारख्या अनुत्पादक क्षेत्रात बरेच लोक कमी वेतनात काम करतात.

२०११ च्या जनगणनेनुसार २.६८ कोटी लोक विशेष आहेत, त्यांना काही ना काही कारणास्तव शारीरिक अक्षमता आहे त्यातील १.५७ कोटी काम करण्यास लायक वयोगटातील आहेत. त्यांची रोजगाराची गरज शारीरिक अक्षमता कायदा १९९५ मंजूर झालेला असतानाही पूर्ण होऊ शकत नाही. ग्रामीण भागात अशा लोकांचे प्रमाण अधिक आहे. आरोग्य सुविधांचा अभाव व दारिद्र्य यामुळे उपचार मिळत नाहीत त्यामुळे असे घडते. ग्रामीण भागातील हे लोक कामगार बाजारपेठ व कौशल्ये यापासून दूर आहेत. सर्व वयोगटांचा विचार केला तर युवकांमध्ये बेरोजगारी अधिक आहे. एनएसएसओच्या २०११-१२ च्या पाहणीनुसार सर्व वयोगटातील पुरूषांमध्ये हे प्रमाण २.४ टक्के तर महिलांमध्ये ३.७ टक्के आहे. साधारण १५-२९ या वयोगटात बेरोजगारीचे प्रमाण वेगवेगळ्या गटात ६.१ ते १५.६ टक्के आहे. शहरी महिलांमध्ये बेरोजगारीचे प्रमाण जास्त असून ते १५.६ टक्के आहे.सामाजिक बंधने व योग्य संधी अभावी हे प्रमाण जास्त आहे. १५-२९ वयोगटात हे प्रमाण जास्त आहे कारण उपलब्ध रोजगार व अपेक्षा यांची सांगड घालणे कठीण जाते. ग्रामीण भागातील युवक हे कृषी क्षेत्रात काम करतात. औपचारिक शिक्षण व व्यावसायिक शिक्षण घेतलेल्यांमध्ये बेरोजगारी अधिक असण्याचे कारण म्हणजे त्यांची कौशल्ये रोजगारास अनुकूल नसतात किंवा त्याला योग्य असे रोजगार उपलब्ध नसतात. वंचित गटांसाठी विशिष्ट वर्गवारी असतानाही ते समाजापासून दूर राहतात व वंचितच राहतात. एनएसएसओच्या आकडेवारीनुसार १५-२४ वयोगटात अनेक तरूण हे कमी वेतनात बाजारपेठेत प्रवेश करतात व नंतर त्यांना योग्य रोजगार मिळाला नाही तर माघार घेतात. बेरोजगारीचे हे प्रमाण नोकऱ्या शोधण्यातील अपयश, सक्षमतेचा अभाव किंवा प्रशिक्षण संधींचा अभाव

किंवा कौशल्ये अपेक्षेप्रमाणे नसणे यामुळे असते. युवकांमधील बेरोजगारीमुळे उत्पादन घसरते, कौशल्यांची घसरण होते, कार्यक्षमता कमी होते व सामाजिक वर्गसंघर्ष निर्माण होतो. असे असले तरी केवळ कौशल्य प्रशिक्षण हे बेरोजगारीच्या प्रश्नावरचे एकमेव उत्तर नाही तर त्या कौशल्यांशी सुसंगत अशा रोजगार संधी असल्या पाहिजेत. वंचितामधील बेरोजगारीचे हे विश्लेषण पाहता रोजगारक्षमता कौशल्य विकासातून वाढवता येईल हे मात्र खरे आहे.

**वंचित गटांसमोरील आव्हाने व प्रश्न**

आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या जीवनचक्र दृष्टिकोनानुसार अगदी लहान असताना पासूनच कौशल्यांकडे लक्ष दिले गेले तर पुढे लोकांना चांगले रोजगार मिळू शकतात. भारतात अजून ७० टक्के लोक ग्रामीण भागात राहतात व शेती करून कुटुंबांना मदत करतात. त्यांना कृषी कौशल्ये व संबंधित प्रक्रियांची माहिती दिली पाहिजे. उत्पादन, अर्थपुरवठा व कामगार बाजारपेठ यांचे आकलन त्यांना असायला पाहिजे. त्यामुळे महिलांचा सहभाग वाढून ग्रामीण भागातून शहरी भागात होणारे स्थलांतर कमी होईल, हे लोक अगदी कमी पैशांच्या रोजगारासाठी शहरात स्थलांतरित होत असतात. कमी प्रतीचे शिक्षण व बालमजुरी यामुळे असंघटित क्षेत्रात मुले शाळा सोडून काम करतात. त्यांना चांगले शिक्षण देणे हे मोठे आव्हान आहे त्यासाठी शिक्षण व कौशल्यांच्या प्रशिक्षणाचे महत्व त्यांना व आईवडिलांना समुपदेशनाच्या माध्यमातून सांगितले पाहिजे.

असंघटित क्षेत्रातील कौशल्यांची गरज विविध भौगोलिक प्रदेशात आहे. अनेक लोक कमी वेतनाच नोकरी पत्करतात व तेवढे काम शिकून घेतात. कामासाठी लागणारे प्रशिक्षण हे शाळेत शिक्षण घेत असतानाच अप्रेंटिस पद्धतीने मिळाले तर मुले शाळा सोडणार नाहीत कारण त्यांना मूलभूत कौशल्ये शिकायला मिळतील व त्यातून नोकरी मिळेल. मुलींचे शाळा सोडण्याचे प्रमाण मुलग्यांपेक्षा अधिक आहे. कारण महिला शिक्षक, वस्तीगृह व वाहतूक सुविधा यांचा अभाव हे आहे. कौशल्याधारित कार्यक्रम हे अनेकदा पुरूषांशी संबंधित कामांशी अधिक निगडित असतात, त्यामुळे मुली त्यातून वगळल्या जातात. मुलींसाठी लवचिक असे प्रशिक्षण कार्यक्रम दिले पाहिजेत म्हणजेच त्यांच्या वेळेनुसार त्यांना प्रशिक्षण घेता आले पाहिजे.

साधारण १५-२४ या वयोगटात कार्यात्मक साक्षरता निर्माण करण्यासाठी धोरणात्मक हस्तक्षेपाची गरज आहे. वंचित मुलांचे रोजगार भवितव्य हे त्यांनी शाळेत राहून साक्षरता व गणनक्षमता मिळवल्यास नक्कीच वाढेल. त्यासाठी अनुदाने, विशेष शाळापूर्व कार्यक्रम व शिक्षणाचा दर्जा सुधारणे या महत्वाच्या बाबी आहेत.

शारीरिक अक्षम लोक कामगार बाजारपेठेत येताना अनेक समस्यांना तोंड देतात. त्यांना शिक्षण, प्रशिक्षण, आर्थिक साधने व सुयोग्य कामाचे ठिकणा व व्यवसाय, नियोक्त्यांची अशा लोकांना समजून घेण्यातील समस्या या आव्हानांना तोंड द्यावे लागते. विशेष लोकांना त्यांना योग्य असे रोजगार देताना सरकार, नियोक्ते व स्वयंसेवी संस्था यांच्या भूमिका महत्वाच्या ठरतात, काही मर्यादा व आव्हाने याच अडथळे बनतात. वंचिक गटांसाठी प्रशिक्षण, उद्योजकता प्रशिक्षण, वित्त पुरवठा व रोजगार बाजारपेठ, तंत्र प्रशिक्षण व राष्ट्रीय रोजगार सेवा या बाबी आवश्यक ठरतात.

भौगोलिक स्थान, लिंग, सामाजिक गट, धार्मिक गट , कौशल्याच्या पातळ्या व कमी शिक्षण या सर्व वर्गातील लोकांना प्रशिक्षण द्यायचे म्हटले तर त्यात अनेक आव्हाने आहेत. बदलत्या आर्थिक वातावरणात व तंत्रज्ञानात चांगला रोजगार मिळवणे व त्यासाठीच्या क्षमता प्राप्त करणे महत्वाचे आहे. या विवेचनातून असे दिसून येते की, तुमचा सामाजिक-आर्थिक गट, लिंग, भौगोलिक ठिकाण याच्या मर्यादा न ठेवता तुम्हाला शिक्षण, प्रशिक्षण मिळाले पाहिजे. रोजगारसंधीही मिळाल्या पाहिजेत.

**शिक्षण व इतर कौशल्ये सुधारण्यासाठी हस्तक्षेप**

कामगार बाजारपेठेत आधीच असलेले व येत असलेले युवक यांना मूलभूत शिक्षण व रोजगार कौशल्ये नसतात त्यामुळे शिक्षण व प्रशिक्षणात पुढाकार घेण्याची गरज आहे.. शिक्षणाधिकार कायदा २००९, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षण अभियान यामुळे मुलांची शाळांमधून होणारी गळती कमी झाली शिवाय त्यांना माध्यमिक पातळीपर्यंत शिक्षण मिळू लागले. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय निवासी कार्यक्रम यामुळे मुली शाळेत टिकून राहू लागल्या. आर्थिक व सामाजिक वंचित, अल्पसंख्याक व विशेष गट यांच्यासाठी शिष्यवृत्त्या दिल्या जाऊ लागल्या त्यामुळे या गटातील विद्यार्थ्यांचा सहभाग वाढला व ते शाळेत टिकून राहू लागले, शिक्षण पूर्ण करू लागले. त्यांनी उच्च शिक्षणाची पातळीही गाठावी यासाठी शिष्यवृत्त्या व

विद्यावृत्त्या सुरू करण्यात आल्या. महिला शिक्षक वाढवण्याचेही प्रयत्न झाले. स्वच्छ भारत अभियानात शाळांमध्ये प्रसाधनगृहे सुरू केल्याने मुलींचा शिक्षणातील सहभाग वाढला. असे असले तरी लैंगिक भेदाभेद टाळण्याबाबत समाज व शिक्षकांना संवेदनशील बनवणे गरजेचे आहे. राष्ट्रीय साक्षरता अभियान १५-३५ वयोगटातील निरक्षरांना कार्यात्मक साक्षरता शिकवते. कौशल्य विकासात आतापर्यंतचे कार्यक्रम हे सरकार संचालिकत होते व काही बाबतीत उद्योग कर्मचाऱ्यांना रोजगारक्षम बनवत होते. आता मागणीनुरूप कौशल्ये असायला हवीत म्हणजे उद्योगांना जे हवे ती कौशल्ये शिकवायला हवीत, त्याच हेतूने राष्ट्रीय कौशल्य विकास व उद्योजकता धोरण २०१५ तयार करण्यात आले आहे त्यात वंचित गट, अनुसूचित जाती व जमाती, इतर मागासवर्गीय व अल्पसंख्याक, महिला, शाळा सोडलेली मुले, विशेष युवक व अवघड भौगोलिक प्रदेशात राहणारे लोक यांना त्यांची रोजगारक्षमता व उद्योजकता वाढवण्यासाठी भेदाभेद न करता प्रशिक्षण दिले जाणार आहे. त्यामुळे त्यांना चांगले रोजगार मिळू शकतील, सरकारने यात विशिष्ट उद्देश डोळ्यापुढे ठेवून कार्यक्रम राबवले आहेत. केंद्र व राज्य सरकारे रोजगारक्षमता, समान रोजगार संधी व उद्योजकता, रोजगार निर्मिती यातील आव्हाने स्वीकारून वंचितांना कौशल्य प्रशिक्षण देण्याचे प्रयत्न करीत आहेत. क्षमता वाढ, अभिनव दृष्टिकोन व खासगी क्षेत्राचा सक्रिय सहभाग यांची या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी गरज आहे. कार्यक्रमांची फलनिष्पत्ती महत्वाची आहे. किती संख्येने उमेदवारांना प्रशिक्षण दिले गेले यापेक्षा त्याचा दर्जा महत्वाचा आहे, पुनरावृत्ती असलेल्या काही कार्यक्रमांचे एकात्मीकरण करण्याची गरज आहे. शिक्षण व प्रशिक्षण यातील गुंतवणुकीत वाढ केल्याने त्याचा परिणाम कर्मचाऱ्यांच्या रोजगारक्षमतेवर होणार आहे. उत्पादनक्षमता वाढून सर्वसमावेशक आर्थिक वाढ व सामाजिक एकोपा वाढणार आहे.

**मुलांना शाळांमध्ये टिकवून ठेवणे-**

मुलांनी माध्यमिक पातळीपर्यंत तरी चांगल्या दर्जाचे शिक्षण घेणे अपेक्षित आहे. केंद्र व राज्य सरकारे त्यासाठी शिष्यवृत्त्या, वस्तीगृह सुविधा, माध्यान्ह भोजन अशा सुविधा देत आहे त्यामुळे शाळांमधील उपस्थिती वाढत आहे. पालकांनाही मनरेगाखाली संरक्षण दिले जात आहे त्यांना उत्पन्नाची सुरक्षितता मिळत आहे. अन्न सुरक्षा, अटल पेन्शन योजना, पंतप्रधान सुरक्षा विमा योजना यासारख्या योजना मदत करीत आहेत. त्यामुळे मुलांना शाळेत घालण्यासाठी लोकांना प्रोत्साहन मिळेल अशी आशा आहे. ते मुलांना शाळकरी वयात रोजगारावर पाठवणार नाहीत अशी अपेक्षा आहे. मुले शाळेत येतात की नाही यावर लक्ष ठेवणे गरजेचे आहे. जी मुले शाळा सोडण्याच्या तयारीत आहेत त्यांचे समुपदेशन महत्वाचे असून दूरशिक्षण व इ- शिक्षण या माध्यमातून मूलभूत शिक्षण देणे गरजेचे आहे. राष्ट्रीय मुक्त शालेय शिक्षण संस्था हे त्या दिशेने एक पाऊल आहे. शाळेत जाण्याला एक दुसरा पर्याय यात आहे प्रथम या संस्थेने यात पुढाकार घेतला आहे. प्रथम ही संस्था मुक्त शालेय शिक्षण कार्यक्रम मुली व महिलांना शाळा सोडली तरी शिक्षण घेण्यास मदत करीत आहे त्यातून माध्यमिक पातळीपर्यंत शिक्षण घेता येते. जीवनकौशल्ये त्यांना रोजगारक्षम बनवतात व काही बाबतीत त्यांनी शाळा सोडू नये यासाठी प्रयत्न केले जातात. हे प्रयत्न आणखी वाढवण्याची गरज आहे.

**शाळांच्या पायाभूत सुविधात सुधारणा-**

मुले शाळांमध्ये टिकून राहण्यासाठी तेथील पायाभूत सुविधा महत्वाच्या आहेत. महिला शिक्षक असणे ही एक गरज आहे. अनेक सामाजिक व वांशिक गट हे महिला शिक्षक नसल्याने मुलांना शाळेत पाठवत नाहीत. जास्त लोकसंख्या असलेल्या राज्यात शिक्षकांची मोठी कमतरता आहे. शिक्षणासाठी सुयोग्य वातावरण तयार करण्याकरिता चांगल्या दर्जाचे शिक्षक असणे आवश्यक आहे. भारतात ११ टक्के प्राथमिक शाळा एक शिक्षकी आहेत तर शिक्षकांची चाळीस टक्के पदे भरलेली नाहीत. सर्व प्रदेशात सारख्याच प्रमाणात शिक्षकांची उपलब्धता असली पाहिजे.

**शिक्षण व प्रशिक्षण यांची कामाशी नाळ जोडणे**

-शिक्षण व प्रशिक्षण व्यवस्था यांचा संबंध प्रत्यक्ष कामाशी जोडणे गरजेचे आहे व त्याचे महत्व आता सगळ्यांना पटले आहे. नववीपासून व्यावसायिक शिक्षणावर भर दिला जात आहे, त्यामुळे रोजगार कौशल्ये शिकण्याच्या आशेने मुले शाळेत राहतील, शाळा सोडणार नाहीत. त्यातून त्यांना आंतरवासियता प्रशिक्षणाचा अनुभव घेता येईल व शालेय शिक्षणही चालू राहील. लघुउद्योगांचा विचार केला तर ग्रामीण भागात त्यांना वाव जास्त आहे. प्रशिक्षण प्रोत्साहन योजना अलिकडेच लागू केली आहे त्यामुळे काम व शिक्षण यांची नाळ जोडण्याचा प्रयत्न

केला आहे. देशात वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या प्रकारच्या प्रशिक्षणाची गरज आहे, स्थानिक अर्थव्यवस्था बघून विशिष्ट गटांना प्रशिक्षण द्यावे लागणार आहे. व्यावसायिक प्रशिक्षणात भौगोलिक भाग, आर्थिक विविधता , उद्योगांची गरज यावर आधारित प्रशिक्षण द्यावे लागणार आहे. अवघड प्रदेशात म्हणजे ईशान्यकडील राज्ये किंवा तत्सम भागात लोक बाहेर जायला तयार नसतात, त्यासाठी राष्ट्रीय कौशल्य पात्रता योजना २०१३ अन्वये शालेय शिक्षण, व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण, उच्च शिक्षण यांची सर्वंकष एकित्रत बांधणी कऱ्ण्यात आली आहे.

**पूर्व शिक्षणाला मान्यता**

असंघटित क्षेत्रात फारसे धोरणात्मक हस्तक्षेपाचे प्रयत्न झाले नाहीत पण तेथे ८४ टक्के लोक काम करतात व इतर संघटित क्षेत्रात काम करतात. त्यामुळे असंघटित क्षेत्रातील लोकांना कौशल्ये शिकवून त्यांचे प्रशिक्षण प्रमाणित करण्याची गरज आहे. त्यांच्याकडे पिढीजात चालत आलेली कौशल्ये असतील पण त्यांच्याकडे कुठले प्रमाणपत्र नसल्याने त्यांना चांगला रोजगार मिळत नाही, उद्योग सुरू करता येत नाही. त्यामुळे कारागीर, बनारसचे दस्तकार , छत्तीसगडचे धातू उद्योग, ईशान्येकडील कौशल्याधिष्ठित उद्योग यांच्याकडे कौशल्ये असली तरी प्रमाणपत्र नसल्याने ती कौशल्याधिष्ठित मानली जात नाहीत. आरपीएल योजना त्यासाठी विस्तारली पाहिजे. त्यात कौशल्यवृद्धी, रोजगार व उच्च उत्पादनक्षमता अल्पसंख्याकांमध्ये निर्माण कऱ्णे गरजेचे आहे त्यात सहभागाच्या अडचणी आहेत. असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या नियोक्ता संघटना, व्यावसायिक संघटना, व्यापार संघटना असणे आवश्यक आहे.

**लक्ष्यवेधी हस्तक्षेपाने विशिष्ट भागातील गरजांची पूर्तता-**

युवकांमध्ये रोजगारक्षमता निर्माण करण्यासाठी उडान, हिमायत, प्रवास, नई रोशनी, स्टेप अप यासारख्या उपक्रमांचा चांगला उपयोग झाला आहे त्यांची व्याप्ती वाढवली पाहिजे व प्रशिक्षण व रोजगार यांची सांगड घालून भागणार नाही तर अशा उपक्रमांना पुढे नेले पाहिजे




त्यांचा प्रसार वाढला पाहिजे, अवघड प्रदेशात ते पोहोचले पाहिजेत. पर्वतीय, दहशतवादग्रस्त भागांमध्ये प्रशिक्षण सुविधा, पायाभूत सुविधा, खासगी व सरकारी प्रशिक्षण संस्था, नागरी समुदाय व स्वयंसेवी संस्था यांनी काम केले पाहिजे.

**नियोक्त्यांचा सक्रिय सहभाग-**

कौशल्यांचे आव्हान जसे अवघड आहे तसेच यात नियोक्त्यांचा सक्रिय सहभागही महत्वाचा आहे. शिक्षणक्रम, अंमलबजावणी व प्रशिक्षण देखरेख कार्यक्रम यात त्यांचा सहभाग असला पाहिजे. काही उद्योगांची कौशल्य मंडळे सक्रिय आहेत व कौशल्य विकासात मदत करीत आहेत पण ते संघटित क्षेत्राची कौशल्य प्रशिक्षण गरज भागवत आहेत. कामगार संघटना व नियोक्ता संघटना या शिक्षणाशी जोडल्या जाऊ शकतात. कौशल्यांची निवड व प्रशिक्षण, शाळा व उद्योग यांचा संबंध , पुरस्कर्त्याची भूमिका पार पाडणे, काही उमेदवारांना नोकऱ्या देणे अशी त्यांची भूमिका असू शकते. स्थानिक भागात शहरी व ग्रामीण संस्था तसेत नागरी समुदायांनी युवकांना कौशल्य- व्यावसायिक प्रशिक्षण अवगत करून घेण्यासाठी प्रेरित केले पाहिजे.

**इतर हस्तक्षेप-**

वंचित गटांची वर्गवारी करताना काहीवेळा ती अचूक नसते काही गटात पुनरावृत्तीची शक्यता असते. अनेक केंद्र व राज्य सरकारी विभाग हे लक्ष्य गटांसाठी विशिष्ट कार्यक्रम राबवतात. पण वर्गवारी योग्य नसेल तर त्यात गोंधळ होतो व फलनिष्पत्ती फार मोठी असत नाही. मंत्रालयांच्या पाकळीवर शिक्षण व कौशल्य विकास कार्यक्रमात समन्वय असणे गरजेचे आहे. खासगी-सरकारी भागीदारी ही विशिष्ट लक्ष्य असलेल्या कार्यक्रमात वापरता येते त्यामुळे कौशल्य अर्जित करण्याचा वेग वाढतो. प्राथमिक शिक्षणानंतरच्या टप्प्यात कार्यक्षमता वाढ, प्रशिक्षण सुधारणा, जास्त पर्याय यात सरकारी-खासगी भागीदारीचा भाग महत्वाचा ठरतो. सरकार शिक्षण व प्रशिक्षणासाठी अनुकूल स्थिती निर्माण करीत असताना काही उद्योग त्यांच्या कर्मचाऱ्यांना विशिष्ट प्रशिक्षण देऊ शकतात.

सरतेशेवटी कौशल्य विकास हे वंचिततेवर मात करण्याचे एक साधन आहे पण त्यासाठी शिक्षण व प्रशिक्षणाच्या प्रत्येक पातळीवरील फलनिष्पत्तीकडे लक्ष देणे आवश्यक आहे तरच रोजगारक्षमता वाढेल त्यामुळे लोकांना कामगार बाजारपेठेत प्रवेश मिळेल शिवाय सामाजिक समावेशकताही वाढेल.

## योजनांची माहिती

| अनु. क्र. | योजनेचे नाव | उद्देश व वैशिष्ट्ये | |
|---|---|---|---|
| शाळा सोडणाऱ्यांसाठी | | | |
| १ | कारागीर प्रशिक्षण योजना | . | १ निम्न व पूर्ण कौशल्ये असलेले कर्मचारी उद्योगांना पुरवणे. शाळा सोडण्रयांना पद्धतशीर प्रशिक्षण देणे<br>२. सुशिक्षित युवकांमधील बेरोजगारी त्यांना उद्योग रोजगारांची कौशल्ये शिकवून कमी करणे.<br>३.ही योजना आयटीआय व खासगी आयटीसी मार्फत राबवली जाते. |
| २ | शिकाऊ उमेदवार प्रशिक्षण | . | १ शिकाऊ उमेदवारांना उद्योगास अनुरूप प्रशिक्षण देण्यासाठी सुसंबद्ध अभ्यासक्रम तयार करणे, कालावधी ठरवणे. शिकाऊ उमेदवार प्रशिक्षण मंडळाने ठरवून दिलेल्या कार्यक्रमांचे नियमन करणे.<br>२ उद्योगात उपलब्ध असलेल्या सुविधांच्या आधारे गरजा पूर्ण करणारी कौशल्ये शिकवणे. मनुष्यबळ पुरवणे<br>३ शिकाऊ उमेदवार प्रोत्साहन योजना १९६१ च्या शिकाऊ उमेदवार कायद्यानुसार राबवली जाते व त्यात १ लाख उमेदवारांना विद्यावेतन देण्यात पन्नास टक्के वाटा सरकार पहिले दोन वर्षे उचलते. कायद्याअंतर्गत येण्रया आस्थापनांतच हा नियम लागू आहे. |
| ३ | ट्रायफेड- कौशल्य विकास, सुधारणा व क्षमता वर्धन हस्तकलाकार व विणकर यांच्यासाठी | | ट्रायफेड- ही राष्ट्रीय पातळीवरील सहकारी संस्था असून आदिवासी मंत्रालयाअंतर्गत काम करते व त्यात आदिवासींची उत्पादने विकण्याचे तंत्र, प्रशिक्षण वृद्धी, कौशल्य विकास यावर भर आहे. वनोत्पादने, आदिवासी हस्तकला व कारागीर, यांना उत्पादन व विक्री प्रशिक्षण दिले जाते |
| महिला व प्रौढ मुली | | | |
| ४ | प्रशिक्षण व रोजगार कार्यक्रम (स्टेप) | | या योजनेत दोन उद्दिष्टे आहेत.<br>महिलांना कौशल्ये शिकवून स्वयंरोजगार देणे उद्योजकता कौशल्ये शिकवणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | प्रियदर्शनी योजना (स्वमदत गट-संघटित क्षेत्रातील महिलांसाठी) | | महिला सक्षमीकरण व उपजीविका कार्यक्रम हा गंगेच्या मध्य पठारी प्रदेशात राबवला जातो त्याला प्रियदर्शनी कार्यक्रम असे म्हणतात त्यात महिलांचे ७२०० स्वमदत गट स्थापन करून १०८००० गरीब महिलांना रोजगार सक्षम केले आहे. उत्तर प्रदेशातील चार जिल्ह्यांसह सहा जिल्ह्यात हा कार्यक्रम राबवला जात आहे. |
| ६ | स्वाधार गृह (निराधार महिलांचे पुनर्वसन व कौशल्य विकास) | | या योजनेत तीस महिला क्षमता असलेली स्वाधारगृहे प्रत्येक जिल्हयात उभारली आहेत. त्यात निराधार महिलांना औषधे, कपडे, अन्न, उपचार दिले जातात.<br><br>त्यांच्यात भावनिक क्षमता निर्माण केली जाते व दुर्दैवी स्थितीला त्या तोंड देऊ शकतात.<br><br>त्यांना कायदेशीर मदत दिली जाते, कुटुंबात किंवा समाजात परत जाण्यासाठी पुनर्वसन केले जाते. आर्थिक व भावनिक पुनर्वसन केले जाते |
| ७ | सबला- राजीव गांधी प्रौढ मुली सक्षमीकरण योजना | | प्रौढ मुलींमधील ११-१९ वयोगटात जीवनकौशल्ये शिकवणे, शिक्षण, आरोग्य व पोषण यावर भर देणे, भारत सरकारने नोव्हेंबर २०१० मध्ये सबला योजना सुरू केली. योजनेत मुलींना कुटुंबकल्याण, आरोग्य व स्वच्छतेची व सार्वजनिक सुविधांची माहिती देणे. अर्ध्यावर शाळा सोडणाऱ्या मुलींना औपचारिक व अनौपचारिक शिक्षण देणे |
| ८ | सीमा, आदिवासी व मागास २०० जिल्ह्यात कौशल्य विकास योजना | | सीमा, आदिवासी व मागास जिल्ह्यातून महिलांना स्वयंरोजगार दिला जातो व उपजीविकेत मदत केली जाते, उत्पन वाढवण्यास मदत होते. उत्पादनक्षमता वाढून बाजारात आवश्यक असलेली कौशल्ये विकसित केली जातात. |


| | | | |
|---|---|---|---|
| ग्रामीण गरीब | | | |
| ९ | पंडित दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना ( आजीविका) | | २०१७ पर्यंत दहा लाख ग्रामीण युवकांना रोजगार पुरवला जाणार आहे. या योजनेत आंतरराष्ट्रीय दर्जाची कौशल्ये शिकवली जाणार असून मेक इन इंडिया या पंतप्रधानांच्या कार्यक्रमाशी ही कौशल्ये सुसंगत असतील.<br>शारीरिक कमतरता असलेल्या विशेष युवकांना प्रशिक्षण दिले जाईल व ग्रामीण युवकांना कौशल्ये शिकवण्यासाठी आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय उद्योगांची मदत घेतली जाईल. |
| १० | ग्रामीण स्वयंरोजगार व प्रशिक्षण कार्यक्रम (आरसेटी) | | ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था सर्व देशभरात आहेत. बेरोजगारी दूर करणे हा त्यामागचा उद्देश आहे. राज्य व केंद्र सरकारच्या मदतीने चालवल्या जाणय्रा या ना नफा संस्था आहेत. ग्रामीण भागात रोजगारक्षमता निर्माण करणे, व्यवसाय प्रशिक्षण सुविधा देणे. प्रशिक्षित तरूणांना लघुउद्योग सुरू करण्यास मदत करणे. |
| शहरी गरीब | | | |
| ११ | राष्ट्रीय शहरी उपजीविका कार्यक्रम (एनयुएलएम) रोजगार कौशल्ये व नोकया | | रोजगार मिळवून देणे, कौशल्ये शिकवणे, उद्योजकता विकास साधणे<br>तंत्र विद्यापीठे, शैक्षणिक संस्था, खासगी कौशल्य संस्था, प्रमाणित उद्योग यांच्या माध्यमातून उद्योगांशी समन्वय साधणे<br>तंत्र विद्यापीठे, शैक्षणिक संस्था, खासगी कौशल्य संस्था, प्रमाणित उद्योग यांच्या माध्यमातून उद्योगांशी समन्वय साधणे<br>शहरी पातळीवर आवश्यक असलेली कौशल्ये शिकवणे.<br>मानवी कौशल्ये, व्यावसायिक शिष्टाचार व प्रशिक्षणपूर्ण समुपदेशन करणे |

| | | | |
|---|---|---|---|
| अल्पसंख्याक तरूण | | | |
| १ २ | बहुक्षेत्रीय विकास कार्यक्रम | | अल्पसंख्याक समाजाची आर्थिक व सामाजिक स्थिती सुधारणे, असमतोल दूर करून रोजगारांची संधी प्राप्त करून देणे. |
| १ ३ | सीखो औ˜ कमाओ | | i अल्पसंख्याकातील बेरोजगारीचा दर कमी करणे. |
| | | . . . | ii अल्पसंख्याकातील पारंपरिक कौशल्ये संवर्धित करणे व त्यांना बाजारपेठेशी जोडणे<br>iii सध्याच्या कामगारांची रोजगारक्षमता वाढवणे व शाळातील गळती कमी करणे, नोकऱ्या उपलब्ध<br>iv जीविकेची साधने निर्माण करणे व त्यांना मुख्य प्रवाहात आणणे.<br>v सक्षम मनुष्यबळ तयार करणे. |
| १ ४ | परवाझ | | दारिद्र्यरेषेखालील अल्पसंख्याकांना मुख्य प्रवाहात आणणे, त्यांना शिक्षण व कौशल्ये शिकवण्याची व्यवस्था करणे. रोजगार देणे.<br>रोजगारासाठी किमान शिक्षण मिळण्याची व्यवस्था करणे. कौशल्यांमध्ये सुधारणा करणे जीवनाच्या पुढील टप्प्यात यशस्वी होण्यास मदत करणे. |
| जम्मू-काश्मीरचे युवक | | | |
| १ ५ | हिमायत | | हिमायत योजनेत जम्मू काश्मीरमधील युवकांना कौशल्य विकास व रोजगार एकत्रित उपलब्ध केले जातात. येत्या पाच वर्षात एक लाख युवकांना या योजनेत समाविष्ट केले जाईल. त्यासाठी त्यांना प्रशिक्षण दिले जाईल . खासगी व ना नफा संस्था त्यात सहभागी असतील. |
| १ ६ | उडान | | खास उद्योगांचा पुढाकार असलेली ही योजना असून यात जम्मू-काश्मीरमधील युवकांना विशेष करून पदवीधर व पदव्युत्तर युवकांना स्थानिक व जागतिक संधी मिळवून देणे. कंपन्यांना बुद्धिमान युवक मनुष्यबळ म्हणून उपलब्ध करून देणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| नक्षल प्रभावित क्षेत्र | | | |
| १७ | रोशनी | | नक्षल किंवा डाव्या अतिरेकी संघटनांचा प्रभाव असलेल्या २७ जिल्ह्यात रोशनी ही योजना राबवली जाते त्यात काही मार्गदर्शक तत्वे लागू केली आहेत. ३,६,९ व १२ महिन्यांसाठी यात प्रशिक्षण कार्यक्रम राबवले जातात. |
| १८ | नक्षलग्रस्त ३४ जिल्ह्यात कौशल्य विकास | | नक्षलग्रस्त भागातील जिल्ह्यात आयटीआय व दोन कौशल्य विकास केंद्रामार्फत व्यावसायिक प्रशिक्षण देणे |
| ईशान्येकडील राज्ये | | | |
| १९ | क्षमता निर्मिती व तांत्रिक साह्य योजना | | मेसर्स डोनर यांच्या माध्यमातून ही कौशल्य विकास योजना राबवली जाते. त्यात तरूणांमध्ये स्वयंरोजगार सक्षमता निर्माण होते. मध्यम पातळीवरील कर्मचाय्रांचे ज्ञान व कौशल्य सुधारून सुप्रशासनाचा प्रयत्न केला जातो. |
| २० | ईशान्येकडील राज्यात व सिक्कीममध्ये कौशल्य विकास कार्यक्रम राबवण्याची योजना | | ईशान्येकडील राज्यात व सिक्कीममध्ये २० आयटीआयमध्ये सुधारणा करणे. २८ आयटीआयमधील पायाभूत सुविधांच्या त्रुटी दूर कऱ्णे. केंद्र व राज्य पातळीवर निधी वितरणात देखरेख |
| अनुसूचित जाती-जमातीतील तरूण | | | |
| २१ | अनुसूचित जाती-जमातींना केंद्रीय मदत उपयोजना | | दारिद्र्यरेषेखालील अनुसूचित जाती जमातीच्या तरूणांचा आर्थिक विकास घडवणे. योजना अधिक उपयोगी बनवणे. स्थानिक व्यवसायांच्या अनुषंगाने योजना राबवण्याची लवचिकता. फक्त एससीपी व इतर आर्थिक संस्था व महामंडळे यांची मदत घेता येईल. |
| २२ | राष्ट्रीय अनुसूचित जमाती अर्थ व विकास महामंडळ | | अनुसूचित जमातीच्या तरूणांना कौशल्य व उद्योजकता विकासासाठी आर्थिक साह्य, अनुदान देणे. त्यांच्यासाठी रोजगार संधी व स्वयंरोजगार तयार करणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| शारीरिक अक्षमता असलेले विशेष लोक | | | |
| २३ | विशेष व्यावसायिक पुनर्वसन केंद्र | | शारीरिक अक्षमता असलेल्या लोकांना व्यावसायिक पुनर्वसन करून रोजगार मिळवून देणे, त्यांना आर्थिक मुख्य प्रवाहात आणणे. किमान २० व्यावसायिक पुनर्वसन केंद्रे देशात कार्यरत आहेत. सात कौशल्य प्रशिक्षण कार्यशाळा याच्याशी निगडित आहेत. |
| २४ | शारीरिक अक्षमता असलेल्यांना कौशल्ये विकास कार्यक्रम देणाऱ्या संस्था | | कर्णबधिरांसाठी अलि यावर जंग राष्ट्रीय संस्था, शारीरिक अक्षम विशेष लोकांसाठी पंडित दीनदयाळ उपाध्याय संस्था, मानसिक विकलांगांसाठी राष्ट्रीय मानसिक विकलांग संस्था (एनआयएमएच), दृष्टीहीनांसाठी राष्ट्रीय दृष्टीहीन संस्था, (एनआयव्हीएच), राष्ट्रीय बहुविकलांग सक्षमीकरण राष्ट्रीय संस्था (एनआयइपीएमडी), राष्ट्रीय अस्थिविकलांग संस्था (एनआयओएच), स्वामी विवेकानंद राष्ट्रीय पुनर्वसन, प्रशिक्षण व संशोधन संस्था(एसव्हीएनआयआरटीएआर), राष्ट्रीय सामाजिक सुरक्षा संस्था ( एनआयएसडी) या संस्था विविध प्रशिक्षण व पदवी कार्यक्रम राबवतात. |
| उद्योजक | | | |
| २५ | स्वयंरोजगार कार्यक्रम | | उद्योजकता विकास कार्यक्रम ३-७ दिवस राबवणे. आरएसइटीआय व नामांकित संस्थामार्फत हा कार्यक्रम राबवला जातो. |
| २६ | उद्योजकता विकास कार्यक्रम (आयएमसी, इडीपी, इएसडीपी, एमडीपी) योजना | | मध्यम उद्योग निर्मितीसाठी युवकांच्या कौशल्यांचा विकास करण्यासाठी उद्योजकता विकास कार्यक्रम राबवणे. आयटीआय, पॉलिटेक्निक व तंत्रज्ञान संस्थामार्फत हे कार्यक्रम राबवले जातात. स्वयंरोजगारासाठी प्रेरित केले जाते. |

| | | | |
|---|---|---|---|
| सामाजिक व आर्थिक मागास व शैक्षणिकदृष्ट्या वंचितांसाठी | | | |
| २७ | जन शिक्षणसंस्थान प्रौढ शिक्षणव कौशल्य विकासासाठी स्वयंसेवी संस्थांना प्रोत्साहन देणे | | निरक्षर, शाळा सोडलेल्या तसेच नवसाक्षर लोकांना प्रदेशातील गरजानुसार व्यावसायिक प्रशिक्षण .<br>प्रौढ शिक्षण संचालनालय व राष्ट्रीय मुक्त शाळा संस्था व सामान्य रोजगार व प्रशिक्षण संचालक या संस्थांच्या मदतीने प्रशिक्षण कार्यक्रम. प्रशिक्षण देण्यासाठी सक्षण लोक उपलब्ध करणे. पायाभूत सुविधा व उपकरणे देणे.<br>साध्या परीक्षा घेऊन प्रमाणपत्रे देणे.<br>नियोक्ते व उद्योग यांच्याशी संपर्क व उमेदवारांना नोकया उपलब्ध करणे. |



# महिलांच्या कौशल्यविकासात अडथळा ठरणारे घटक

**देव नाथन**



कुशल भारत (स्कीलींग इंडिया) ने आता बऱ्यापैकी सर्वांचे लक्ष वेधले आहे. पण, याठिकाणी लक्षात घेण्याजोगा मुद्दा म्हणजे महिलांच्या कौशल्य विकासाची होत असलेली कोंडी. फक्त महिलांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देण्यासाठी मोठ्या संख्येने पाठवणे हा यावरचा उपाय नाही. देशाच्या अर्थव्यवस्थेत कुशल महिलांची भागीदारी वाढवण्यासाठी दोन गोष्टी जाणून घेण्याची आवश्यकता आहे. १) महिलांना कौशल्य विकास प्रशिक्षणापासून रोखणाऱ्या बाबी, २) कुशल महिलांना रोजगारापासून वंचित करणारे घटक.

आयटीआय वा इतर प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रशिक्षण घेण्यासाठी मोठ्या संख्येने मुली व तरुणी का पुढे येत नाहीत? बरं, त्याचवेळी संगणक प्रशिक्षणासाठी (आयटी) मात्र तरुणींची संख्या मोठी असते. प्रशिक्षणाचा खर्च उचलण्यासाठी चांगली नोकरी हाती असण्याची गरज आहे का? तसेच महिला आपल्याला हव्या त्या क्षेत्रात करिअर करु इच्छितात का?

औद्योगिक क्षेत्र व माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात कार्यरत असलेल्या महिलांमधील फरक आपल्या लक्षात येतो. महिलांच्या गरोदरपणाच्या कालावधीत अपत्याची काळजी घेणे हे तिच्यासाठी व कुटुंबासाठी महत्वाचे आहे. आपल्या देशात सार्वजनिकरित्या पुरस्कृत बाल संगोपन पद्धती नाही. एवढेच नाही तर पितृसत्ताक पद्धतीने बालसंगोपनाची जबाबदारी महिलेवरच टाकली आहे. म्हणून, बालसंगोपानाची जबाबदारी आपसूकच महिलेवर येते.

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांना (तसेच कायदा व वैद्यकीय व्यवसाय) महिन्याकाठी चांगली कमाई होत असल्यामुळे त्यांना बालसंगोपनाचा खर्च सहज परवडतो. तसेच काही आयटी कंपन्या प्रशिक्षित महिला आपल्या कंपनीतून जाऊ नयेत म्हणून त्यांच्या कामाच्या वेळा सोयीच्या ठेवतात; प्रसंगी त्यांना घरुन काम करण्याचीही मुभा देतात. अशा महिलांसाठी बालसंगोपन हा त्यांच्या व्यावसायिक आयुष्यातील अडथळा ठरत नाही.

वस्तूनिर्माण क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांना मात्र बालसंगोपनाचा खर्च परवडत नाही. तसेच अगदी बोटावर मोजता येईल एवढ्या कारख्यान्यांमध्ये पाळणाघराची सुविधा आहे. वस्त्रोद्योगात शिंपी म्हणून काम करणाऱ्या महिला, इलेक्ट्रॉनिक क्षेत्रात असेम्ब्लर म्हणून काम करणाऱ्या महिला अपत्यप्राप्तीनंतर नोकरी सोडतात. वस्त्रोद्योग क्षेत्रात काम करणाऱ्या महिला प्रसंगी अगदीच कमी पगारावर काम करतात तर कधी घरुन काम करण्याची परवानगी घेतात. बालसंगोपन करतानाच त्यांना अतिशय कमी पगारावर का होईना काम करावे लागते जे नियमित कामात मिळाले नसते.

शिशुसंगोपनाचा मुद्दा उद्योगक्षेत्रात असल्यामुळे महिला त्याऐवजी इतर चांगले वेतन मिळणाऱ्या क्षेत्राकडे वळतात. म्हणून महिलांची कारखान्यातील संख्या घटत आहे. यात शिशुसंगोपन, महिलांच्या घरगुती समस्या यामुळे महिलांची कारखाने, उद्योगक्षेत्रात काम करण्यापासून कोंडी होत आहे. मुख्य म्हणजे यात

**सध्या शिशुसंगोपन व पाळणाघराचा खर्च नियोक्त्याकडून उचलला जातो. हा खर्च पाहता, नियोक्ता पुरुष उमेदवारांची नियुक्ती करण्यास प्राधान्य देतो. त्यामुळे आपसूकच त्याचा खर्च कमी होतो.शिशुसंगोपन व इतर आवश्यक बाबींवरील खर्च उचलण्याची जबाबदारी अशी निश्चित करणे आवश्यक आहे जेणेकरुन नियोक्ता प्रशिक्षित महिलांना कामावर घेण्यास तयार होईल. यापैकी एक मार्ग म्हणजे महिला कामगारांवरील अतिरिक्त खर्चाची जबाबदारी त्या उद्योग वा संस्थेवर टाकू नये, ही जबाबदारी सरकारने घ्यावी. मातृत्व रजा व शिशुसंगोपनाचा खर्च एखाद्या नियोक्त्यावर टाकू नये, तो सार्वत्रिकरित्या करदात्यांवर टाकावा. हा खर्च करदात्यांवर टाकण्याच्या मुद्याचे, मध्यमवर्गीय करदात्यावर खर्चाचा भार टाकण्याचे काही लोक समर्थन करणार नाहीत. पण हा अप्रत्यक्ष कराचा मुद्दा मानून महिला कामगारांना चांगला रोजगार मिळेल. यासाठी नियोक्त्यांवर सेस वा भार लावण्याची पद्धती असावी, ज्यात प्रत्येक औद्योगिक संस्था महिला कामगारांशी संबंधित मातृत्व वा इतर बाबींचा खर्च उचलेल. यामुळे कोणा एका संस्थेवर खर्चाचा बोजा पडणार नाही, त्याची विभागणी होईल. हा सेस वा भार नफ्यावर लेवीच्या स्वरुपात लावण्यात यावा. आज कार्पोरेट सोशल रिसपॉन्सिबिलीटी (सीएसआर) अंतर्गत कंपन्यांना दोन टक्के नफ्याचा वाटा सरकारडे जमा करावा लागतोच की. सेस वा भार लावल्यामुळे प्रशिक्षित महिला कामगारांना रोजगार सोडण्याची वेळ येणार नाही.**

घरापासून दीर्घकाळ बाहेर राहून काम करावे लागते.

मागणीची बाजू काय म्हणते? नियोक्ते प्रशिक्षित महिलांना का कामावर घेत नाहीत, त्यांच्यासाठी कधी या नोकया उपलब्ध होतील? सध्या शिशुसंगोपन व पाळणाघराचा खर्च नियोक्त्याकडून उचलला जातो. हा खर्च पाहता, नियोक्ता पुरुष उमेदवारांची नियुक्ती करण्यास प्राधान्य देतो. त्यामुळे आपसूकच त्याचा खर्च कमी होतो.

शिशुसंगोपन व इतर आवश्यक बाबींवरील खर्च उचलण्याची जबाबदारी अशी निश्चित करणे आवश्यक आहे जेणेकरुन नियोक्ता प्रशिक्षित महिलांना कामावर घेण्यास तयार होईल. यापैकी एक मार्ग म्हणजे महिला कामगारांवरील अतिरिक्त खर्चाची जबाबदारी त्या उद्योग वा संस्थेवर टाकू नये, ही जबाबदारी सरकारने घ्यावी. मातृत्व रजा व शिशुसंगोपनाचा खर्च एखाद्या नियोक्त्यावर टाकू नये, तो सार्वत्रिकरित्या करदात्यांवर टाकावा.

हा खर्च करदात्यांवर टाकण्याच्या मुद्याचे, मध्यमवर्गीय करदात्यावर खर्चाचा भार टाकण्याचे काही लोक समर्थन करणार नाहीत. पण हा अप्रत्यक्ष कराचा मुद्दा मानून महिला कामगारांना चांगला रोजगार मिळेल. यासाठी नियोक्त्यांवर सेस वा भार लावण्याची पद्धती असावी, ज्यात प्रत्येक औद्योगिक संस्था महिला कामगारांशी संबंधित मातृत्व वा इतर बाबींचा खर्च उचलेल. यामुळे कोणा एका संस्थेवर खर्चाचा बोजा पडणार नाही, त्याची विभागाणी होईल. हा सेस वा भार नफ्यावर लेवीच्या स्वरुपात लावण्यात यावा. आज कार्पोरेट सोशल रिसपॉन्सिबिलीटी (सीएसआर) अंतर्गत कंपन्यांना दोन टक्के नफ्याचा वाटा सरकारडे जमा करावा लागतोच की. सेस वा भार लावल्यामुळे प्रशिक्षित महिला कामगारांना रोजगार सोडण्याची वेळ येणार नाही.



महिलांना उद्योगक्षेत्रापासून रोखणारा आणखी एक तिसरा मुद्दा आहे. उपकरणांचा पूर्ण क्षमतेने वापर होण्यासाठी, उत्पादनाच्या मागणीची पूर्तता करण्यासाठी उद्योगाचे काम तीन शिफ्टमध्ये चालते. यात रात्रपाळीचाही समावेश आहे. पण भारतासारख्या देशात रात्रीच्या वेळी स्त्रिने एकटीने प्रवास करण्यात धोके आहेत. दिल्लीत डिसेंबर २०१२ मध्ये एका फार्मसिस्टचा बलात्कार करुन खून केल्याची घटना ही दिल्लीसारख्या राजधानीतील सार्वजनिक ठिकाणांवरील महिलांच्या सुरक्षेबाबत असलेली धोक्याची पातळी दर्शवते. आयटी कंपन्या व कॉल सेंटर कंपन्यांनी मिनी बस व कारची सेवा उपलब्ध करुन देऊन या समस्येवर काही प्रमाणात तोडगा काढला आहे. पण, नफ्याचे प्रमाण कमी असल्यामुळे सर्वच कारखान्यांना हा निर्णय परवडण्याजोगा नाही.

कॉल सेंटरमध्ये डिसेंबर २०१२ च्या बलात्कार-खूनाच्या घटनेनंतर कॉल सेंटर कंपन्यांनी वाहतूक सुविधा पुरवल्यानंतरही दिल्ली व परिसरातील कॉल सेंटर्समध्ये काम करणाया तरुणींचे प्रमाण झपाट्याने कमी झाल्याचे असोचॅमच्या अहवालात म्हटले आहे. म्हणून महिलांना काम करण्यापासून रोखणारा हा तिसरा घटक आहे, असे आपण म्हणू या.

इस्टर बोसर्प, आपल्या वुमन्स रोल इन इकोनॉमिक डेवलपमेंट (१९७०, न्यूयॉर्क सेंट मार्टीन्स प्रेस) या पुस्तकात म्हणते, "महिलांसाठी असलेली मातृत्व रजा व पाळणाघराची तरतुद यामुळे महिलांचे प्रमाण कमी आहे हा दावा पटत नाही, कारण विशेष लाभांवर होणारा खर्च प्रत्येक नियोक्त्याने विभागून घ्यावा, जरी एखाद्या ठिकाणी महिला कामगार नसतील तरीही त्याच्यावर या खर्चाचा काही भार टाकावा" पुढे ती म्हणते की," अशाप्रकारे जोपर्यंत आर्थिक समानीकरण होत नाही, मग भलेही महिलांविरोधात नकारात्मक तक्रारी आल्या तरी हरकत नाही. तेंव्हाच कारखान्यात महिलांच्या नियुक्तीला चालना मिळेल." दिल्लीत डिसेंबर २०१२ च्या घटनेनंतर काही लोक असे म्हणतात की, महिलांनी रात्रीच्या वेळी सार्वजनिक ठिकाणी जाणे टाळावे. महिलांना सुरक्षा पुरवायची सोडून महिलांना कामापासून परावृत्त करणारी भाषा बोलली जाते. त्यामुळेही महिलांचे कारख्यान्यांमध्ये, औद्योगिक क्षेत्रात काम करण्याचे प्रमाण कमी आहे.

या लेखातून असे सांगायचे आहे की, महिलांची कुशलता वाढवण्यासाठी तीन गोष्टींवर भर देण्याची आवश्यकता आहे. शिशुसंगोपानाविषयीच्या तरतुदीं बाबत विषयी जनजागृती प्रसुती रजा व इतर बाबींवर होणाऱ्या खर्चाची विभागणी, आणि सार्वजनिक ठिकाणी विशेषत: रात्रीच्या वेळी महिलांची सुरक्षितता सुनिश्चित करणे.

■■■

*लेखक इन्स्टिट्यूट फॉर ह्युमन डेव्हलपमेंट, नवी दिल्ली व ड्यूक विद्यापीठ, अमेरिका येथे अभ्यागत प्राध्यापक म्हणुन कार्यरत आहे.*

email: cnathandev@hotmail.com

# कौशल्यातून मानवी भांडवलाची उभारणी

सचिन अधिकारी



भारत हा जगातील एक विस्तारणारी अर्थव्यवस्था असलेला देश असल्याचे आतापर्यंत अनेक पाहणी अभ्यासातून दिसून आले आहे. देशातील ६४ टक्के लोक हे काम करण्याच्या वयोगटातील असल्याने भारत हा तरूण देश मानला जातो. बुद्धिमान व रोजगारक्षम लोकांच्या मदतीने भारताची लोकसंख्यात्मक रोजगारक्षमता २०२० पर्यंत मोठी असेल. रोजगारासाठी आपला देश सोन्याची खाणच असेल असे म्हटले जाते.

सध्याचा आर्थिक वाढीचा वेग व गुंतवणूक धोरणातील गतीशीलता पाहिली तर भारतात उच्च तांत्रिक व इतर मानवी कौशल्ये असलेल्या लोकांची मागणी वाढणार आहे. २०१५ पर्यंत भारताला माहिती तंत्रज्ञान व त्याच्याशी संबंधित सेवांमध्ये २३ लाख लोकांची गरज भासणार आहे. दुर्दैवाने गेल्या पंधरा वर्षात भारताने अशा आव्हानांना सामोरे जाऊ शकतील असे केवळ १६ लाख व्यावसायिक तयार केले आहेत, याशिवाय येत्या दोन वर्षात आणखी ८ लाख व्यावसायिक तयार होतील अशी अपेक्षा आहे. जागतिक आर्थिक मंचाच्या माहितीनुसार भारतातील २५ टक्के मनुष्यबळ हे संघटित क्षेत्रात काम करण्यास पात्र आहे. असंघटित क्षेत्रात रचनात्मक कौशल्य विकास व प्रशिक्षण व्यवस्था किंवा कौशल्य सुधारणा यांचा अभाव आहे.

अंदाजे ५० लाख पदवीधर हे २०१५ मध्ये उत्तीर्ण होऊन बाहेर पडतील त्यातील ३४ टक्के रोजगारास सक्षम असतील कारण बाकीच्यांकडे कुठल्याही उद्योगासाठी लागणारी कौशल्ये नसतील. नियोक्ते हे नेहमी क्षेत्र विशिष्ट व इतर कौशल्ये अवगत असलेल्या तरूणांची भरती करीत असतात. याचा अर्थ रोजगाराचा प्रश्न हा केवळ तांत्रिक व इतर कौशल्यांच्या प्रशिक्षणातूनच सुटू शकतो, विद्यापीठाची पदवी नामांकित संस्थेत नोकरी मिळवण्यास पुरेशी नाही. अनेक तरूणांकडे सारख्याच पदव्या असणार आहेत व त्यांची कौशल्येही सारखी असू शकतात त्यामुळे नोकरीसाठी अर्ज केल्यानंतर त्यातील फार थोड्या उमेदवारांची निवड होईल. कौशल्याचे हे महत्व माहिती असले तरी सरतेशेवटी तुमची शैक्षणिक कारकीर्द व मुलाखत याच्या समवेत तुमची रोजगारयोग्यता हीच नोकरी टिकवण्यास कारणीभूत ठरणार आहे. आपण आता तांत्रिक ज्ञान महत्वाचे असलेल्या समाजात राहतो आहोत. याशिवाय तुमचे कामाच्या ठिकाणी इतरांशी वागणे व इतर बाबींची कौशल्येही महत्वाची आहेत, तुम्ही एकमेकांशी कामाच्या ठिकाणी कसा संपर्क ठेवता याला महत्व आहे त्यामुळे कंपनीतील

**सध्याचा आर्थिक वाढीचा वेग व गुंतवणूक धोरणातील गतीशीलता पाहिली तर भारतात उच्च तांत्रिक व इतर मानवी कौशल्ये असलेल्या लोकांची मागणी वाढणार आहे. २०१५ पर्यंत भारताला माहिती तंत्रज्ञान व त्याच्याशी संबंधित सेवांमध्ये २३ लाख लोकांची गरज भासणार आहे. दुर्दैवाने गेल्या पंधरा वर्षात भारताने अशा आव्हानांना सामोरे जाऊ शकतील असे केवळ १६ लाख व्यावसायिक तयार केले आहेत, याशिवाय येत्या दोन वर्षात आणखी ८ लाख व्यावसायिक तयार होतील अशी अपेक्षा आहे. जागतिक आर्थिक मंचाच्या माहितीनुसार भारतातील २५ टक्के मनुष्यबळ हे संघटित क्षेत्रात काम करण्यास पात्र आहे. असंघटित क्षेत्रात रचनात्मक कौशल्य विकास व प्रशिक्षण व्यवस्था किंवा कौशल्य सुधारणा यांचा अभाव आहे.**

**अंदाजे ५० लाख पदवीधर हे २०१५ मध्ये उत्तीर्ण होऊन बाहेर पडतील त्यातील ३४ टक्के रोजगारास सक्षम असतील कारण बाकीच्यांकडे कुठल्याही उद्योगासाठी लागणारी कौशल्ये नसतील. नियोक्ते हे नेहमी क्षेत्र विशिष्ट व इतर कौशल्ये अवगत असलेल्या तरूणांची भरती करीत असतात. याचा अर्थ रोजगाराचा प्रश्न हा केवळ तांत्रिक व इतर कौशल्यांच्या प्रशिक्षणातूनच सुटू शकतो, विद्यापीठाची पदवी नामांकित संस्थेत नोकरी मिळवण्यास पुरेशी नाही.**

किंवा उद्योग आस्थापनातील वातावरणात काम करताना तुमचा आत्मविश्वास वाढतो. स्थित्यंतरात्मक प्रशिक्षण येथे महत्वाचे ठरते व ते तांत्रिक ज्ञानाबरोबर देणे महत्वाचे असते त्यात आंतरव्यक्ती व व्यवस्थापकीय कौशल्ये आत्मसात करावी लागतात. त्यामुळे विद्यार्थी कंपनी जगतातील वाढत्या आव्हानांना तोंड देऊ शकतात. याशिवाय नॅसकॉम (नॅशनल असोसिएशन ऑफ सॉफ्टवेअर अँड सर्व्हिसेस कंपनीज) ही संस्था सांगते त्याप्रमाणे भारतीय मनुष्यबळात दरवर्षी ३० लाख पदवीधर व पदव्युत्तर विद्यार्थ्यांची भर पडते. त्यातील केवळ २५ टक्के तंत्र पदवीधर आणि १०-१५ टक्के इतर पदवीधर तरूण हे रोजगारयोग्य ठरतात. आजच्या शिक्षणपद्धतीत तरूणांना रोजगार कौशल्यांचे प्रशिक्षण देण्यावर भर दिला जात नाही. त्यामुळे त्यांना रोजगार मिळत नाहीत शिवाय अनेकांची रोजगार कौशल्ये ही कालबाह्य ठरतात त्यामुळे त्यांनाही रोजगार गमवावा लागू शकतो. सध्याची आर्थिक वाढ बघता ही आव्हाने वाढत जाणार आहेत. साधारण ७५ टक्के नवीन रोजगार संधी नव्याने निर्माण होतील पण ती तंत्रकौशल्यावर आधारित असतील. सरकार लोकांची कौशल्ये व व्यवसाय शिक्षण वाढवण्यावर भर देत आहे.

मनुष्यबळाचा विचार केला तर या नवीन तरूणांना नेतृत्व गुण आणि निर्णय क्षमता आवश्यक असलेल्या पदांवर नोकऱ्या मिळू शकतात पण नियोक्त्यांना हे माहिती असते की केवळ व्यावसायिक व तांत्रिक कौशल्ये पुरेशी नसतात. कारण संघटनात्मक व इतर उद्दिष्टे साध्य करण्यासाठी एकमेकांशी संपर्काची चांगली कला अवगत असावी लागते. ग्राहकांशी चांगले संबंध प्रस्थापित करता आले पाहिजेत त्याचबरोबर इतर संबंधितांशीही चांगला संपर्क आवश्यक असतो, तोही कौशल्यांचाच भाग आहे. म्हणजेच तांत्रिक कौशल्यांबरोबरच, संपर्क व इतर कौशल्ये, नेतृत्वगुण यांचा विचार तुम्ही रोजगार योग्य आहात की नाही, हे ठरवताना होणार आहे तरच तुम्हाला नोकरी मिळणार आहे.

> भारतात जागतिकीकरण व व्यापाराच्या उदारीकरणाने कामगार बाजारपेठेत अनेक बदल घडून आले आहेत. आर्थिक सुधारणांमुळे नवीन तंत्रज्ञान येत आहे व त्यातून कौशल्याधिष्ठित मनुष्यबळाचे महत्व वाढत आहे. अगदी असंघटित क्षेत्रातील छोट्या उद्योगांनाही नव्या संधी उपलब्ध होत आहेत. शेवटी कौशल्ये म्हणजे मनुष्यबळात सुधारणा करण्याची एक पद्धत आहे, त्यातून कामगारांना उत्पन्नाची सुरक्षितता मिळेल. भारतासारख्या विकसनशील देशातील कमी शिकलेल्या लोकांना त्याचा फायदा होईल.

प्रभावी संवाद किंवा संपर्क, नेतृत्व गुण यासारखी मानवी कौशल्ये प्रशिक्षणातून आत्मसात करता येतात की नाही यावर मतभेद आहेत. बाह्य प्रशिक्षणातून एखाद्या व्यक्तीमधील कौशल्ये फार थोड्या प्रमाणात बदलता येतात कारण ती व्यक्ती एका विशिष्ट जीवनशैलीतून किंवा पार्श्वभूमीतून आलेली असते. त्यामुळे मूलभूत गोष्टी बदलता येत नाहीत पण प्रभावी प्रशिक्षणाने काही प्रमाणात व्यक्तीत बदल घडवता येतात. मानवी पातळीवरील कौशल्याचे भारतात महत्व फार आहे, आपल्या देशात शिक्षणामध्ये व्यक्तीमत्व विकासावर फार भर दिला जात नाही. कंपन्यांना खुल्या मनोवृत्तीची व नवीन कल्पनांचा स्वीकार करणारी माणसे हवी असतात. नवीन कर्मचाऱ्यांनी केलेल्या सूचनांची दखल घेतली पाहिजे. त्यांचा उत्पादनातील बौद्धिक व संकल्पनात्मक सहभाग वाढवला पाहिजे व सामूहिक पातळीवर काम झाले पाहिजे अशी अपेक्षा असते. कंपनी किंवा उद्योगातील वातावरणाशी जुळवून घेणे तरूणांना काहीवेळा जड जाते असे जुळवून घेणे हा मानवी कौशल्याचाच एक भाग झाला, नवीन प्रक्रिया शिकणे व सकारात्मक पद्धतीने योगदान देणेही यात आवश्यक असते.

काही कंपन्या कर्मचाऱ्यांची निवड करताना आंतरव्यक्ती संज्ञापन कौशल्ये, वर्तन कौशल्ये , दृष्टिकोन, प्रेरणा , नेतृत्व गुण, वेळेचे व्यवस्थापन, सामाजिक स्वीकार्यता या बाबींचा विचार करतात. रोजगार मिळण्यासाठी विद्यार्थ्यांनी रोजगार अनुकूल कौशल्याचे प्रशिक्षण घेतले पाहिजे, नेहमीच्या शिक्षणाबरोबर ते आवश्यक आहे. व्यावसायिक भूमिका पार पाडताना त्याचा उपयोग होतो. शिक्षण घेऊन बाहेर पडल्यावर त्यांच्याजवळ रोजगार क्षमता असते. स्थित्यंतरांना सामोरे जाण्याचे प्रशिक्षण ही दरी भरून काढू शकते, त्यामुळे कंपनी जगातील नव्या आव्हानांना तोंड देण्यास तरूण समर्थ बनतात, या प्रशिक्षणांमध्ये सर्वंकष दृष्टिकोन असतो व त्यात मुलांची अंतर्गत घडण केली जाते व रोजगार कौशल्येही

शिकवली जातात. मानवी कौशल्ये शिकवल्याने एखादी व्यक्ती चांगली माणूस बनू शकते मग ती कौशल्ये व्यावसायिक, व्यक्तीगत व सामाजिक आयुष्यातील विकासात तसेच यशात उपयोगी पडतात.

व्यावसायिक किंवा कौशल्य प्रशिक्षण हे शिक्षणापासून वेगळे काढता येणार नाही, अलिकडेच प्रसिद्ध करण्यात आलेल्या 'असर'च्या अहवालात असे म्हटले आहे की, आपली प्राथमिक शिक्षण पद्धती ही शालेय शिक्षणाचा दर्जा सुधारण्यात अपयशी ठरत आहे, ग्रामीण व सरकारी शाळांमध्ये ही स्थिती खूप वाईट आहे. शाळांमधून बाहेर पडणारी मुलेच आपले पुढचे मनुष्यबळ आहे व यात मुलांची शाळेतून गळती मोठ्या प्रमाणात होत आहे, हा पेचप्रसंग आपल्याला हाताळावा लागणार आहे. आपली शिक्षण पद्धती कौशल्यास अनुकूल असली पाहिजे व त्यामुळे विद्यार्थ्यांना उत्तीर्ण झाल्यानंतर रोजगार मिळण्यासाठी आवश्यक कौशल्ये शिकवली गेली पाहिजेत. त्याचबरोबर प्रशिक्षक व शिक्षक यांचे परस्पर प्रमाणही योग्य असले पाहिजे तरच दर्जेदार शिक्षण देता येईल, विद्यार्थ्यांना त्यांच्या जीवनात उपयोगी पडणारे ज्ञान देता येईल.




भारतात जागतिकीकरण व व्यापाराच्या उदारीकरणाने कामगार बाजारपेठेत अनेक बदल घडून आले आहेत. आर्थिक सुधारणांमुळे नवीन तंत्रज्ञान येत आहे व त्यातून कौशल्याधिष्ठित मनुष्यबळाचे महत्व वाढत आहे. अगदी असंघटित क्षेत्रातील छोट्या उद्योगांनाही नव्या संधी उपलब्ध होत आहेत. शेवटी कौशल्ये म्हणजे मनुष्यबळात सुधारणा करण्याची एक पद्धत आहे, त्यातून कामगारांना उत्पन्नाची सुरक्षितता मिळेल. भारतासारख्या विकसनशील देशातील कमी शिकलेल्या लोकांना त्याचा फायदा होईल. बाजारपेठ वाढवण्यासाठी या कामगारांचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष फायदाच होईल.

असंघटित अर्थव्यवस्था म्हणजे अशा आर्थिक उलाढाली असतात ज्या कामगार व संबंधित उद्योग कायदा तसेच व्यावहारिक दृष्टीने औपचारिक व्यवस्थांनी फार कमी बांधलेल्या असतात. नियमांनी बांधलेल्या नसणाऱ्या उद्योग संस्थांतून उभे राहणारे अर्थकारण म्हणजे असंघटित अर्थव्यवस्था होय. विकसनशील देशात असंघटित कामगारांमध्ये स्वयंरोजगार असलेले लोक आहेत जे घरून काम करतात किंवा रस्त्यावर मालाची विक्री करतात. त्यांचे अधिकृत दुकान नसते किंवा उद्योगासाठी त्यांच्याकडे ठराविक जागा नसते. तज्ज्ञांच्या मते अनेक विकसनशील देशात अशी असंघटित अर्थव्यवस्था ही आर्थिक बलस्थान आहे व भविष्यात त्याचे महत्त्व आणखी वाढेल.

आताची पिढी तंत्रज्ञानाच्या युगात जन्मलेली आहे, इंटरनेट व एम लर्निंगच्या माध्यमातून त्यांना शिकता येऊ शकते, या तंत्रज्ञानाची उपलब्धता जास्त आहे ते कुठेही उपलब्ध आहे, कमी पैशात ते मिळू शकते. एकाचवेळी अनेक लोकांपर्यंत पोहोचण्याची क्षमता त्यात आहे. जर मोबाईल उपयोजनांचा (ॲप्स) वापर केला तर जगातील लाखो लोकांना कमी खर्चात शिकता येईल.

द नॅशनल कमिशन फॉर एंटरप्राईजेस इन अनऑर्गनाईज्ड सेक्टर (एनसीइयूएस) ही सरकारला सल्ला देणारी संस्था आहे, ती २००४ मध्ये स्थापन करण्यात आली. त्यामागचा उद्देश हा असंघटित क्षेत्रात उत्पादकता वाढवणे त्याच बरोबर मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती करणे हा होता. ग्रामीण भागात शाश्वत रोजगार निर्माण करणे हाही एक उद्देश त्यात होता. भारतात सध्या ५.९० कोटी असे असंघटित उद्योग आहेत हे उद्योग १२.७० कोटी लोकांना रोजगार देतात त्यात २००५ मध्ये १.७ कोटी उद्योगांची भर पडली आहे.

असंघटित क्षेत्रात मनुष्यबळाची व्याख्या ही अनेक गुणवैशिष्ट्यांच्या आधारे करता येते. मर्यादित व्यावसायिक कौशल्ये, कमी उत्पन्न, कमी उत्पादकता व कमी भांडवली गुंतवणूक यांचा त्यात समावेश होतो. बाजारपेठेस पूरक अशी नवी रोजगार कौशल्ये शिक्षण व

प्रशिक्षण यांच्या माध्यमातून उपलब्ध करणे आवश्यक आहे, त्यातून सततचा दारिद्र्याचा फेरा चुकवला जाऊ शकतो, पण त्यासाठी उत्पादकता वाढवणे गरजेचे आहे तसेच असंघटित अर्थव्यवस्थेत रोजगार निर्मिती वाढवणे गरजेचे आहे. कामगारांची संघटित क्षेत्रात काम करण्याची तयारी वाढू शकते त्यामुळे असंघटित क्षेत्रातील कामगारांना उत्पादन वाढीचे प्रशिक्षण दिले पाहिजे, तशी कौशल्ये शिकवली पाहिजेत, त्यामुळे उत्पादन वाढेल तसेच देशाचीही प्रगती होईल.

असंघटित क्षेत्रात आर्थिक उत्पादन वाढवण्यासाठी सर्वंकष दृष्टिकोनाचा अवलंब करावा लागेल, असे असले तरी केवळ मनुष्यबळ प्रशिक्षण कार्यक्रम घेऊन भागणार नाही. मनुष्यबळ विकास कार्यक्रमात नुसती गुंतवणूक करून प्रश्न सुटणार नाहीत किंवा त्यामळे आपोआप उत्पादनक्षमता वाढली असेही होणार नाही. सध्याच्या स्थितीत लोकांना किंवा मनुष्यबळाला प्रशिक्षण दिलेच जात नाही, अशातली परिस्थिती नाही पण सध्या केवळ तांत्रिक कौशल्ये शिकवली जातात. मानवी कौशल्ये शिकवली जात नाहीत. सर्वच उद्योगात एकमेकांशी संवाद साधणे, संघटितपणे काम करणे, अचानक येणाऱ्या समस्या सोडवणे ही कौशल्ये आवश्यक आहेत पण त्याकडे कुणी लक्ष देत नाही. तंत्रकौशल्यांना मानवी कौशल्यांची जोड असणे आवश्यक आहे. ज्या कामगाराकडे ही दोन्ही कौशल्ये असतील तोच जास्त यशस्वी होतो. क्षमता असलेल्या अनेक कामगारांकडे ही मानवी कौशल्ये नसल्याने ते मागे पडतात, मालकांना तंत्र कौशल्ये व मानवी कौशल्ये दोन्ही अवगत असलेले मनुष्यबळ हवे असते.

विविध स्तरातून आलेल्या मनुष्यबळात नवीन कौशल्ये निर्माण करणे किंवा त्यांना ती शिकवणे हे उत्पादन वाढीसाठी आवश्यक आहे त्यामुळे रोजगार वाढही होऊ शकते. असंघटित अर्थव्यवस्थेत अतिशय प्रभावी, बाजारपेठाभिमुख शिक्षण व प्रशिक्षण कार्यक्रम राबवून सर्व अर्थांनी रोजगारानुकूल मनुष्यबळ तयार करता येते.

मालक किंवा नियोक्ते हे त्यांना लागणारे मनुष्यबळ कसे असावे याबाबत त्यांच्या गरजा स्पष्ट करू शकतात, त्याअनुषंगाने मनुष्यबळाला प्रशिक्षण देता येईल. तांत्रिक प्रशिक्षण व शिक्षण हे दोन्ही शाळेच्या पातळीपासून तसे राबवता येईल. प्रत्यक्ष कामाच्या अनुभवातून शिक्षण, अशासकीय संस्थातून प्रशिक्षण, खासगी प्रशिक्षण केंद्रे येथून हवे तसे प्रशिक्षण देता येईल.

असंघटित अर्थव्यवस्थेत कौशल्ये वाढवणे हा आर्थिक वाढ व संपत्ती निर्मितीचा मार्ग ठरतो पण केवळ मनुष्यबळ निर्मितीत गुंतवणूक करून भागणार नाही नुसती गुंतवणूक केली व त्यामुळे एकदम उत्पादकता व रोजगार वाढले असे होणार नाही. कौशल्य विकासाचा परिणाम असंघटित अर्थव्यवस्थेत उत्पादन वाढीवर होत असतो पण त्यात बदलत्या आर्थिक वातावरणातील काही घटकही परिणाम करीत असतात.

'द नॅशनल स्कील डेव्हलपमेंट एजन्सी' या संस्थेने अनेक संस्थांशी भागीदारी केली आहे. त्यात असंघटित क्षेत्रातील कामगारांना प्रशिक्षण देण्यासाठी विविध मंत्रालये, राज्य सरकारे व उद्योग यांच्यात समन्वय घडवण्याचा प्रयत्न केला आहे. कौशल्य व प्रत्यक्ष नोकरी मिळणे यासाठी सरासरी व विभागीय उद्दिष्टे ठरवून दिली आहेत. 'नॅशनल ट्रॅकिंग सिस्टीम'ही त्यासाठी कार्यरत आहे. कौशल्यसंपन्न भारताचे उद्दिष्ट हे रोजगार संधी व भारतातील बुद्धिमान लोकांना विकासाची संधी मिळवून देणे हा आहे. कौशल्य विकासाची नवी क्षेत्रे शोधणे हाही एक उद्देश त्यात आहे. इ.स. २०२० पर्यंत ५० कोटी युवकांना कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

आपल्याला कौशल्य विकासाचे कार्यक्रम जागतिक मानकांच्या आधारे तयार करावे लागतील तरच आपल्या देशातील युवक हे देशांतर्गत मनुष्यबळाच्या गरजा भागवतील, शिवाय अमेरिका, जपान, चीन, युरोप व पश्चिम आशियातील देशांमध्ये आवश्यक मनुष्यबळाचे निकषही पूर्ण करून त्यांच्या उद्योगांमध्येही रोजगार मिळवू शकतील.

याचा अर्थ आपल्याकडे कौशल्य विकास कार्यक्रमच नाही अशातला भाग नाही. सरकारने कौशल्य विकासाला राष्ट्रीय प्राधान्य दिले आहे पण यापूर्वी पारंपरिक उद्योगातील कौशल्यांवर भर दिला जात होता तर आता सर्वच उद्योगात लागणाऱ्या कौशल्यांचा विचार केला जात आहे. सरकारने या कार्यक्रमांमध्ये काही बदलही केले आहेत. यापूर्वी कौशल्य विकासाची जबाबदारी काही मंत्रालयांनाच विभागून दिली होती पण आता त्यांचे एकात्मीकरण केले आहे, त्यातून कौशल्य विकास व्यवस्था अधिक कार्यक्षम व पारदर्शक होत आहे.

■■■

*लेखक ग्लोबल सक्सेस युनिर्व्हसिटीचे संस्थापक संचालक आहेत.*

# REACTIONS OF SOME SUCCESSFUL STUDENTS IN UPSC

**Vivekanad Jadhwar**
(AIR 799 / 2014)
"During my initial journey of civil services Preparation the book by Ranjan Kolambe sir Was the base. Sir has very good skill to make things simple. It helped me a lot in UPSC preparation. Thank you sir."


**Rajesh Gavali**
(AIR 1118 / 2014)
"Ranjan sir harbours a Mircro University in himself: teaching of many subjects in simple yet organised manners."

**Harshit D. Bari (IRS)**
" Known as 'one man army ', Ranjan Sir is the best bet."

**Adinath Dagde**
(AIR 1000 / 2014)



**Vijay Kulange**
(AIR 176 / 2013)
" Importance and relevance of Ranjan Kolambe Sir to Civil Services coaching is beyond doubt, his very name instills confidence."



**Dr. Satish Shitole (IRS)**
**(AIR 514 / 2013)**
" Bhagirath Symbolizes hard work, It's manifestation in this sector is Ranjan Kolambe Sir, and it's reflection is unmistakably found in his vast student community".

***Our Publications by :* Ranjan Kolambe Sir**




Coming Soon

आधुनिक भारताचा इतिहास

## MPSC RESULT 2014-15

**40 + Students Class - I**

**109 + Student Class- II**

## UPSC | MPSC

**Mains + Prelim** पूर्व + मुख्य परिक्षा

FOUNDATION BATCH 2015-16
BATCHES STARTS FROM 1 JULY 2015

**By : Ranjan Kolambe & Bhagirath Team**



**अभयसिंह मोहिते**
(Dy. Collector) **राज्यात प्रथम**
माझ्या यशामध्ये रंजन कोळंबे सर आणि सरांच्या पुस्तकांचा मोलाचा वाटा आहे. सरांच्या मॉक इंटरव्हुचा मला खूप फायदा झाला.



**समाधान शेंडगे**
(Dy. Collector) **राज्यात द्वितीय**
सरांच्या पुस्तकांचा मला UPSC व MPSC दोन्ही परीक्षांसाठी खुप फायदा झाला आहे. आणि मी सलग दोन वर्षे सरांकडे मॉक इंटरव्हूव दिला, सरांनी विचारलेले प्रश्नच मला आयोगांच्या पॅनलमध्ये विचारण्यात आले.



**प्रशांत खेडेकर**
(Dy. Collector) **राज्यात तृतीय**
MPSC चा अभ्यास सुरु करतांना सर्वात पहिले पुस्तक वाचलं ते रंजन कोळंबे सरांचे 'भारतीय अर्थव्यवस्था' माझ्या यशामध्ये सरांच्या सर्व पुस्तकांचा सिंहाचा वाटा आहे.



**वनश्री लाभशेटवार**
(Dy. Collector) **मुलींमध्ये प्रथम**
रंजन कोळंबे सरांच्या इंटरव्हूचा मला खुप फायदा झाला. माझ्यातल्या Positive Quality आणि अजून काय करण्याची गरज आहे, याचे खुप चांगले मार्गदर्शन केले आणि इंटरव्हुच्या लेक्चरमध्ये पण मुलांनी कुठल्या विषयाचा अभ्यास करावा यापासुन कुठला पोषाख घालून इंटरव्हुला जावे इंथपर्यंत सरांनी मुलांना मार्गदर्शन केले रंजन सरांसारखे मार्गदर्शन कुणी करु शकत नाही.



**स्नेहल कनिचे**
(Dy. Collector)
रंजन कोळंबे सर म्हणजे प्रत्यक्ष ज्ञानमुर्ती, मार्गदर्शनाबरोबर जिद्द, चिकाटी ! जे येथील भगीरथी ते नक्कीच होतील अधिकारी ! भगीरथ प्रयत्न व रंजन सरांचे मार्गदर्शन यामुळे अशक्य स्वप्न सहज सोपे झाले.

'विद्यादाना' च्या पवित्र कार्याचे संपूर्ण 'व्यापारीकरण' कधी झाले कळलेच नाही ! 'जाहिरात म्हणजे कायद्याच्या चौकटीत राहुन केलेली थापेबाजी होय' हे H.G.Wells या ब्रिटिश विचारवंताचे वक्तव्य अक्षरश: खरे करण्याची चढाओढ सुरू झाली. ''आमचे १०० विद्यार्थी पास झाले'' असे जर चार संस्था म्हणत असतील तर त्यातील ९० विद्यार्थी कॉमन असतात. कारण सर्वश्रृत आहे. पुण्यात-महाराष्ट्रात स्पर्धा परीक्षार्थींच्या यशासाठी मनापासून झटणाऱ्या बऱ्याच संस्था आहेत. 'भगीरथ ॲकॅडमी' ही त्यातील एक! वर्षातून केवळ दोन बॅचेस! "Teaching Quality + Quantity + मर्यादीत फी' या त्रिसुत्रीने 'अद्वितीय' ठरलेली! त्यामुळे 'भगीरथ ॲकॅडमी' च्या योग्यतेची पूर्ण खात्री असल्याशिवाय प्रवेश घेऊ नका. अधिक माहितीसाठी प्रत्यक्ष भेट द्या किंवा जाणकारांकडून माहिती मिळवा. खरे यश विद्यार्थ्यांचेच, त्यांच्या कष्टाचे व इच्छाशक्तीचे ! खऱ्या खुऱ्या 'भगीरथा' प्रमाणे! आमचा वाटा केवळ खारीचा !!!!

*... रंजन कोळंबे*

**Bhagirath IAS Academy**
UPSC • MPSC

मंत्री हाईटस्, २ रा मजला,
शनिवार पेठ, पुणे -३०.
फोन नं. : ०२०-६४०१३४५०
९९७०२९८९९७

www.bhagirathacademy.com
bhagirathacademypune@gmail.com
Bhagirath IAS Academy

# जागतिक अन्न दिवस : एक दृष्टीक्षेप

**बी जी कांबळे**

**आज घडीला जगाची लोकसंख्या ७०० कोटीच्या पुढे सरकली आहे. म्हणजेच लोकसंख्या फार मोठया वेगाने वाढते आहे. त्यांची कारणे वेगवेगळी असू षकतात. जगातील काही वाढत्या लोकसंख्येचे देष पाहू. चीनची लोकसंख्या १३५ कोटी आहे. तर भारताची लोकसंख्या १२५ कोटी आहे. याचा अर्थ असा की, जगाच्या लोकसंख्येमध्ये चीनचा पहिला क्रमांक लागतो. तर भारताचा दुसरा, अमेरिकेचा तीसरा, छोटयाषा पाकिस्तानचा ६ वा तर रषियाचा ९ वा क्रमांक लागतो. म्हणजेच चीन, भारत व पाकिस्तान या आषियायी देषांनी वेळीच सावध होऊन उपाययोजना करणे अत्यंत गरजेचे आहे. यापैकी चीनने तशी खबरदारी घ्यायला यापूर्वीच सुरूवात केली आहे. कारण जगाची निम्मी लोकसंख्या या मोजक्या देषाकडे असून जमीन मात्र नाही. जगाची वाढती लोकसंख्या व अन्नधान्य उत्पादनाचा मेळ घालणे गरजेचे आहे. सध्या जगभर लोकसंख्या वाढते आहे. पण जमिनीची वाढ होत नाही. उलट ती कमी होत आहे. त्यातल्या त्यात भारत सारख्या देषाची जमीन धारणा नगण्य झाली आहे. घटती जमीन, पर्यावरणाचा ऱ्हास व हवामानातील बदलाचा उत्पादनावर विपरीत परिणाम झाला आहे. तसेच भारतामध्ये षेतीची उत्पादकता कमी होण्यास अज्ञान आणि दारिद्रय हेही दोन मुख्य कारणे आहेत.**



१६ ऑक्टोबर हा जागतिक अन्न दिवस. हा दिवस जगभर साजरा केला जातो. जगातील प्रत्येक व्यक्तीने या दिवसाचे महत्व ओळखायला हवे. या दिवसाच्या निमित्ताने काही संकल्प, ध्येय, धोरणे आखले पाहिजेत. १६ ऑक्टोबर हा दिवस जगातील प्रत्येक राष्ट्र जागतिक अन्न दिन म्हणून साजरा करतात. या दिनाच्या निमित्ताने जगभर काही विशयांचा उहापोह केला जातोय. वाढती लोकसंख्या, अन्नधान्य उत्पादन साठवणूक, त्याचा दर्जा, प्रक्रिया या संदर्भात विचारविनिमय करून काही दिषा ठरवल्या जातात आणि अषा पध्दतीने कृती कार्यक्रम आखले जातात.

**अन्न**

सृष्टीवर जीवंत असलेल्या कुठल्याही जीवाला अन्नाची अत्यंत गरज असते. ज्या जीवाला सकस अन्न मिळते. तो जीव सूदृढ समजला जातो. एखादे झाड असो, प्राणी असो, या मनुश्य, असो या चराचर सृश्टीतील असंख्य जीवजंतू असोत. त्यांना जीवंत राहण्यासाठी नितांत अन्नाची गरज असते. ज्यांना अपुरे अन्न मिळते ते कुपोशित होतात. हे कुपोशण टाळावयाचे असेल तर पर्यावरणाला धक्का न लागू देता सकस व दर्जेदार अन्न निर्माण करावे लागते.

**लोकसंख्या वाढ**

जागतिक अन्न दिनाच्या निमित्ताने लोकसंख्येचा थोडासा आढावा घेऊ. आज घडीला जगाची लोकसंख्या ७०० कोटीच्या पुढे सरकली आहे. म्हणजेच लोकसंख्या फार मोठया वेगाने वाढते आहे. त्यांची कारणे वेगवेगळी असू षकतात. जगातील काही वाढत्या लोकसंख्येचे देष पाहू. चीनची लोकसंख्या १३५ कोटी आहे. तर भारताची लोकसंख्या १२५ कोटी आहे. याचा अर्थ असा की, जगाच्या लोकसंख्येमध्ये चीनचा पहिला क्रमांक लागतो. तर भारताचा दुसरा, अमेरिकेचा तीसरा, छोटयाषा पाकिस्तानचा ६ वा तर रषियाचा ९ वा क्रमांक लागतो. म्हणजेच चीन, भारत व पाकिस्तान या आषियायी देषांनी वेळीच सावध होऊन उपाययोजना करणे अत्यंत गरजेचे आहे. यापैकी चीनने तशी खबरदारी घ्यायला यापूर्वीच सुरूवात केली आहे. कारण जगाची निम्मी लोकसंख्या या मोजक्या देषाकडे असून जमीन मात्र नाही.

**अन्नधान्य उत्पादन : अन्न क्रांती-१**

आपण वाढती लोकसंख्या पाहिली आहे. १९५१ साली भारताची लोकसंख्या ३६ कोटी होती. ती आता २०१५ साली १२५ कोटी आहे. भारतातील १२५ कोटी जनतेला जगवण्यासाठी ३३ कोटी टन अन्नधान्य लागते. वाढत्या लोकसंख्येच्या वेगाच्या पुढे अन्नधान्याच्या उत्पादनात वाढ झाली तरच देशातील सर्वाची भूक भागविता येऊ षकते.

भारतात एकूण जमिनीचे क्षेत्र ३२९ दषलक्ष हेक्टर आहे. या क्षेत्रापैकी १८५.८ दषलक्ष हेक्टर क्षेत्र हे लागवडीखाली आहे. त्यातही काही क्षेत्र बाधित आहे. आपल्या देषामध्ये १९६६ सालापासून कृषी क्षेत्रात क्रांतीला सुरूवात झाली. म्हणजेच संकरीत युग सुरू झाले. देषामध्ये संकरीत युगापूर्वी अन्नधान्याची गंभीर समस्या होती. संकरीत युगाला सुरूवात झाली अन् त्याचे चमत्कार लागलीच दिसून येऊ लागले. उत्पादनात विक्रमी वाढ झाल्याचे दिसून आले. अन्नधान्य वाढत राहिले त्या प्रमाणेच लोकसंख्येचा वेगही वाढतच राहिला. भारतात असो वा जगातील

कुठल्याही राश्ट्रात असो अन्नधान्य वाढीचा वेग व लोकसंख्या वाढीचा वेग कायम राहिल्यास अन्नधान्य टंचाई निष्चितच जाणवणार आहे.

**अन्नधान्य उत्पादनातील अडचणी**

जागतिक अन्न दिनाच्या निमित्ताने काही बाबीचा उहापोह करणे मी अत्यंत गरजेचे समजतो. जगाची वाढती लोकसंख्या व अन्नधान्य उत्पादनाचा मेळ घालणे गरजेचे आहे. सध्या जगभर लोकसंख्या वाढते आहे. पण जमिनीची वाढ होत नाही. उलट ती कमी होत आहे. त्यातल्या त्यात भारत सारख्या देषाची जमीन धारणा नगण्य झाली आहे. घटती जमीन, पर्यावरणाचा ऱ्हास व हवामानातील बदलाचा उत्पादनावर विपरीत परिणाम झाला आहे. तसेच भारतामध्ये षेतीची उत्पादकता कमी होण्यास अज्ञान आणि दारिद्रय हेही दोन मुख्य कारणे आहेत. देषातील ६४% क्षेत्र हे पावसावर अवलंबून आहे. म्हणजेच याठिकाणी कोरडा वा ओल्या दुश्काळाची भिती असते. उत्पादनातील ही फार मोठी अडचण आहे. कृशि षास्त्रज्ञ डॉ. नार्मन बोरलॉग या संदर्भात म्हणतात.

"भारतीय शेतीसाठी सध्याचा कालावधी मोठया संक्रमणाचा आहे. पीक पध्दती, पीक व्यवस्थापन पध्दतीत मोठे बदल आवष्यक असून कृशि पतधोरण, जमीन धारणा आणि षेतकऱ्याचे प्रषिक्षण यात व्यापक सुधारणा अत्यावष्यक आहेत."

**अन्न मिळण्याचा अधिकार - अन्न सुरक्षा विधेयक**

माणसांच्या पोटात जर अन्नाचा कण नसेल तर तो माणूस रहात नाही. तो हिंस्त्र ष्वापद बनतो. हे सत्य आहे. त्यावेळी कोणतेही तत्वज्ञान त्याला सांगितले तरी ते पटणार नाही. त्यामुळे सर्वसामान्य माणसाला अगोदर पोटभर अन्न मिळायला हवे. आपणाकडे एक म्हण प्रचलित आहे. ती अषी, "आधी पोटोबा-मगच विठ्ठोबा" या म्हणीचा अर्थ लक्षात घेतला असता आपणास अन्नाचे महत्व कळून आल्याषिवाय रहात नाही. माणसांची भूक षमणे हे ईष्वरापेक्षाही मोठे काम आहे. म्हणजेच पोट अन्नाने भरले तरच त्याला देवाचे नाव वा स्मरण, तीर्थ यात्रा कराविषी वाटेल अन्यथा नाही.

अन्नाचे महत्व जाणून घेऊनच भारत सरकारने २०१३ मध्ये अन्नसुरक्षा विधेयक संमत करून देषातील गोरगरीब, दिनदलित दारिद्रयरेशेखालील कुटुंबांना, महिलांना, अपंगाना एक मोठा आधार दिला आहे. या कायद्याने अन्न मिळण्याची हमी दिली आहे. देषात दुसऱ्यांदा झालेली ही अन्नक्रांती आहे.

भारतातील गोरगरिब लोकांना (शहरी व ग्रामीण भागातील) अनुक्रमे २१०० ते २३०० उश्माकांचे अन्न मिळते. तर जगातील प्रगत व विकसित देषातील व्यक्तीला सरासरी ३४०० उश्मांकांचे अन्न मिळते. जगात सध्या ८४२ दशलक्ष लोक भूक ग्रस्त आहेत. भारतातही २०१३ पूर्वी २३ कोटी लोक भूकबळीच्या टप्प्यावर होते. जगातील कुपोशितापैकी ४०% कुपोशित बालके भारतातील आहेत. (संदर्भ- मायक्रोन्यूट्रियेट इंजिषिएटिव्ह संघटना-कॅनडा)

अन्न सुरक्षा कायदा करण्यामागे सरकारचा उद्देष असा आहे की, देषातील गरिबीत जीवन जगणाऱ्या जनतेला स्वस्तात अन्नधान्य उपलब्ध व्हावे. कोणी उपाषीपोटी राहू नये. लहान बालके कुपोशित होऊ नयेत. अन्नावाचून कोणी मरून जाऊ नये. या योजनेचा लाभ देषातील ६७३ जनतेला म्हणजेच ८० कोटी लोकांना मिळणार आहे. म्हणजेच कायद्याने हमी दिली आहे. दायित्व स्विकारले आहे. या लोकांना अन्नधान्य देण्यासाठी वर्शाला ६ कोटी २० लाख टन धान्य लागणार आहे.

**अन्न खराब होण्याची कारणे**

भारतात अन्नधान्याचे उत्पादन मोठया प्रमाणावर होत असते. सध्या २५० दषलक्ष टन अन्नधान्य उत्पादन होते. परंतू त्याची योग्य देखभाल, निगा व हाताळणी, प्रक्रिया व्यवस्था व्यवस्थितपणे होत नसल्यामुळे देषात दरवर्शी अडीच कोटी टन धान्याची नासाडी होत असते. ती टाळली पाहिजे. मागील काही वर्शाच्या काळात ९ लाख ९४ हजार ५०२ मेट्रिक टन गोदामातील धान्य निगरानीविना उकिरडयात टाकण्यालायक झाले.

**अन्नसुरक्षततेसंबंधी कायदे**

जागतिक अन्न दिनाच्या निमित्ताने 'अन्न' या विशयांच्या विविध अंगाने लिहित असताना सुरक्षित अन्न मिळणे हेही अत्यंत महत्वाचे आहे. जगभर अन्न सुरक्षित मिळण्यासंबंधाने अनेक कायदे आहेत. भारतातही काही कायदे आहेत. भारतात १९५४ साली अन्नभेसळ प्रतिबंधक कायदा अस्तित्वात आला. अन्नभेसळ प्रतिबंधक कायद्यात १९५५, १९६४ तसेच १९७६ मध्ये गरजेनुसार सुधारणा करण्यात आली आहे. अन्न भेसळ प्रतिबंधक कायद्याच्या तरतुदीमध्ये प्रामुख्याने अन्न पदार्थातील भेसळीस प्रतिबंध तसेच अन्न पदार्थाची गुणवत्ता व सुरक्षितता राखण्यासाठी तरतुदी केलेल्या आहेत. अन्नासंदर्भात खालील काही कायदे करण्यात आले आहेत.

१) फळ प्रक्रिया कायदा
२) मांसजन्य अन्न पदार्थ कायदा
३) षितगृह साठवण कायदा
४) द्रावणीय पध्दतीने खाद्यतेल कायदा
५) तेलरहित व खाद्यपीठे नियमन कायदा
६) वनस्पतीजन्य तेल पदार्थ कायदा
७) दुध व दुग्धजन्य पदार्थ कायदा १९९२
८) निर्यात (प्रत नियमन व तपासणी कायदा)
९) अत्यावष्यक पदार्थ कायदा

भारतामध्ये या वेगवेगळया कायद्याची अमंलबजावणी वेगवगळया केंद्रिय मंत्रालयामार्फत केली जाते. त्यानंतर अन्न सुरक्षा आणि प्रमाणके कायदा २००७ असून या कायद्यामुळे अन्नपदार्थासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या सर्व कायद्याचे एकत्रीकरण करून त्याची अंमलबजावणी करण्याचे प्रस्तावित आहे.

■■■

*लेखक शेती प्रश्नांचे अभ्यासक आहेत.*
Email: kamblebaliram6@gmail.com

# डिजिटल भारत : १.८ दशलक्ष रोजगार निर्मितीची अपेक्षा



**डिजिटल इंडियाचे खरे चित्र २०१९ पर्यंत पाहायला मिळेल जेव्हा सर्व ग्रामपंचायती ब्रॉडबॅण्डने जोडल्या जातील, शाळा व विद्यापीठांमध्ये वाय-फाय आणि सार्वजनिक ठिकाणी वाय-फाय हॉट स्पॉट असतील असे दूरसंवाद मंत्री रविशंकर प्रसाद यांनी सांगितले. हा कार्यक्रम प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रित्या माहिती तंत्रज्ञान, दूरसंवाद आणि इलेक्ट्रॉनिक क्षेत्रात मोठी रोजगार निर्मिती करेल. या कार्यक्रमाच्या यशानंतर भारत डिजिटल क्षेत्रात सक्षम होईल. डिजिटल भारत अभियानाने एकदा का वेग पकडला की, इंटरनेटवर उपलब्ध सेवांमुळे लोकांच्या आयुष्यात अमुलाग्र बदल होतील आणि समाजातील डिजिटल दरी लुप्त होईल. नागरिकांना दूरसंवाद आणि डेटा सेवा स्वस्त आणि परवडणाऱ्या दरात उपलब्ध व्हाव्यात याकरिता सरकारने आपल्या धोरणांमध्ये काही चांगले बदल केले पाहिजेत.**

ऑप्टिकल फायबर नेटवर्कचे मूल्यमापन सुरु असतानाच, देशाच्या महत्त्वाकांक्षी अभियानांपैकी एक 'डिजिटल भारत'ला मूर्त स्वरुप प्राप्त करुन देण्यासाठी उद्योग जगतातील मोठया कंपन्या पुढे सरसावली असून गुंतवणूक हा त्याच्या मार्गातील अडचण ठरणार नाही याकडे सर्व लक्ष देत आहेत. या अभियानाअंतर्गत १८ लाख नवीन रोजगार निर्मितीसाठी भारतीय उद्योग जगत ४.५ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे. या कार्यक्रमाची सुरुवात करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नमूद केले होते की, इलेक्ट्रॉनिक वस्तू उत्पादनामध्ये देशाने स्वयंपूर्ण व्हावे तसेच सायबर सुरक्षा व नवनिर्मितीमध्ये अग्रस्थान प्राप्त करावे अशी सरकारची इच्छा आहे.

सायरस मिस्त्री, मुकेश अंबानी, अनिल अंबानी, कुमार मंगलम बिर्ला, सुनिल भारती मित्तल, आझिम प्रेमजी या आणि अशा अन्य बडया उद्योगपतींनी कोटयावधी रुपयांच्या गुंतवणूकीची वचनबध्दता दर्शविल्यानंतर, सरकारचा १.१३ लाख कोटी रुपयांचा कार्यक्रम सुचारु पध्दतीने सुरु होऊन देशातील डिजिटल दरी मिटवून शिक्षण, आरोग्य, कृषी व प्रशासनासह सर्वच क्षेत्रात डिजिटल मार्ग सापडेल.

दूरसंवाद व माहिती तंत्रज्ञान, ग्रामीण विकास, मनुष्यबळ विकास, आणि आरोग्य मंत्रालयाच्या सहाय्याने इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान विभागाने हा कार्यक्रम सुरु केला असून सर्व राज्य आणि केंद्र शासित प्रदेशांना याचा लाभ होणार आहे.

डिजिटल भारताच्या तत्त्वांसोबत सांगड घालण्यासाठी सध्या सुरु असलेल्या ई-प्रशासन उपक्रमात सुधारणा करण्यात येत आहेत. देशाला डिजिटली सक्षम व बुध्दिमान अर्थव्यवस्थेत रुपांतरीत करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. नागरिकांना सरकारी सेवा इलेक्ट्रॉनिक पध्दतीने उपलब्ध होतील याची हमी हा कार्यक्रम देतो.

डिजिटल इंडियाचे खरे चित्र २०१९ पर्यंत पाहायला मिळेल जेव्हा सर्व ग्रामपंचायती ब्रॉडबॅण्डने जोडल्या जातील, शाळा व विद्यापीठांमध्ये वाय-फाय आणि सार्वजनिक ठिकाणी वाय-फाय हॉट स्पॉट असतील असे दूरसंवाद मंत्री रविशंकर प्रसाद यांनी सांगितले. हा कार्यक्रम प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रित्या माहिती तंत्रज्ञान, दूरसंवाद आणि इलेक्ट्रॉनिक क्षेत्रात मोठी रोजगार निर्मिती करेल. या कार्यक्रमाच्या यशानंतर भारत डिजिटल क्षेत्रात सक्षम होईल.

डिजिटल भारत अभियानाने एकदा का वेग पकडला की, इंटरनेटवर उपलब्ध सेवांमुळे लोकांच्या आयुष्यात अमुलाग्र बदल होतील आणि समाजातील डिजिटल दरी लुप्त होईल. नागरिकांना दूरसंवाद आणि डेटा सेवा स्वस्त आणि परवडणाऱ्या दरात उपलब्ध व्हाव्यात याकरिता सरकारने आपल्या धोरणांमध्ये काही चांगले बदल केले पाहिजेत. जास्त स्पेक्ट्रम उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे. प्रति वर्तुळासाठी काही स्पेक्ट्रम देण्यासाठी

संरक्षण विभागाने मंजूरी दर्शविली आहे. परंतु लिलावाचा मुद्दा महत्त्वपूर्ण आहे कारण स्वस्त दरात इंटरनेट उपलब्ध करुन दिले तर कार्यक्रम अधिक यशस्वी होईल.

डिजिटल इंडिया हा या सरकारचा फ्लॅगशिप कार्यक्रम असून तो अभियान स्तरावर राबवण्यात येत आहे. ग्रामपंचायतीच्या प्रत्येक कानाकोप्रयात ब्रॉडबॅण्ड उपलब्ध व्हावे यासाठी अडीच लाख ग्राम पंचायतींना ब्रॉडबॅण्डने जोडण्याचे काम जोराने सुरु आहे. मागील दहा महिन्यात ऑप्टिकल फायबर नेटवर्कच्या कामाने ३० पटीने वेग पकडला आहे. नॅशनल ऑप्टिकल फायबर नेटवर्क ई-गर्व्हनस सेवा, टेलि शिक्षण, आर्थिक सेवा, ई-कॉमर्स आणि ई-इंटरनेटला पाठिंबा देत आहे.

केरळमधील इकी जिल्हा संपूर्णत: ब्रॉडबॅण्ड जोडण्यात आलेला पहिला जिल्हा आहे. असे असले तरीही सर्व गाजावाजा व गडबड गोंधळामध्ये एक प्रश्न उरतोच जिल्हा प्रशासन अपुऱ्या सोयी सुविधांच्या माध्यमातून शहरी भागात राहाणाऱ्या आणि ग्रामीण भागात राहाणाया नागरिकांमधील दरी कशाप्रकारे दूर करणार जिथे “ऑनलाईन”हा शब्दच अजून अपरिचित आहे. त्याचप्रमाणे जिल्हयात नुकत्याच सुरु केलेल्या २२ सर्वसाधारण सेवा केंद्रांच्या माध्यमातून सर्व सार्वजनिक सेवा पुरवण्यात येणार आहेत. या सर्व सेवा केंद्रांमधील काम हे इंटरनेट आधारित असल्याने नेट खंडित झाले तर काम ठप्प होणार. डोंगराळ भागात जिथे इंटरनेट नाही तिथे या सर्वसाधारण सेवा केंद्रांमधील ऑनलाईन सेवा अकार्यक्षमच ठरणार.

वर्ष २०१९ पर्यंत सर्व नागरिकांच्या हातात स्मार्ट फोन असावा अशी मोदी सरकारची इच्छा आहे. सध्या लोकसंख्येच्या ७४ टक्के लोकांकडे मोबाईल फोन आहेत, यातील जास्तीत जास्त संख्या शहरी भारतात आहे. सर्व सेवा मोबाईलच्या माध्यमातून देण्याचा सरकारचा मानस आहे. विशेषत: आरोग्य, शिक्षण, विविध सरकारी सेवा आणि किरकोळ असे प्रसाद यांनी सांगितले.

डिजिटल इंडिया अभियानात सहभागी होण्यासाठी अनेक परदेशी कंपनी इच्छूक आहेत. अमेरिकेची सिस्को सिस्टिम्स क्लस्टर मॅन्युफॅक्चरिंग लाभ घेऊ इच्छिते तर ई-शिक्षणासारख्या सरकारच्या प्रशासन कार्यक्रमामध्ये केंद्र सरकारचे भागिदार होण्यासाठी फेसबुक उत्सुक आहे.

डिजिटल इंडिया अभियानाच्या यशस्वीततेसाठी सरकार पूर्णपणे माहिती-तंत्रज्ञान उद्योग आणि कनेक्टिव्हीटी मध्ये मोठी झेप घेण्यासाठी तयार करण्यात येणाऱ्या व्यासपीठामधील त्यांच्या योगदानावर अवलंबून आहे, जे देशातील ब्रॉडबॅण्ड क्षेत्रातील मोठी दरी भरुन काढेल आणि डिजिटल इंडिया म्हणून देश सर्व जगासमोर येईल.

■■■

सौजन्य: पत्र सुचना कार्यालय

## ● विशेष सूचना ●

प्रख्यात कवी, गीतकार, लेखक, अभिनेता असे अष्टपैलू व्यक्तिमत्व ग. दि. माडगूळकरांच्या सिद्धहस्त लेखणीतून साकारलेला वाल्मिकी रचित रामायणावर आधारित असा गीतरामायण हाप्रसिद्धकाव्यसंग्रह. रामायणातील घटनाक्रमाचे कालानूसार काव्यात वर्णन करणाया या साहित्यकृतीत ५६ मराठी गीत आहेत. श्री रामचंद्र व रामायणाचे भक्त असलेल्यांसाठी हा ठेवा पुन्हा एकदा उपलब्ध करुन देण्यात येत आहे. भारत सरकारच्या प्रकाशन विभागाने मूळ रचनेतकसलाही बदल न करता गीतरामायण पुन्हा प्रकाशित केले आहे. जाणकार मंडळींना आठवत असेल यापूर्वी प्रकाशन विभागाने आकाशवाणीसाठी विजयादशमीच्या मुहुर्तावर १९५७ मध्ये गीतरामायणाचे प्रथम प्रकाशन केले होते. मराठी साहित्यात गीत रामायणाची एक वेगळी ओळख आहे. गीतरामायणानंतरच जनमानसात ग. दि. माडगूळकर यांची ओळख आधुनिक वाल्मिकी अशी झाली. सुंदर अशी ओघवती शैली, मधुर शब्दांची संगत यामुळे मराठी साहित्य व भाषाप्रेमींमध्ये गीतरामायणाचे स्वतंत्र स्थान आहे. मुळ मराठीतील या साहित्यकृतीचे हिंदी, इंग्रजी, गुजराती, कन्नड, कोकणी, संस्कृत, सिंधी व तेलुगू भाषांमध्ये भाषांतर झाले आहे. प्रकाशन विभागाने पुन्हा प्रकाशित केलेली ही साहित्यकृती प्रकाशन विभाग-विभागीय कार्यालय, ७०१- सी, केंद्रीय सदन, सेक्टर-१०, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई या ठिकाणी विक्रीसाठी उपलब्ध आहे.

# भारतातील शिक्षण क्षेत्र : उपयुक्तता आणि आव्हाने

**प्रा.डॉ.बी.आर.सोनवणे**



**शिक्षण आणि उच्च शिक्षण ह्या दोन्ही बाबी वेगवेगळया आहेत. शिक्षणाची संकल्पना विशद करतांना शिक्षणशास्त्रज्ञ म्हणतात 'जे पुस्तक उघडायला लावते ते शिक्षण आणि जे मन उघडायला लावते ते उच्च शिक्षण'. दुसऱ्या शद्बात लिहायला वाचायला शिकवीते ते शिक्षण तर मनात संशय उत्पन्न करते ते उच्च शिक्षण. न्युटनच्या मते 'कार्यकारण भावाचा शोध लावते ते उच्च शिक्षण'. याचाच अर्थ 'बाबा वाक्यम् प्रमाणमच्या विचारसरणीला छेद देते ते उच्च शिक्षण होय'. थोर साहित्यिक रविंद्रनाथ टागोरांच्या मते 'संपूर्ण चराचर" सृष्टीशी आपल्या जीवनाचा मेळ घालुन देणारे माध्यम म्हणजे शिक्षण होय. शिक्षणाची संकल्पना विशद करतांना महात्मा ज्योतिबा फुले म्हणतात, शिक्षण म्हणजे समाज परिवर्तनाचे हुकमी हत्यार. स्वामी विवेकानंद यांच्या मते 'केवळ माहितीचे संकलन म्हणजे शिक्षण नव्हे, तर शिलसंपन्न समाजनिर्मीती करण्याचे माध्यम म्हणजे शिक्षण होय'. शिक्षणावर भाष्य करतांना महर्षी अरविंद घोष म्हणतात 'शिक्षण म्हणजे व्यक्तीच्या सुप्त शक्तींचा विकास करून मानवता, राष्ट्रीयता व विश्वबंधुंत्व ह्या गुणांची निर्मीती करणे होय"**

विकासप्रवण समाजदेखिल समस्याग्रस्त असतो. कालपरत्वे आणि स्थलपरत्वे समस्यांचे स्वरूप वेगवेगळे असते एवढेच. भारतीय समाजासमोरही अनेक समस्या आहेत. जसे आर्थिक विषमता, कुपोषण, दारिद्रय, निरक्षरता, बेरोजगारी, स्त्री दुर्बलता, अंधश्रध्दा, बालश्रमीक, जातीयता इ. एक मात्र निश्चित की समस्या ह्या सुटत असतात. फक्त त्या सोडविण्याची आयुधे आणि तंत्रे ही देशपरत्वे आणि कालपरत्वे वेगवेगळी असतात. शिवाय समस्यांची ओळख आणि अग्रक्रम हादेखील समस्या सोडविण्याच्या मार्गातील महत्वाचा भाग असतो. म्हणूनच लोकशाही प्रधान देशातील कल्याणकारी राज्याची संकल्पना स्वीकारलेल्या राष्ट्राने देशातील समस्यांची ओळख, समस्यांचा प्राधान्यक्रम या बाबत दक्ष असले पाहिजे. एकदा समस्यांची ओळख होउन त्यांचा प्राधान्यप्रम निश्चित झाल्यानंतर त्या सोडविण्यासाठी कोणती आयुधे वापरायची हा त्यानंतर येणारा कळीचा मुद्दा. कारण आयुधे अनेक आहेत. त्यापैकीच एक म्हणजे शिक्षण होय. कारण शिक्षण हे नुसते लिहीण्या वाचण्याचे तंत्र नव्हे तर तो समस्या निराकरणाचा मंत्र असुन, सर्वांगीण विकासाचे साधन आहे ही बाब बिंबविण्यासाठीच सदरचा लेखनप्रपंच.

**संशोधन लेखाची उद्दीष्टे**

सदरील संशोधन लेखाची खालील महत्वाची उद्दीष्टे निश्चित करण्यात आलेली आहेत.

१. शिक्षणाची संकल्पना समजून घेणे.
२. शिक्षणाची उपयुक्तता अधोरेखीत करणे.
३. शिक्षण क्षेत्रासमोरील आव्हानांची नोंद घेणे.

**शिक्षणाची संकल्पना**

शिक्षण आणि उच्च शिक्षण ह्या दोन्ही बाबी वेगवेगळ्या आहेत. शिक्षणाची संकल्पना विशद करतांना शिक्षणशास्त्रज्ञ म्हणतात 'जे पुस्तक उघडायला लावते ते शिक्षण आणि जे मन उघडायला लावते ते उच्च शिक्षण'. दुसऱ्या शद्बात लिहा वाचायला शिकवीते ते शिक्षण तर मनात संशय उत्पन्न करते ते उच्च शिक्षण. न्युटनच्या मते 'कार्यकारण भावाचा शोध लावते ते उच्च शिक्षण'. याचाच अर्थ 'बाबा वाक्यम् प्रमाणमच्या विचारसरणीला छेद देते ते उच्च शिक्षण होय'. थोर साहित्यिक रविंद्रनाथ टागोरांच्या मते 'संपूर्ण चराचर' सृष्टीशी आपल्या जीवनाचा मेळ घालुन देणारे माध्यम म्हणजे शिक्षण होय. शिक्षणाची संकल्पना विशद करतांना महात्मा ज्योतिबा फुले म्हणतात, शिक्षण म्हणजे समाज परिवर्तनाचे हुकमी हत्यार. स्वामी विवेकानंद यांच्या मते 'केवळ माहितीचे संकलन म्हणजे शिक्षण नव्हे, तर शिलसंपन्न समाजनिर्मीती करण्याचे माध्यम म्हणजे शिक्षण होय'. शिक्षणावर भाष्य करतांना महर्षी अरविंद घोष म्हणतात 'शिक्षण म्हणजे व्यक्तीच्या सुप्त शक्तींचा विकास करून मानवता, राष्ट्रीयता व विश्वबंधुंत्व ह्या गुणांची निर्मीती करणे होय'.

आद्य शंकराचार्यांच्या मते 'स्वत्वाची जाणीव म्हणजे शिक्षण होय'. महान तत्ववेत्ता प्लेटो शिक्षणाची व्याख्या करतांना म्हणतात, मानवी जीवनाची

'सत्यम, शिवम् आणि सुंदरम्' ही अंतीम मुल्ये समजण्याची व अनुभवण्याची पात्रता मानवात निर्माण करते ते शिक्षण होय. जॉन हर्बाट शिक्षणाकडून चारित्र्याची अपेक्षा करतात. त्यांच्यामते 'शिक्षण म्हणजे शील संवर्धन होय'.

**शिक्षण क्षेत्राची उपयुक्तता**

राष्ट्रातील समस्यांची सोडवणूक करण्यासाठी समाज उभा करावा लागतो. त्याचसाठी विवेकनिष्ठ, बुद्धीनिष्ठ व विज्ञाननिष्ठ पिढीची गरज असते. ह्या पिढीने उभे रहायचे असते व समाजासमोरील समस्या सोडवायच्या असतात. एकदा समाज उभा राहिला की समस्या आपोआप खाली बसतात. ही पिढी घडविण्याचे महत्वाचे आयुध म्हणजेच शिक्षण. कारण शिक्षण म्हणजे फक्त लिहीण्या वाचण्याचे माध्यम न रहाता ते ज्ञानाधिष्ठीत समाजव्यवस्थेत समाज परिवर्तनाचे व आर्थीक उन्नतीचे महत्वाचे साधन बनले आहे. म्हणूनच दिवसेंदिवस शिक्षणक्षेत्राकडून समाजाच्या, राष्ट्राच्या अपेक्षा वाढत चालल्या आहेत. आज अर्थव्यवस्थेची चार क्षेत्रे मानली जातात. त्यापैकी चौथे म्हणजे ज्ञान. ह्या ज्ञानाचा मानवी कल्याणासाठी वापर करून घेणे हे आपल्या समोरील एक मोठे आव्हान आहे.

देशातील तंत्रज्ञानाची पातळी उंचावणे हे देखील शिक्षण क्षेत्राचे काम आहे. कारण जुनाट तंत्रज्ञान आणि जास्तीचा उत्पादन खर्च हेच मागासपणाचे अनेकांपैकी एक महत्वाचे कारण. तंत्रज्ञानाच्या विकासाशिवाय समाज पुढे जाऊ शकत नाही. आपण वापरत असलेल्या वस्तु आणि सेवांच्या संख्येत वाढ व्हावी सोबतच त्यांची गुणात्मकता वाढावी म्हणजे भौतीक विकास साधणे होय जे शिक्षणानेच शक्य आहे. त्याचप्रमाणे लोकसंख्येची गुणात्मकता उंचवायची असेल जनतेचा सर्वांगिण विकास साधावयाचा असेल, देश आणि समाज घडवायचा असेल तर त्यासाठी शिक्षण अनिवार्य आहे.

दिवसेंदिवस मानवी मुल्यांचे अवमुल्यन होत आहे. तरूण पिढी भ्रष्ट आचरणाकडे झुकते आहे. व्यसनाधीनता आणि वासनांधता वाढत चालली आहे. समाजाचे अध:पतन होत आहे. नितीमुल्ये भ्रष्ट झाली आहेत. त्याचसाठी चारित्र्यसंपन्न, नितीप्रधान व मानवी मुल्यांची जाण असणारा समाज उभा करावयाचा आहे. ह्या संदर्भात अल्बर्ट आईनस्टाईन यांचे विधान बोलके आहे. ते म्हणतात 'शिक्षण श्वानालाही देता येते. मानवात आणि श्वानात फरक हाच की, श्वानाला मानवी मुल्यांची जाण नसते. डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यासंदर्भात म्हणतात, शिक्षणामुळे मानवी भांडवलाच्या विकासाला चालना मिळेल व देश उत्कर्षापर्यंत पोहचेल. प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ गुन्नार मिर्डाल शिक्षणाचे महत्त्व पुढील शद्बात व्यक्त करतात - 'शिक्षण म्हणजे आर्थीक विकासाचा कणा'. डॉ. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली (१९४८) पहिला विद्यापिठ शिक्षण आयोग नेमला गेला ते शिक्षण क्षेत्राकडून सामाजिक जीवनाची नैतीक व आध्यात्मिक पातळी उंचावली जावी अशी अपेक्षा व्यक्त करतात.

शिक्षण हे मानवाच्या गरजा आणि आकांक्षानुरूप असावे. शिक्षणामुळेच मानवाचे सामाजिक, आर्थीक व सांस्कृतिक परिवर्तन साध्य होईल असे मत शिक्षणक्षेत्राबद्दल कोठारी आयोगाने (१९६४) व्यक्त केले होते. थोर साहित्यिक रविंद्रनाथ टागोर शिक्षणाचे उद्दिष्ट विशद करतांना म्हणतात - 'भारतीय संस्कृतीचे जे विविध पैलू आहेत त्यांचे एकत्रिकरण हेच आपल्या शिक्षण पद्धतीचे ध्येय असावे. याचा अर्थ फक्त आर्थिक विकास एवढाच मर्यादित उद्देश शिक्षणाचा नसावा. महात्मा गांधींना आधुनिक भारताचे वास्तववादी शिक्षण तज्ञ मानले जाते. त्यांच्यामते हात, अंत:करण आणि बुद्धी यांच्या विकासासाठी शिक्षण असावे". अर्थशास्त्राचे संस्थापक ॲडमस्मिथ यांच्या मते सुप्रशासनासाठी आणि आर्थीक प्रगतीसाठी शिक्षणाची उपयुक्तता आहे. शिक्षणाचे महत्त्व विशद करतांना प्रसिद्ध कल्याणकारी अर्थशास्त्रज्ञ मार्शल म्हणतात, 'एका व्यक्तिच्या शिक्षणामुळे दुसऱ्याच्या कल्याणात वृध्दी होते'. म्हणजेच व्यष्टीतुन समष्टीचा विकास साध्य होतो. प्रसिद्ध विचारवंत डेनीसनच्या मते, 'शिक्षणातुन आर्थिक वृध्दी गाठता येते. शिक्षणामुळे अमेरीकेच्या एकुण राष्ट्रीय उत्पादनात २३ टक्यांची वाढ घडुन आलेली आहे हा त्याचा बोलका पुरावा होय.

प्रसिध्द कल्याणकारी अर्थशास्त्राज्ञ डॉ.अमर्त्य सेन शिक्षणक्षेत्रकडून अपेक्षा व्यक्त करतांना म्हणतात 'जीवनाच्या नियोजनासाठी, आर्थिक व सामाजिक विकास घडवून आणण्यासाठी, उत्तम आरोग्यासाठी, संसाधनांची गुणात्मकता वाढविण्यसाठी, कुपोषण व अनारोग्य हद्दपार करण्यासाठी शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे'. कारण शिक्षणावरील गुंतवणुक वाढली तर देशातील उत्पादकता वाढते, आरोग्याचा दर्जा सुधारतो, उत्पन्न वितरणावर अनुकुल परिणाम घडून येतो. पुढे ते म्हणतात. 'शिक्षणाने माणसांच्या मनोवृत्तीत सकारात्मक बदल घडून येतो'.

मानवजातीचा सामाजिक व आर्थीक विकास साधला जातो. शिक्षणाने माणसाची व्यावसायीक गतिक्षमता वाढते शिक्षणानेच सक्षम नेतृत्व निर्माण करता येते. एवढेच नव्हे तर शिक्षणामुळेच गुंतागुंतीच्या मानवी संबंधाची चांगली जाण येते.

थोडक्यात, शिक्षणाने समाजाला दृष्टी दिली पाहिजे. त्यातुन व्यक्तीचा विविध मानसिक क्षमतांचा विकास साधला जावा. प्रत्येकास प्रगतीची संधी मिळावी. अर्थार्जनाचे साधन प्राप्त व्हावे. व्यक्तिच्या मनात जाज्ज्वल्य राष्ट्रभाव जागवावा. सर्जनशिलतेचा विकास व्हावा आणि मुल्यसंस्काराची पेरणी व्हावी. त्यातुनच घडेल विवेकनिष्ठ, बुध्दीप्रामाण्यवादी, कार्यप्रवण, कर्तव्यदक्ष, सुजाण, चारित्र्यवान व नितीसंपन्न समाज.

**शिक्षण क्षेत्रासमोरील आव्हाने**

उपरोक्त सांगितल्या प्रमाणे आर्थीक उन्नयनाचे महत्वाचे साधन असलेल्या ह्या शिक्षण क्षेत्रापुढे अनेक आव्हाने उभी आहेत. त्यावर थोडक्यात प्रकाश टाकू.

१.भौगोलीक विस्तीर्णता व विषमता

भारत हा भौगोलिकदृष्टया वैविध्यपूर्ण प्रदेश आहे. एका बाजुस हमरस्त्याने जोडलेली गांवे तर दुसरीकडे सर्वच संपर्पसाधनांपासून तुटलेल्या वाड्या, वस्त्या व आदिवासी जंगली भाग. ज्यामुळे शासनाला शिक्षणाचे अभियान आजपर्यंत सर्वदूर पोहचविता आलेले नाही. २०११ च्या जनगणनेनुसार ७४ टक्के एवढा देशाचा साक्षरता दर. परंतु ग्रामीण भागाचा विचार करता तो आहे फक्त ६९ टक्के. या उलट शहरी भागासाठी हा दर आहे ८५ टक्के. साक्षरतेसंदर्भात राज्यनिहाय विचार केला असता अजुनच निराशाजनक चित्र समोर येते. उदा - बिहार, अरूणाचल प्रदेश, राजस्थान व झारखंड ह्यासारख्या मागास राज्यात साक्षरतेचे प्रमाण राष्ट्रीय सरासरीपेक्षा बरेच कमी म्हणजे अनुक्रमे - ६३.८३%, ६६.९५%, ६७.०६%, ६७.६३% एवढे आहे.

जिल्हानिहाय विचार करता निरक्षरतेची भयावहता अजुनच खिन्न करणारी आहे. कारण मध्यप्रदेश राज्यातील अलीराजपुर जिल्हाची साक्षरता फक्त ३७.२२% आहे तर छत्तीसगढ मधील बीजापूर जिह्याची ४१.५८%. याचाच अर्थ अजुनही बरेच जिल्हे आणि राज्ये राष्ट्रीय सरासरीपेक्षा निम्म्याने मागे आहेत. थोडक्यात, अजुनही बरीच लोकसंख्या शिक्षणाच्या मुख्य प्रवाहापासून दूर आहे, ज्यामुळे मानवी साधनसंपत्तीचा मोठया प्रमाणात अपव्यय होत आहे. म्हणूनच शिक्षणाची गंगा उपरोक्त राज्यांमध्ये व जिह्यांमध्ये अग्रक्रमाने पोहचविणे हे कल्याणकारी शासनाचे मुलभूत कर्तव्यच आहे. जे आपल्या देशाच्या शिक्षण क्षेत्रासमोर एक मोठे आव्हान आहे.

२.गळती

शाळेत जाणारी अनेक मुले आपले शिक्षण अर्धवट सोडतात. म्हणजेच शिक्षणात गळतीचे प्रमाण बरेच जास्त आहे. प्राथमिक शिक्षणातील गळतीचा विचार करता असे लक्षात येते की, २००३-०४ मध्ये ५२ टक्के एवढे गळतीचे प्रमाण होते, जे २०११-१२ मध्ये २० टक्क्यांपर्यंत कमी झाले आहे. तरीही ते बरेच जास्तीचे आहे. म्हणून १८ वर्षांपर्यंत कोणीही शाळा सोडून जाणार नाही याबाबत आपल्याला खबरदारी घेणे जरूरीचे आहे. शिवाय ७ वर्षाच्या मुलांचा साक्षरता दर आपणास ८५ टक्के पर्यंत गाठावयाचा आहे. अजुन एक चिंतेची बाब म्हणजे मुलांपेक्षा मुलींच्या गळतीचे प्रमाण बरेच जास्त आहे. हा फरक १० टक्के पर्यंत कमी झाला पाहिजे. तसेच ग्रामीण भागातुन मोठया प्रमाणात असणाऱ्या गैरहजेरीच्या प्रमाणानेही शिक्षण क्षेत्रासमोर एक आव्हान उभे केले आहे. त्याचसाठी विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढविण्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

३.प्रतिगामी दृष्टीकोन

आजच्या विज्ञान युगातही ग्रामीण भागात मोठया प्रमाणात अंधश्रध्दा व स्त्रियांविषयी प्रतिगामी दृष्टीकोन दिसुन येतो. मुलींना शाळेत पाठविण्याविषयी बरेच पालक नाराज असतात. तसेच शाळेत दाखल केल्यानंतरही लवकर लग्न करून मुलींना सासरी पाठविले जाते किंवा घरकाम, मोलमजुरीसाठी त्यांना शिक्षण अर्धवट सोडायला भाग पाडले जाते. म्हणूनच भारतात स्त्री साक्षरतेचे प्रमाण पुरूष साक्षरतेपेक्षा बरेच कमी असल्याचे दिसते. २०११ च्या जनगणनेनुसार भारतातील पुरूष साक्षरता ही ८२ टक्के तर स्त्री साक्षरता त्यापेक्षा बरीच कमी म्हणजे फक्त ६५ टक्के होती. त्यानंतर ग्रामीण शहरी विचार करता ही विदारकता तर अजुनच जाणवते. ग्रामीण भागातील पुरूष व स्त्री साक्षरतेत (५८.७५ टक्के) जवळपास १० टक्यांचा फरक आहे. तर शहरी स्त्रियांपेक्षा (७९.९२ टक्के) ग्रामीण भागातील स्त्रियांची साक्षरता २२ टक्क्यांनी कमी आहे. ही विषमता कमी करणे हे आपल्या शिक्षण क्षेत्रासमोरील एक आव्हान आहे.

४.निधीची तरतुद

शिक्षण हे सामाजिक सेवा क्षेत्रात अंतर्भूत असलेले क्षेत्र, जे सामाजाच्या उन्नयनासाठी महत्वाचे माध्यम मानले

जाते. म्हणूनच शिक्षणाची गंगा सर्वदुर नेण्याची आपल्या कल्याणकारी शासनाची महत्वाची जबाबदारी मानली गेली आहे. त्यासाठीच भरीव अर्थसंकल्पीय तरतुदीची गरज आहे. शिक्षणावरील अर्थसकंल्पीय तरदुत सातत्याने वाढती आहे. परंतु सापेक्षरित्या विचार करता असे दिसून येते की वर्ष २००६-०७ मध्ये ही अर्थसकंल्पीय तरतुद एकुण GDP च्या फक्त २.७२ टक्के एवढी होती. ती थोड्या थोड्या प्रमाणात वाढत २०११-१२ पर्यंत ३.११ टक्यावर पोहचली. तज्ञांच्या अंदाजानुसार शिक्षणक्षेत्रावर एकुण GDP च्या जवळपास १० टक्के रक्कम खर्च झाली तर इच्छित विकासदर साध्य होईल. परंतु सांख्यिकीय तत्थ्य स्पष्ट करतात की, शिक्षण क्षेत्रावरील खर्चाचे हे प्रमाण ३ टक्याच्या पुढे सरकायला तयार नाही. म्हणजेच भारताच्या शिक्षण क्षेत्रासमोर आर्थिक चनचण जाणवते आहे.

५. इतर आव्हाने

वरील आव्हानांशिवाय भारताच्या शिक्षणक्षेत्रासमोर अजुनही बरीच आव्हाने आहेत ज्यामुळे ते पाहिजे तेवढ्या प्रमाणात फुलू शकले नाही. भारतीय लोकांचे कमालीचे दारिद्र्य, शेतीचा पारंपरिक व्यवसाय, शाळेच्या गावांपर्यंत जाण्यासाठी लागणाऱ्या आर्थीक संरचना, रस्ते, संपर्काची माध्यमे, शाळांच्या इमारती यांचा अभाव, शिक्षकांची अनुपस्थिती, जुनाट तंत्रज्ञान व रटाळ शिक्षण पध्दती या सारखी बरीच कारणे त्यास जबाबदार आहेत.

थोडक्यात आपल्या शिक्षणपध्दतीत गुणात्मकतेचा बराच अभाव आहे. प्रशिक्षीत शिक्षकांची अपुरी संख्या, दिवसातुन शिक्षणासाठी दिला जाणारा अल्पवेळ, शिक्षण संस्थांची अनियोजीत वाढ, सामाजिकदृष्ट्या अव्यवहार्य अभ्यासप्रम, मुल्यमापनाची रूढीबध्द तंत्रे, चुकीची परीक्षा पध्दती, परीक्षेचे व शिक्षणाचे प्रादेशीक भाषा माध्यम यासारखी आव्हाने भारताच्या शिक्षण क्षेत्रासमोर आहेत. ज्यामुळे आपण सर्वच मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणु शकलो नाही. जो प्रत्येकाचा मुलभूत अधिकार आहे.

समारोप

तात्पर्य, शिक्षण फक्त लिहीण्यावाचण्याचे माध्यम वा अर्थार्जनाचे साधन नसुन ते यशस्वी जीवन जगण्याचे तंत्र आहे. शिक्षण फक्त चार भिंतीच्या आतच मिळते असे नव्हे तर आपण ज्या कुटूंबात अधिवास करतो, ज्यांच्या सहवासात रहातो, आपल्याला जे पर्यावरण लाभते ते सर्व ज्ञान मिळविण्याची माध्यम असतात. शिक्षणाने विचार घडतात. शिक्षणाने व्यक्तिच्या जीवनावर संस्काराची जडणघडण होते. शिक्षणाने प्रतिगामी विचारसरणीचा अस्त होऊन वैज्ञानिक दृष्टीकोनाची वाढ होते. उद्योजकता वाढीस लागते. व्यक्तिमत्वाचा विकास होतो. म्हणूनच शिक्षणाच्या गुणात्मकतेकडे लक्ष देणे गरजेचे आहे. याचसाठी शिकण्यात रस घेणारा विद्यार्थी व शिकविण्यात गोडी असणारा शिक्षक निर्माण करावा लागेल. त्यातुनच समाज सक्षमीकरणाचे उद्दीष्ट साध्य करता येईल.

■■■

*लेखक प्रा.डॉ.बी.आर.सोनवणे*
*संशोधक मार्गदर्शक*
*यशवंतराव चव्हाण महाविद्यालय,*
E-mail drbrss@gmail.com

**प्रकाशन विभागाची नवी पुस्तके-**

**English**

1. **An Introduction to Indian Music Rs. 175**
2. **Right of the line: President's body guard - Rs. 1650**
3. **Gospel of Buddha - Rs. 205**
4. **K.M. Munshi - Rs. 205**
5. **Bengali Theatre - Rs. 255**

**Hindi**

1. **Aiye Avishkar Bane**
2. **Ashok ke Dharam Lekh**
3. **Hogi Jeet Hamari**
4. **Dr. Ram Manohar Lohia Rs. 175**
5. **Dane - dane ki Suraksha - Rs. 135.00**

# आपल्याला माहित आहे का ?

## राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ

भारतात सार्वजनिक आणि खाजगी भागीदारी असलेली 'राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ' (एनएसडीसी) ही या क्षेत्रातीलएक अनोखीसंस्था आहे. विशाल आणि गुणवत्तापूर्ण लाभासाठी व्यवसायिक संस्थांच्या उभारणीतून कौशल्य विकासाला प्रोत्साहन देणे, हे या संस्थेचे मुख्य उद्दिष्ट आहे. देशातील सर्व क्षेत्रातील कुशल श्रमशक्तीची मागणी पूर्ण करून कुशल मनुष्यबळाची मागणी आणि त्याचा पुरवठा यात असलेली तफावत दूर करण्याच्या उद्देशाने सन २००९ मध्ये एनएसडीसीची स्थापना करण्यात आली. केंद्रीय अर्थमंत्र्यांनी २००८-०९ च्या अर्थसंकल्पीय भाषणात या संस्थेच्या स्थापनेची घोषणा केली होती. वाढत्या अर्थव्यवस्थेस लागणारी आवश्यक कौशल्ये पुरवण्याचे आव्हान पेलण्यासाठी एका मिशनच्या रुपात जागतिक दर्जाचाकौशल्य विकास कार्यक्रम सुरु करण्याची निकड अर्थमंत्र्यांनी त्यावेळी व्यक्त केली होती. दहा कोटी रुपये मूळ भागभांडवल असलेल्या या संस्थेत सरकारचा ४९ टक्के तर खाजगी क्षेत्राचा ५१ टक्के इतका हिस्सा आहे. या संस्थेत राष्ट्रीय कौशल्य विकास निधि, संचालक मंडळ , बोर्ड उपसमित्या आणि कार्यकारी परिषद यांचा समावेश आहे. १५ सदस्सीय संचालक मंडळात सहा सरकारनियुक्त सदस्य असतात. यातील एक जण महामंडळाचा अध्यक्ष असतो ज्याची निवड खाजगी क्षेत्रातुन झालेली असते. ही संस्था व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रमासाठी निधि उपलब्ध करूनदेते. कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत खाजगी क्षेत्राला प्रोत्साहन देऊन सन२०२२ पर्यंत भारतात ५०० दशलक्ष प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करण्याचे लक्ष्य सरकारने एनएसडीसीच्या माध्यमातून ठेवले आहे.

➢➢➢➢➢➢ ➢➢➢➢➢➢ ➢➢➢➢➢➢ ➢➢➢➢➢➢ ➢➢➢➢➢➢ ➢➢➢➢

## आवाहन

१५ ते १८ ऑक्टोबर दरम्यान पुणे येथे आयोजित पुणे ग्रंथ प्रदर्शनामध्ये केंद्र सरकारच्या प्रकाशन विभागाच्यावतीने विशेष विक्री दालन थाटण्यात येणार आहे. या दालनात मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेतील सर्वासाठी उपयोगी ठरतील अशी ऐतिहासिक, वैचारिक आणि धार्मिक विषयासह विविध प्रकारचे माहिती पूर्ण ग्रंथ आणि पुस्तके सवलतीच्या दरात उपलब्ध करून दिली जाणार आहेत. त्यामध्येगीत रामायण, आधुनिक भारताचे निर्माते, राष्ट्रपति, पंतप्रधानाची महत्वाची भाषणे, प्रसिद्ध लोककथा, अशा अनेक पुस्तकांचा समावेश असणार आहे. याच दालनात 'योजना(मराठी)' मासिकाची वर्गणीही स्वीकारली जाणार आहे. गणेश कला क्रीड़ा मंच, नेहरू स्टेडियम जवळ, स्वारगेट, पुणे- ४११००९ या ठिकाणी हे ग्रंथ प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. ग्रंथप्रेमींनी या संधीचा लाभ घ्यावा.

# धानपुनर्रोपण यंत्र

**रणजीत मिरीग**

भाताची रोपे लावण्यासाठी शेतात मजूरांची कमतरता भासत असल्याकारणाने रणजीत मिरीग या ६० वर्षीय गृहस्थाने भाताची रोपे लावण्याचे एक यंत्र विकसित केले. या यंत्राचा आद्य नमुना त्यांनी १९८६ साली पहिल्यांदा तयार केला आणि २००८ साली त्यात अनेक बदल करत त्याचे यशस्वी मॉडेल तयार केले. आधी एन्आयएफकडून मदत घेऊन नंतर आयआयटी खरगपूरच्या पुढाकाराने रोपण यंत्राची अधिक सुधारित आवृत्ती निर्माण करण्यात आली.

रणजीत मिरीग यांचा जन्म एका गरीब, दलित शेतकरी कुटुंबात झाला. आर्थिक अडचणींमुळे त्यांना जास्त शिक्षण घेता आले नाही. अनेक वर्षांच्या भात उत्पादक शेतमजूरांच्या त्रासाला कंटाळून त्यांनी १९८६ साली स्वतंत्रपणे शेती करण्यासाठी एक यंत्र तयार करण्याचा निर्णय घेतला. मजुरांचा मोबदला, मजुरांच्या व्यवस्थापनातील अडचणी आणि मजुरांकडून होण्राया अयोग्य मागण्या या सर्व गोष्टींमुळे ते हतबल झाले होते. पण हार न पत्करता त्यांनी स्वत: भात लावण्यास सुरुवात केली. भात लावणाऱ्या यंत्राचे समाधानकारक काम करणारे मॉडेल निर्माण मिरीग यांना २५ वर्षे वाट पहावी लागली. हा प्रवास अवघड होता. आपले अनुभव ते पुढील काव्यपंक्ती सांगतात,

"पथ है पथरीला, जाना है दूर
पाँव का छाला गिर जाये पर जाना है जरूर"
(रस्ता खडकाळ, खडतर आहे, ध्येय दूर आहे. माझ्या पावलांना कदाचित घट्टे पडतील पण म्हणून मी थांबणार नाही.)

मिरीग यांनी भात रोपक यंत्रासाठी काम करण्यास सुरुवात केली तोपर्यंत अंतरिक्ष भ्रमण मोहीम यशस्वीरित्या पार पाडलेल्या एकाही भारतीय शास्त्रज्ञाला आपल्या देशातील शेतकऱ्यांसाठी भातरोपक यंत्र तयार करता आले नव्हते. खरंतर या गोष्टीवर मिरीग यांचा विश्वास बसू शकत नव्हता. पण यातूनच त्यांना या प्रश्नावर काम करण्याची तसेच संशोधन करण्याची प्रेरणा मिळाली.

धानपुनर्रोपण यंत्र चालवायला दोन व्यक्तींची गरज असते. एक व्यक्ती यंत्र ओढण्यासाठी असेल तर दुसरी व्यक्ती तबकातील रोपांना बोटांच्या मदतीने योग्य दिशा देऊन जमिनीवरील भाताच्या वाफ्यांवर रोपे रोवण्यासाठी असते. या यंत्राद्वारे भाताच्या ५ ओळी लावता येतात. यामध्ये रोपणात दोन ओळींतील अंतर १८ सेमी तर दोन रोपांतील अंतर १५ सेमी इतके असते. यंत्राने नियोजित केलेली क्षेत्र क्षमता ०.३ एकर प्रति हेक्टर एवढी आहे. एन.आय.एफ. या संस्थेने सुरुवातीला मदत केल्यावर त्याची पुढील चाचणी आयआयटी खरगपूर इथे घेण्यात आली. तेव्हा असे निदर्शनास आले की हाताने लागवड करण्याच्या एकूण वेळेच्या एक सप्तमांश वेळेपेक्षा कमी वेळ या यंत्राने लागला, स्वयंचलित यंत्रापेक्षा मात्र दुप्पट वेळ या यंत्राने लागला.

भाताची रोपे लावण्याच्या पारंपरिक पद्धतीत बराच वेळ पाण्यात उभे राहावे लागल्यामुळे त्वचेचे आजार उद्भवण्याचा संभव असतो. पण या नवीन यमत्रामुळे भाताची रोपे लावण्याचा वेळ लक्षणीयरित्या कमी झाला असून त्वचा रोगांची लागण होण्याची शक्यताही कमी झालेली आहे.

भारतीय शेतकऱ्यांचे प्रश्न या यंत्राच्या मदतीने सुटतील व त्यांच्या आयुष्यात आनंद निर्माण होईल, अशी आशा रणजीत मिरीग यांना वाटते. त्यांच्या नातवंडांनी यंत्राचा हा वारसा पुढे न्यावा, असे त्यांना मनोमन वाटते. त्यांची लाडकी नातवंडेही याबाबत अतिशय उत्साही आहेत. मिरीग आज ज्या ठिकाणी आहेत त्यासाठी कुटुंबातील प्रत्येकाने आपापल्या परीने खारीचा वाटा उचलला आहे. आपल्या कुटुंबाप्रती कृतज्ञता व्यक्त करतांनाच सुरूवातीच्या काळात गावकऱ्यांनी दिलेल्या वाईट वागणूकीचे ते हसतहसत स्मरण करतात. आज त्यांना मिळणाऱ्या आदर व सन्मानाबद्दल त्यांना गहिवरून येते. देव करतो ते भल्यासाठीच असे म्हणून कृतार्थ भाव ते व्यक्त करतात.

# INSTITUTE OF CIVIL SERVICES

MPSC

UPSC

राजपथ ॲकॅडमी
MPSC ★ UPSC
*Login to Excellence & Success*

## प्रा. मीता चौधरी

(संस्थापक-संचालिका, राजपथ ॲकॅडमी, पुणे)


## 'राजपथ ॲकॅडमी' ची दर्जेदार व परीक्षाभिमुख प्रकाशने




राजपथ करियर टाइम्स मासिक. आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, प्रादेशिक स्तरावरील अपेडट मुद्यांचा दर्जेदार, अभ्यासपूर्व आढावा.



युपीएससी व एमपीएससी च्या बदलत्या दुष्टीकोनानुसार चालूघडामोडी प्रश्नोत्तर स्वरूपात तसेच विश्लेषणात्मक माहितीसह.




आकलनासाठी अत्यंत परीक्षाभिमुख मराठी, इंग्रजी उतारे, रिजनिंग, बेसिक न्यूमरसी व इतर प्रश्नांचा सराव.




राज्यसेवा मुख्य परीक्षेसाठी इतिहास, भूगोल, कृषीचा अतिसंभाव्य प्रश्नपत्रिकासंच




एमपीएससीच्या पॅटर्ननुसार पेपर ३ चा अभ्यासपूर्ण व माहितीयुक्त पर्यायाचा प्रश्नसंच



पेपर-४ मधील विज्ञान-तंत्रज्ञान घटकाची उपयुक्त, वर्णनात्मक माहितीचे पुस्तक



राज्यसेवा (मुख्य) परीक्षेची तयारी कशी करावी याचे मार्गदर्शन प्रश्नपत्रिकांसह



PSI/STI/ASST पूर्व परीक्षेसाठी आयोगाच्या काठिण्यस्तरानुसार संभाव्य, सराव प्रश्नपत्रिकासंच

| MPSC राज्यसेवा परीक्षा | PSI / STI / ASST | UPSC फाऊंडेशन कोर्स |
|---|---|---|
| • एकत्रित बॅच - पूर्व + मुख्य + मुलाखत<br>• कालावधी - एक वर्ष<br>• बॅचेस सुरू : १० ऑक्टोबर आणि २५ ऑक्टोबर | • एकत्रित बॅच - पूर्व + मुख्य + शारीरिक चाचणी + मुलाखत<br>• कालावधी - एक वर्ष<br>• बॅचेस सुरू : १० ऑक्टोबर आणि २५ ऑक्टोबर | • एकत्रित बॅच - पूर्व + मुख्य + मुलाखत<br>• कालावधी - ११ महिने<br>• बॅचेस सुरू : १० ऑक्टोबर आणि २५ ऑक्टोबर |

नोकरी-कॉलेज करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वीकएन्ड व नियमित बॅच उपलब्ध

राजपथ ॲकॅडमी
MPSC ★ UPSC
*Login to Excellence & Success*

## राजपथ ॲकॅडमी


**मुख्य कार्यालय :**
२६, आप्पा बळवंत चौक,
अनमोल पुस्तकालयासमोर, पुणे.

**शाखा :**
लोकमान्य टिळक भवन, बी-विंग दुसरा मजला,
५६८ नारायण पेठ, केसरीवाड्याजवळ, पुणे.

**फोन नं. :**
०२०-३२४२ २२२१, ८००७९०९१६०
Email: info@rajpathacademy.com

www.rajpathacademy.com 90287 56551 follow us on - rajpath academy

Yojana Marathi (Monthly) October 2015
RNI No. MAHMAR/2009/32156
Reg No. G/NMD/137/2013-15
Published Date : 12th Oct., 2015
Date of Posting : 12th Oct., 2015




Editor - **Umesh Ujgare**
Printed and Published by **Dr. (Ms) Sadhana Rout,** Additional Director General (I/C), on behalf of Publication Division
and Printed at **Onlooker Press**, 16, Sassoon Dock, Mumbai - 400 005. Phone : 22183544/2939
Published at - B-701, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai - 400 614.